ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

भारतीय सौर आश्विन-मार्गशीर्ष १९३४
ऑक्टोबर-डिसेंबर २०१२/खंड ३६ अंक ३


- भारतातील भाववाढीचे अंतर्गत दृश्य
- सर्वसमावेशक वृध्दीची गरज
- जागतिकीकरण, लोकशाही व सेन यांची न्याय संकल्पना
- किरकोळ किराणा क्षेत्रातील थेट परकीय गुंतवणूक
- संत गाडगेबाबांच्या अखेरच्या कीर्तनातील आर्थिक विचार
- स्वराज्यातील आर्थिक नि:सारण
- नव्या आर्थिक धोरणाचा कामगार जगतावरील परिणाम
- रुपयाच्या विदेश विनिमय दरातील घट: आव्हान
- साखर कारखान्यांना सहवीज प्रकल्पाने आर्थिक बळकटी
- भाववाढ मापनासंबंधी एक प्रयत्न
- भारतातील दारिद्र्याचा एक अभ्यास
- वाढती वित्तीय तूट आणि उपाय योजना
- पीएच्.डी. प्रबंधाचा सारांश




लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये। शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

International Research Journal मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

ISSN 0973-8452
Reg.No. 31918/77

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

www.marthpari.org

ऑक्टोबर-डिसेंबर २०१२ / खंड ३६ अंक ३

प्रमुख संपादक
अविनाश रामलाल निकम

सहाय्यक संपादक
शंकर सुदामराव पवार

सल्लागार मंडळ
(२०१२-१५)
प्रशांत काटोले
अशोक खाचणे
राहूल म्होपरे
अशोक हळ्ळी

संपादकीय पत्रव्यवहार
डॉ.अविनाश निकम
मातृपितृ कृपा, प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९,
जिल्हा नंदुरबार.
मोबा: ९८२२६६५१४१

*लेखातील मते लेखकांचीच*

## अ नु क्र म णि का


- **अविनाश निकम**, शहादा
  संपादकीय संवाद ........................................ २१७
- **राहूल म्होपरे**, अर्जुननगर
  भारतातील भाववाढीचे अंतर्गत दृश्य व भाववाढ नियंत्रण.... २१९
- **बी.जे.कदम**, कोल्हापूर; **जे.एस.पाटील**, कराड
  सर्वसमावेशक वृध्दीची गरज................................ २३०
- **श्रीराम पेडगांवकर**, पुणे
  जागतिकीकरण, लोकशाही व सेन यांची न्याय संकल्पना... २४०
- **दीपक भामरे, प्रियंका भामरे**, लोणावळा
  किरकोळ किराणा क्षेत्रातील थेट परकीय गुंतवणूक.......... २५३
- **महेश डाबरे**, अकोला
  संत गाडगेबाबांच्या अखेरच्या कीर्तनातील आर्थिक विचार..... २६१
- **अविनाश कुलकर्णी**, पुणे
  स्वराज्यातील आर्थिक निःसारण.............................. २६६
- **राजेंद्र तुंगारे, पी.एम.कडूकर**, मुंबई
  नव्या आर्थिक धोरणाचा कामगार जगतावरील परिणाम....... २७१
- **प्रशांत हरमकर**, अमरावती
  रुपयाच्या विदेश विनिमय दरातील घट: आव्हाने .............. २८३
- **सुरेखा फाकडे**,
  साखर कारखान्यांना सहवीज प्रकल्पाने आर्थिक बळकटी.... २९५
- **सुनिता माळी**, मिरज
  भाववाढ मापनासंबंधी एक प्रयत्न ........................... २९९
- **संदीप करंडे**, बोरीवली
  भारतातील दारिद्र्याचा एक अभ्यास .......................... ३०४
- **सुभाष भालेराव**, शहादा
  वाढती वित्तीय तूट आणि उपाय योजना........................ ३१६
- **विद्या पाटील**, देवपूर
  पीएच्.डी. प्रबंधाचा सारांश
  धुळे जिल्ह्यातील स्वयंसहायता बचतगट: एक अभ्यास....... ३२०

मराठी अर्थशास्त्र परिषद
कार्यकारी मंडळ २०१२-१३

अध्यक्ष
कैलास काशिनाथ पाटील (परभणी)

कार्याध्यक्ष
चारुदत्त श्रीधर गोखले (जळगाव)

कार्यवाह खजिनदार
अनिल बाबुराव सूर्यवंशी (बार्शी)

प्रमुख संपादक-अर्थसंवाद
अविनाश रामलाल निकम (शहादा)

विश्वस्त
ज.फा. पाटील (कोल्हापूर)
मधुकर शिंदे (इस्लामपूर)
सूर्यकांत जगदाळे (उस्मानाबाद)

सदस्य
महंमद रफिक मुलाणी (बारामती)
तानाजी भोसले (सांगली)
श्रीरंग मंडले (सिंधुदुर्ग)
श्रीराम जोशी (जळगाव)
सुरेश ढाके (डोंगरकठोरे)
हरिहर तिवारी (वाशीम)
रामकृष्ण टाले (नागपूर)
तुकाराम मुंडे (मानवत)
तुकाराम बारबोले (उस्मानाबाद)
बालाजी शिंदे (परभणी)
मधुकर खंदारे (औरंगाबाद)
वसंत पाटील (भुसावळ)



अक्षर रचना:
सुनिल मुरलीधर भांडारकर, शहादा.
मुद्रणालय:
सातपुडा ऑफसेट, जळगाव.



● कार्यालयीन पत्रव्यवहार:
(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक: अनिल बाबुराव सूर्यवंशी
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर,
बार्शी - ४१३ ४११, जि. सोलापूर.
दूरध्वनी: ०२१८४-२२४२९४,
भ्रमणध्वनी: ८८०५६९१४०६


● वर्गणी:

▪ परिषदेचे सदस्य:
आजीव सदस्य: रु.२०००/- (एकरकमी)

▪ संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:
शैक्षणिक संस्था: रु.१०००/-(त्रैवार्षिक)
व्यावसायिक संस्था:रु.१०००/-(त्रैवार्षिक)
ग्रंथालये: रु.१५००/-(पंचवार्षिक)

▪ वर्षगणना: १ एप्रिल ते ३१ मार्च

▪ संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.

▪ कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.

▪ अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच प्रमुख संपादकाकडे पाठवावी.

▪ **मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.**


● अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:
१) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली.
२) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
*टिप:* म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय संवाद

## जर्मनीत घडलेली ही सत्यघटना.....

एखाद्या विस्तीर्ण समुद्र किनारा लाभलेल्या देशात भूकंपाच्या एखाद्या मोठ्या धक्क्यानं त्सुनामी लाटा येऊन जमिनीवर उलथापालथ होते. जमीन हादरते तसंच चलनवाढीमुळे अर्थव्यवस्थेला प्रचंड धक्के बसतात. एखाद्या वेळी चलनवाढीचे धक्के इतके जोरदार असतात की त्या धक्क्यांनी अर्थव्यवस्था कोलमडते. पहिल्या महायुध्दानंतर जर्मनीत प्रचंड चलनवाढ झाली. याचा परिणाम म्हणून जर्मनीत युध्दापूर्वी ज्या वस्तूला २,००० मार्क्स् पडत त्याच वस्तूला युध्दानंतर ४३,०००,०००,०००,००० (त्रेचाळीस हजार अब्ज) मार्क्स् पडू लागले. ही भाववाढ इतकी प्रचंड होती की, युध्दापूर्वी लोक खिशातून पैसे नेत असत अन् पिशवीतून वस्तू आणत. पण युध्दानंतर पिशवीतून पैसे नेऊ लागले अन् खिशातून वस्तू आणू लागले. किती ही भाववाढ? हॅन्सन हा अर्थतज्ज्ञ म्हणतो की, १९२२ मध्ये जर्मनीत एवढी भाववाढ झाली होती की, १९१८ मध्ये एखाद्या वस्तूला जेवढी किंमत पडत असे त्या वस्तूची १९२२ मध्ये किंमत ५०० पटीनं वाढली. त्या काळात जर्मनीत मार्क्स्च्या ज्या कागदी नोटा होत्या त्या नोटांची किंमत त्या नोटांसाठी वापरलेल्या कागदापेक्षा कमी झाली होती.

भाववाढीबाबत *'लाखाची गोष्ट'* म्हणून एक सत्यकथा नंतरच्या काळात प्रसिध्दीला आली. जर्मनीत त्या काळात एका पित्यानं आपली दोन लाख मार्क्स्ची संपत्ती दोन मुलांना समान वाटून दिली. प्रत्येकाच्या वाट्याला आले एक-एक लाख मार्क्स्. त्यापैकी एक मुलगा शहाणा होता. त्यानं आपले एक लाख मार्क्स् बँकेत जपून ठेवले. दुसरा मुलगा मात्र उधळ्या होता. छंदी-फंदी होता. पित्याचे लाख मार्क्स् त्यानं दारूच्या बाटल्या रित्या करण्यात खर्च केले. घरात एका रूममध्ये त्यानं जवळपास सर्व प्रकारच्या ब्रँड्सच्या रिकाम्या बाटल्यांचा साठा केला. अन् प्रचंड भाववाढीला सुरुवात झाली. शहाण्या मुलानं लाख मार्क्स् बँकेत सुरक्षित ठेवले होते. त्या एक लाखात त्याला एक वेळचे पुरेसे अन्नही मिळेनासे झाले. भाववाढीपूर्वी श्रीमंत असलेला भाववाढीनं कंगाल झाला. तर भाववाढीपूर्वी दारूच्या बाटल्या रिचवल्यानं कंगाल झालेला मुलगा भाववाढीनं खूप श्रीमंत झाला. त्यानं ऐष केल्यानंतर रित्या झालेल्या बाटल्या विकून त्याला लाखो मार्क्स् मिळाले. भाववाढीचं तंत्र असंच असतं. पैशाची किंमत घटते तर वस्तूची किंमत महागते. ही सत्य घटना इथं मांडण्याचा उद्देश ऐष करणारा भाववाढीनंतर चांगला ठरतो असं सांगण्याचा मुळीच नव्हे, तर प्रचंड भाववाढ झाली तर त्याचे केवळ आर्थिक परिणाम काय होतात हे स्पष्ट करणे आहे. अर्थतज्ज्ञांच्या मते विकासासाठी

माफक प्रमाणात भाववाढ हवीच. पण सामान्य जनता मात्र महागाई विरोधात होती, आहे आणि राहणार. भाववाढीची संकल्पना आता जागतिकीकरणानं व्यापक स्वरूपाची बनली आहे. खनिजतेल, उपभोग्य वस्तू व पायाभूत वस्तूंच्या भाववाढीचा प्रश्न आज सर्वच अविकसित देशांमध्ये आहे. भाववाढीचा परिणाम त्या-त्या देशातील शेअर बाजारावर प्रतिबिंबीत झालेला दिसतो. चांगल्या अर्थकारण्यांना सुध्दा भाववाढ हे न सुटणारं कोडं आहे. भाववाढीबाबतच्या एका शोधनिबंधाचा समावेश आपण या अंकात केला आहे. याशिवाय सर्वसमावेशक वृध्दी, थेट परकीय गुंतवणूक, नवीन आर्थिक धोरणाचा परिणाम, रुपयाच्या विनिमय दरात घट, भाववाढ मापन, भारतीय दारिद्र्याचा अभ्यास या विषयांवरील शोधनिबंध वाचकांना निश्चितपणे वाचनीय वाटतील अशी अपेक्षा आहे.

## यशस्वी भुसावळ अधिवेशन......

मराठी अर्थशास्त्र परिषदेचं छत्तिसावं अधिवेशन भुसावळ येथील भुसावळ कला, विज्ञान व पु.ओं. नाहाटा वाणिज्य महाविद्यालयात यशस्वीरित्या पार पडलं. सदस्यांनी या अधिवेशनाला मोठ्या संख्येनं उपस्थिती दिली. सूत्रसंचालकांना शोधनिबंध सादरकर्त्यास पुरेसा वेळ देता येणं शक्य झालं. अधिवेशनाची स्मरणिका देखील उत्तम तयार झाली. भुसावळच्या ताप्ती एज्युकेशन सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी प्राचार्य डॉ.मिनाक्षी वायकोळे, स्थानिक कार्यवाह प्रा.व्ही.डी.पाटील यांच्या माध्यमातून कार्यक्रमाचं नियोजन उत्कृष्टरित्या केलं. या महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग आणि विद्यार्थ्यांच्या परिश्रमाला यश आलं. उपस्थितांना हे अधिवेशन निश्चितपणे संस्मरणीय ठरलं. या अधिवेशनात परिषदेच्या वतीनं माझे सहकारी अध्यक्ष डॉ. के.के.पाटील, कार्याध्यक्ष प्रा.चारुदत्त गोखले, कार्यवाह डॉ.अनिल सूर्यवंशी, विश्वस्त डॉ.ज.फा.पाटील, डॉ.मधुकर शिंदे, डॉ.सूर्यकांत जगदाळे सर्व कार्यकारी मंडळ सदस्य यांनी यशस्वितेसाठी प्रयत्न केले. परिषदेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित समस्त सदस्यांनी अंकाबाबत समाधान व्यक्त केलं. डॉ.श्रीरंग कुडुक(ठाणे) व डॉ.अतुल साळुंखे(खोपोली) या माननीय सदस्यांनी संपादकांच्या कार्याबाबत अभिनंदनीय ठरावाची इच्छा दोन वेळा जाहीरपणे व्यक्त केली. त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार.

मराठी अर्थशास्त्र परीषदेचे कार्याध्यक्ष प्रा. चारुदत्त गोखले, स्थानिक कार्याध्यक्षा प्राचार्य डॉ. मिनाक्षी वायकोळे, स्थानिक कार्यवाह प्रा.व्ही.डी.पाटील यांनी अंकासाठी जाहिराती उपलब्ध करून दिल्या त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार. अर्थसंवादचा हा अंक वाचक स्वीकारतील, अशी अपेक्षा आहे.

- अविनाश रामलाल निकम

प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'

# भारतातील भाववाढीचे अंतर्गत दृश्य आणि भाववाढ नियंत्रण

**राहुल शं. म्होपरे, अर्जुननगर (निपाणी),**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
देवचंद कॉलेज, ता.कागल, जिल्हा कोल्हापूर.
भ्रमणध्वनी: ९९२३८७९०२०

---

## प्रस्तावना व विषय प्रवेश :

पैशाचे मूल्य कमी होवून किंमत पातळी सातत्याने वाढणे या परिस्थितीस भाववाढ असे म्हणतात. भारतीय अर्थव्यवस्थेची अलिकडची परिस्थिती लक्षात घेता भारताचा भाववाढ निर्देशांक सातत्याने वाढत असलेला दिसून येतो. पेट्रोल, भाजीपाला, अन्नधान्य अशा जीवनावश्यक गोष्टींच्या किंमती दैनंदिन वाढत असल्याच्या बातम्या नित्य नियमाने वर्तमान पत्रामधून प्रसिध्द होत असल्याचे आपल्या निदर्शनास येत आहे. भाववाढीमुळे सामान्य माणसांचे कंबरडे मोडले आहेत, परंतु मध्यमवर्गीय देखील हैराण झाले आहेत. भाववाढ नियंत्रणासाठी शासकीय स्तरावर विविध प्रयत्न व विचारमंथन सुरू आहे. अशातच अलिकडे केंद्रीय पोलाद मंत्री बेनीप्रसाद शर्मा यांनी ''फळभाज्या नी जीवनावश्यक वस्तूंचे भाव भडकले म्हणून मी जाम खुश आहे, कारण त्यामुळे शेतकऱ्यांचा फायदाच होत आहे'' अशी वादग्रस्त प्रतिक्रिया दिल्याने भाववाढीच्या परिस्थितीत आगीत तेल ओतल्यासारखे झाले आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही आशिया खंडातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. साधारणपणे जेंव्हा विकासदर वाढत असतो तेंव्हा भाववाढ होणे अपेक्षित असते. परंतु भारतीय अर्थव्यवस्थेच्या बाबतीत मात्र आज विकासदर ९% वरून ६% पर्यंत कमी झाला तरी त्या प्रमाणात भाववाढ मात्र कमी झालेली दिसून येत नाही. गोल्डमन सक्सच्या अर्थशास्त्रज्ञाने तयार केलेल्या BRIC गटात [ब्राझील (B), रशिया (R), भारत (I), चीन (C)] भारतातील भाववाढीचा दर सर्वाधिक आहे. भारतातील अनेक नामवंत कंपन्यांना भाववाढीचा दबाव सहन

करावा लागत आहे. उदा. मारूती सुझुकी इंडिया लि. या नामवंत कंपनीची मोटार विक्री मे, २०१२ मध्ये लक्षणीय रित्या घटलेली आहे. जनरल मोटर्स व फोर्ड कंपन्यांच्या बाबतीत देखील कमी जास्त प्रमाणात अशीच परिस्थिती आहे. या पार्श्वभूमीवर भारतातील भाववाढ मापनाची पध्दती, भाववाढीची सद्यस्थिती, भाववाढीचे अंतर्गत दृश्य, सध्याची भाववाढीची कारणे व नियंत्रणासाठी उपाय इ. बाबींचा ऊहापोह करण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात केलेला आहे.

सदर शोधनिबंध हा पुर्णतः दुय्यम् साधनसामग्रीवर आधारीत असून यासाठी वर्तमान पत्रातील भाववाढीसंदर्भातील तज्ञांचे विविध लेख, जर्नल्स व मासिकांमधून प्रकाशित झालेले लेख, पीएच.डी. प्रबंध, विविध संकेतस्थळांवरील माहिती इ. चा संदर्भ साहित्य म्हणून वापर केलेला आहे.

## भारतातील भाववाढ मापनाची पध्दती:

भारतात भाववाढ मोजण्यासाठी घाऊक किंमत निर्देशांकाचा (Whole Sale Price Index) वापर केला जातो. वस्तू आणि सेवांच्या किंमत बदलाच्या सरासरीच्या आधारे घाऊक किंमत निर्देशांक काढला जातो. सध्या भारतात घाऊक किंमत निर्देशांक काढण्यासाठी विविध ६७६ वस्तूंच्या किंमत पातळींचा विचार केला जातो. यासाठी पायाभूत वर्ष म्हणून २००४-०५ हे आधार वर्ष निवडण्यात आले आहे. घाऊक किंमत निर्देशांक काढताना निवडलेल्या ६७६ वस्तूंचे विविध गटात व उपगटांत विभाजन करण्यात आले आहे. प्रत्येक वस्तूला यामध्ये विशेष भार देण्यात आलेला आहे. यामधील गटनिहाय भार खालील प्रमाणे-

१. प्राथमिक वस्तू- (Primary Articles)- भार - २०.११ %

२. इंधन, वीज, प्रकाश साहित्य, वंगण - (Fuel, Power, Light & Lubricants)-भार - १४.९१ %

३. औद्यागिक वस्तू- (Manufactured Products) - भार - ६४.९७ %

प्राथमिक वस्तू गटांचे अन्न (Food Articles) अन्नाव्यतिरिक्त वस्तू (Non Food Articles) आणि खनिज (Minerals) इ. उपगटांमध्ये विभाजन केले जाते. २००४-०५ पासून प्राथमिक वस्तू गटांचे विभाजन १.अन्न वस्तू, (Food Articles) २.अन्न सोडून इतर वस्तू, (Non Food Articles) ३. इतर अन्न वस्तू (Other Food Articles – e.g. tea and coffee) ४.इतर अन्नाव्यतिरिक्त वस्तू (Other Non Food Articles – e.g. hides, sugarcane, tobacco etc.) ५. खनिज (Minerals) या ५ उपगटांत केले जात आहे. उत्पादित वस्तू गटाचे अन्न वस्तू, पेय, तंबाखू आणि तंबाखू उत्पादने, कापड, लाकूड आणि लाकूड उत्पादने, कागद आणि कागद उत्पादने, कातडे आणि कातडी वस्तू, रबर आणि प्लॅस्टिक वस्तू, रसायने आणि रासायनिक वस्तू, खनिज वस्तू, धातू वस्तू, यंत्रे आणि यंत्र साहित्य, वाहतूक साधने, इतर किरकोळ उत्पादित वस्तू इ. विविध उपगटांमध्ये विभाजन केले जाते. अशा प्रकारे प्रमुख गटांना व उपगटांना वेगवेगळे भार देवून भारतात घाऊक किंमत निर्देशांक काढला जातो.

याव्यतिरिक्त भाववाढ मोजण्यासाठी

ग्राहक किंमत निर्देशांकांचा (Consumer Price Index) देखील वापर केला जातो. सध्या या निर्देशांकाच्या आधारे संयुक्त राष्ट्रे, इंग्लंड, जपान इ. विकसित देशांमध्ये भाववाढ मोजली जाते.

## भारतातील भाववाढीची सद्यस्थिती

भारतातील भाववाढीच्या मागील १० वर्षातील (२००३ ते २०१२) चढउतारासंदर्भातील सांख्यिकीय माहिती तक्ता क्र.१ मध्ये दर्शविली आहे.

तक्ता क्र.१

भारतातील भाववाढीचे वर्षनिहाय दर

| वर्ष | भाववाढीचा दर | फरक* | |
|---|---|---|---|
| | | वाढ | घट |
| एप्रिल, २००३ | ५.१२ | - | - |
| एप्रिल, २००४ | २.२३ | - | २.८९ |
| एप्रिल, २००५ | ४.९६ | २.७३ | - |
| एप्रिल, २००६ | ४.६५ | - | ०.३१ |
| एप्रिल, २००७ | ६.६७ | २.०२ | - |
| एप्रिल, २००८ | ७.८१ | १.१४ | - |
| एप्रिल, २००९ | ८.७० | ०.८९ | - |
| एप्रिल, २०१० | १३.३३ | ४.६३ | - |
| एप्रिल, २०११ | ९.४१ | - | ३.९२ |
| एप्रिल, २०१२ | १०.२२ | ०.८१ | - |
| जून, २०१२ | १०.५ | - | ०.१७ |

** संशोधकाने तयार केले.*

*आधार - http://business.mapsofindia.com/inflation/-22/08/12*

उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसते की, भारतात साधारणपणे भाववाढीचा दर सातत्याने वाढत आहे. मागील वर्षाची चालू वर्षाशी तुलना करता फक्त वर्ष, २००४ (२.८९%), २००६ (०.३१%), व २०११ (३.९२%) या वर्षातच भाववाढीचा दर घटलेला आहे. उर्वरित सर्व वर्षामध्ये भाववाढ दर वाढलेला दिसून येतो. सर्वाधिक भाववाढ दर २०१० (१३.३३%) मध्ये होता. २००९ च्या तुलनेत २०१२ मध्ये ४.६३ % नी अधिक भाववाढ झालेली दिसून येते, तर २०११ मध्ये २०१० च्या तुलनेत ३.९२ % नी भाववाढ दर घटलेला दिसून येतो. भारतातील भाववाढीच्या दराच्या बदलत्या स्वरूपाचे चित्र तक्ता क्र.१ मधून स्पष्टरित्या समजून येते.

अशाप्रकारे मागील १० वर्षातील

भाववाढीचा दर समजून घेतल्यानंतर आपण ऑगस्ट, २०१२ मधील लोकांच्या जीवनावश्यक वस्तूंच्या बाबतीतील घाऊक भाव व किरकोळ भाव लक्षात घेवू. जे तक्ता क्र.२ मध्ये दर्शविले आहेत.

तक्ता क्र.२

जीवनावश्यक वस्तूंचे घाऊक व किरकोळ भाव (ऑगस्ट, २०१२)

| वस्तू | घाऊक भाव (प्रती किलो) | किरकोळ भाव (प्रती किलो) | सरासरी किरकोळ भाव* | फरक* |
|---|---|---|---|---|
| साखर | ३७ | ४५ | ४५ | ८ (२२%) |
| बटाटा | १६ | २३-२५ | २४ | ८ (५०%) |
| उडीद | ५७ | ८०-९० | ८५ | २८ (४९%) |
| मूगडाळ | ६० | ८०-९० | ८५ | २५ (४२%) |
| मसूर | ४१ | ७०-८० | ७५ | ३४ (४२%) |
| शेंगदाणा तेल | १२२ | १३५-१४० | १३७.५ | १५.५ (१३%) |
| सुर्यफुल तेल | ७२ | ९०-१०० | ९५ | २३ (३२%) |

** संशोधकाने तयार केले.*

*आधार - दै.सकाळ, सप्तरंग पुरवणी- दि. २६ ऑगस्ट, २०१२, पृ.४.*

उपरोक्त तक्ता क्र.२ वरून असे दिसून येते की, ऑगस्ट, २०१२ मध्ये भारतात जीवनावश्यक वस्तूंच्या घाऊक भावात व किरकोळ भावात मोठी तफावत आहे. उडीद (४९%), मूगडाळ (४२%), मसूर (४२%) यांच्या घाऊक व किरकोळ भावात मोठी तफावत आहे. तर तुलनेत शेंगतेल (१३%) व साखर (२२%) यांच्या घाऊक व किरकोळ भावात कमी तफावत आहे. परंतू एकंदरीत असे लक्षात येते की, किरकोळ भाव हे घाऊक भावापेक्षा तुलनेने खुपच अधिक असल्याने किरकोळ ग्राहकांची व्यापारी मोठ्या प्रमणात लूट करीत आहेत. घाऊक व किरकोळ भावातील असणारी ही मोठी तफावतच जीवनावश्यक वस्तूंच्या भाववाढीला कारणीभूत आहे. घाऊक व किरकोळ भावामधील फरक स्पष्ट दर्शविणारे चित्र तक्ता क्र.२ मध्ये दर्शविले आहे.

## भाववाढीचे अंतर्गत दृश्य:

भारतातील १९९४-९५ ते २०११-१२ पर्यंतच्या भाववाढीच्या अंतर्गत दृश्याची सांख्यिकीय माहिती अभ्यासणे मनोरंजक ठरेल. ती तक्ता क्र.३ मध्ये दर्शविली आहे. सदर तक्त्यावरून आपणास भाववाढीच्या घाऊक किंमत निर्देशांकामध्ये वर्षनिहाय संबंधीत गटाचा हिस्सा किती होता याची स्पष्ट कल्पना येते. या तक्त्यात प्राथमिक वस्तू, इंधन, वीज व प्रकाश, औद्योगिक वस्तू इत्यादींचा विचार करण्यात आला आहे.

तक्ता क्र.३

घाऊक किंमत निर्देशांक आधारीत भाववाढीच्या दरातील उपवस्तू गटांचा सापेक्ष हिस्सा

| पायाभूत वर्ष | प्राथमिक वस्तू | | | इंधन, वीज, | औद्यागिक | सर्व |
|---|---|---|---|---|---|---|
| १९९३-९४ | अन्न | अन्नाव्यतिरिक्त | एकूण | प्रकाश | वस्तू | वस्तू |
| १९९४-९५ | १५.७ | ११.७ | २७.६ | १०.१ | ६२.३ | १०० |
| १९९५-९६ | १६.१ | ६.९ | २२.६ | ९.१ | ६८.२ | १०० |
| १९९६-९७ | ४१.१ | -१.२ | ३९.९ | ३१.९ | २८.२ | १०० |
| १९९७-९८ | १०.५ | ३.४ | १३.३ | ४४.६ | ४२.१ | १०० |
| १९९८-९९ | ३३.२ | १०.७ | ४४.९ | ७.९ | ४७.२ | १०० |
| १९९९-०० | १८.१ | -१०.८ | ७.८ | ३९.६ | ५२.६ | १०० |
| २०००-०१ | ६.९ | २.२ | ९.३ | ५९.८ | ३०.९ | १०० |
| २००१-०२ | १५.६ | ८.२ | २४.७ | ३९.२ | ३६.१ | १०० |
| २००२-०३ | ८.५ | १५.६ | २२.९ | २४.५ | ५२.६ | १०० |
| २००३-०४ | ३.६ | १४.१ | १७.३ | १६.६ | ६६.१ | १०० |
| २००४-०५ | ६.५ | ०.७ | १२.९ | २३ | ६४.१ | १०० |
| पायाभूत वर्ष - २००४-०५ | | | | | | |
| २००५-०६ | १८.९ | -११.५ | २१.५ | ४३.८ | ३४.७ | १०० |
| २००६-०७ | २२.३ | १३.५ | ३१.८ | १३.८ | ५४.४ | १०० |
| २००७-०८ | २१.९ | ३७.० | ३७.५ | ०.२ | ६२.२ | १०० |
| २००८-०९ | १७.५ | २४.९ | ३०.२ | २०.६ | ४९.२ | १०० |
| २००९-१० | ६०.२ | २१.४ | ७१.२ | -७.८ | ३६.६ | १०० |
| २०१०-११ | २६.० | ३७.३ | ४२.४ | १८.९ | ३८.७ | १०० |
| २०११-१२ | ५२.१ | १६.९ | २४.५ | २२.५ | ५२.९ | १०० |

स्त्रोत:

1. Handbook of Statistics of Indian Economy, RBI.
2. Office of the Economic Adviser, Ministry of Commerce and Industry, Government of India.

टिप:१. विविध श्रेणीमधील वर्गीकरणात झालेल्या बदलामुळे यातील प्रमुख आणि उपगट हे तुलना करण्यायोग्य नाहीत.

२. २००४-०५ च्या श्रेणीमध्ये प्राथमिक वस्तू या प्रमुख गटातील चार उपगटांपैकी इतर अन्नधान्य वस्तू व इतर अन्नधान्य व्यतिरिक्त वस्तू या दोन गटांचा विचार करण्यात आलेला नाही.

उपरोक्त तक्त्याचे विभाजन आपणाला दोन भागात करता येते. पहिला भाग १९९४-९५ ते २००४-०५ या काळासाठी १९९३-९४ हे पायाभूत वर्ष मानून करता येते. तर दुसऱ्या भागात २००४-०५ हे पायाभूत वर्ष मानून २००५-०६ ते २०११-१२ या कालावधीचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

१९९४-९५ ते २००४-०५ या काळातील घाऊक किंमत निर्देशांकाचा विचार केला असता यामध्ये प्रामुख्याने औद्योगिक वस्तू गटाचा हिस्सा १९९४-९५ (६२.३%), १९९५-९६ (६८.२%), १९९८-९९ (४७.२%), २००३-०४ (६६.१%) व २००४-०५ (६४.१%), १९९९-२००० (५२.६%), २००२-०३ (५२.६%), २००३-०४ (६६.१%) व २००४-०५ (६४.१%) या वर्षांमध्ये सर्वात अधिक असल्याचे दिसते. तर इंधन, वीज, प्रकाश साहित्य, वंगण या गटाचा प्रभाव घाऊक किंमत निर्देशांकावर १९९७-९८ (४४.६%), २०००-०१ (५९.८%) व २००१-०२ (३९.२%) या वर्षांमध्ये अधिक होता. या व्यतिरिक्त १९९६-९७ मध्ये मात्र प्राथमिक वस्तू गटाचा (त्यामध्ये अन्न वस्तूंचा - ४१.१%) घाऊक किंमत निर्देशांकात सर्वाधिक ३९.९ % हिस्सा होता.

१९९४-९५ ते २००४-०५ या काळातील तिनही गटांच्या घाऊक किंमत निर्देशांकामधील हिश्श्याची सरासरी काढली असता ती प्राथमिक वस्तू गटासाठी (२२.१% यामध्ये अन्न वस्तू - १६ % व अन्नाव्यतिरिक्त इतर वस्तू - ५.६%), इंधन, वीज, प्रकाश साहित्य व वंगण गटाचा सरासरी हिस्सा २७.८ % तर औद्योगिक वस्तू गटाच्या हिस्स्याची सरासरी सर्वाधिक ५० % येते.

तक्त्याच्या दुसऱ्या भागाचा (२००५-०६ ते २०११-१२) विचार करता असे दिसते की, घाऊक किंमत निर्देशांकात प्राथमिक वस्तू गटाचे प्राबल्य २००९-१० (७१.२%) व २०१०-११ (४२.४%) या वर्षात अधिक आहे. इंधन, वीज, प्रकाश साहित्य व वंगण या गटाचा प्रभाव २००५-०६ (४३.८%) या वर्षात अधिक आहे. तर उर्वरित २००६-०७ (५४.४%), २००७-०८ (६२.२%), २००८-०९ (४९.२%) व २०११-१२ (५२.९%) या वर्षात औद्योगिक वस्तू गटाचा घाऊक किंमत निर्देशांकात सर्वाधिक हिस्सा आहे. २००५-०६ ते २०११-१२ या कालावधीतील घाऊक किंमत निर्देशकातील प्रत्येक गटाची सरासरी काढली असता यामध्ये सर्वाधिक हिस्सा औद्योगिक वस्तू गटाचा ४७% त्यानंतर प्राथमिक वस्तू गट - ३७% (यामध्ये अन्न ३१.३ % व अन्ना व्यतिरिक्त इतर - १९.९%) व शेवटी इंधन, वीज, प्रकाश साहित्य व वंगण गटाचा १६% हिस्सा असल्याचे निदर्शनास येते. थोडक्यात सदर तक्त्याच्या विश्लेषणाद्वारे खालील प्रमुख मुद्दे संशोधकाच्या हाती लागलेले आहेत.

१. साधारणपणे १९९४-९५ ते २००४-०५ व २००५-०६ ते २०११-१२ या दोन्ही कालखंडात घाऊक किंमत निर्देशांकावर औद्योगिक वस्तूंचा प्रभाव सर्वाधिक आहे.

२. १९९४-९५ ते २००४-०५ या काळात घाऊक किंमत निर्देशांकावर प्राथमिक वस्तूगटापेक्षा इंधन, वीज, प्रकाश साहित्य व वंगण या गटाचा अधिक प्रभाव आहे.

३. २००५-०६ ते २०११-१२ या अलिकडील काळात मात्र घाऊक किंमत निर्देशांकावर

इंधन, वीज, प्रकाश साहित्य व वंगण या गटापेक्षा प्राथमिक वस्तू गटाचा प्रभाव अधिक आहे.

## सद्यस्थितीतील भाववाढीची कारणे:

साधारणपणे एप्रिल २००७ नंतरच्या काळात भारतात भाववाढीचा दर सातत्याने वाढत आहे. नैसर्गिकरित्या कधीही भाववाढ होत नसते. यामागे काही महत्वाची कारणे निश्चितच असतात. मागील पाच वर्षातील व सद्यास्थितीतील भारतातील सर्वच स्तरात भाववाढ घडून येण्याची कारणे तपासण्याचा प्रयत्न केला असता संशोधकाला खालील प्रमुख कारणे निदर्शनास आली आहेत.

१.कच्च्या तेलाच्या वाढत्या किंमती:

अलिकडील काळात आखाती राष्ट्रांनी आंरराष्ट्रीय स्तरावर कच्च्या तेलाच्या किंमतीत सातत्याने वाढ केलेली आहे. यातच काही काळ सूएझ कालव्यामार्गे केली जाणारी कच्च्या तेलाची वाहतूक विस्कळीत झाल्याने वाहतुकीचा खर्च वाढून कच्च्या तेलाच्या व पर्यायाने पेट्रोल, डिझेलच्या किंमती वाढलेल्या दिसून येतात.

२.आयात-निर्यात वृध्दी:

भारतातून परदेशात निर्यात वृध्दी घडून येत आहे. परंतु आयात देखोल त्यापेक्षा वेगाने वाढत आहे. विशेष म्हणजे कच्च्या तेलाव्यतिरिक्त इतर कच्चा माल व भांडवली वस्तूंची आयात देशात उत्पादन वाढ घडवून आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे आयात बीलाची रक्कम दखोल वाढत आहे. या सर्वाचा एकत्रित परिणाम भाववाढीवर होत आहे.

३.उत्पादन खर्चातील वाढ:

भाववाढीचा परिणाम म्हणूनच उत्पादन खर्चात वाढ होते आणि भाववाढीस अधिक चालना मिळते. मजूर, कच्चा माल, वीज, वाहतुक, सरकारी कायदे, कामगारांसाठी आरोग्य व सुरक्षेच्या सोयी-सुविधा, करांचे वाढते दर, व्याजदरातील वाढ इ. उत्पादनास पूरक अशा सर्वच घटकांमध्ये भाववाढ झाल्याचा परिणाम म्हणून उत्पादन खर्च वाढतो. भारतातील भाववाढीचे हे एक कारण आहे.

४. मागणीतील वाढ:

चीन व भारताची लोकसंख्या जगाच्या लोकसंख्येच्या ३४% च्या जवळपास आहे. अलिकडील काळात या दोन्ही अर्थव्यवस्थांचा वृध्दी दर ९% च्या आसपास राहिला होता. भारतातील लोकांच्या राहणीमानाच्या सवयीदेखील मोठ्या प्रमाणात बदलत आहेत. वृध्दी दरातील वाढीमुळे लोकांचे उत्पन्न वाढले व वाढत्या उत्पादनाचा परिणाम म्हणून अधिक दर्जेदार वस्तू आणि सेवांची मागणी वाढून भारतात भाववाढ झाल्याचे दिसून येते.

५.अन्नधान्य भाववाढ:

अन्नधान्याची सातत्याने होणारी भाववाढ हा भारतातील ज्वलंत प्रश्न बनला आहे. नैसर्गिक आपत्ती, शेती आदानांच्या वाढत्या किंमती, गैरव्यवहार आणि काळा बाजार, अशास्त्रीय शेती पध्दती, अल्प उत्पादकता, वातावरणाचे अविश्वसनीय भविष्यकथन, अल्प किंमतीत उच्च उत्पादन देणाऱ्या बियाण्यांचा अभाव इ. विविध कारणांनी शेती उत्पादनाचा खर्च वाढून भारतात अन्नधान्य भाववाढ झालेली आहे.

६.सरकारचे चुकीचे धोरण:

सरकारने अन्नधान्य व इतर प्रमुख वस्तूंच्या बाबत आयात-निर्यातीबाबत चुकीचे धोरण अवलंबल्याची टीका सातत्याने होत आहे. हजारो टन गहू कुजत आहे. परंतु स्वस्त धान्य दुकानामार्फत तो गरीबांपर्यंत पोहचवता आला नाही. यातच काळ्या पैशाला आळा घालण्यास शासन सातत्याने अपयशी ठरत आहे. याचीच परिणीती भाववाढीत झाली आहे.

७. घटता विनिमय दर:

आंतरराष्ट्रीय बाजारात सातत्याने रूपयाचे अवमूल्यन होत आहे. अलीकडे (दि. २९ ऑगस्ट, २०१२) तर हा दर १ डॉलरला ५५.६६ रूपये असा विक्रमी घसरला आहे. विनीमय दरातील घटीने आयात वस्तूंचे मूल्य वाढते व त्याचा प्रतिकूल परिणाम देशांतर्गत उद्योगातील उत्पादन खर्चावर झालेला आहे. यामुळे देखील भारतातील भाववाढीला चालना मिळाली आहे.

८. आंतरराष्ट्रीय वस्तूंच्या किंमतीतील वाढ:

धातू, अन्न-धान्य घटक (डाळी, खाद्यतेल इ.), सिमेंट, मशिनरी इ. आयात केल्या जाणा-या वस्तूंच्या किंमती वाढल्याने देखील भारताला भाववाढीच्या परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे.

९. वित्तीय तूट:

अलीकडील काळात वित्तीय तूट सातत्याने वाढत आहे. अंदाजपत्रक २०१२-१३ नुसार भारताची वित्तीय तूट राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५.१% राहील असा अंदाज वर्तविला आहे. परंतु प्रत्यक्षात ती यापेक्षाही अधिक राहील असे वाटते. परिणामत: सरकारची वस्तू व सेवांची मागणी जास्त राहून त्याचा परिणाम भाववाढ अधिक वाढण्यावर होत आहे.

१०. भाववाढीसंदर्भातील अपेक्षा:

अर्थव्यवस्थेत फार थोडया प्रमाणात जरी भाववाढ झाली तरी त्याचा परिणाम म्हणून लोकांच्या भाववाढीसंदर्भातील अपेक्षा तयार होण्यामध्ये होतो. वाढलेल्या किंमतीला खरेदी करण्याऐवजी सध्याच खरेदी करणे पसंत केले जाते. परिणामी मागणी जास्त वाढून आणखी भाववाढ घडून येते. भारतात देखील याचाच प्रत्यय येत आहे.

## सद्यस्थितीतील भाववाढ नियंत्रणाँसाठी उपाय:

भारतात सर्वच स्तरावर सध्या होत असलेली भाववाढ नियंत्रित करण्यासाठी संशोधकाला प्रामुख्याने खालील उपाय योजावेत असे वाटते.

१. शेती गुंतवणूक आणि उत्पादनात वाढ:

अन्न-धान्याच्या किंमतीत घट घडवून आणण्याचा हा एक प्रमुख उपाय आहे. आजही ग्रामीण भागात बाजारपेठांचा अभाव, अपुऱ्या वाहतूक सोयी व आवश्यक साठागृहे नसल्याने त्याचा परिणाम शेती उत्पादनावर होतो. विकसनशील देशात हंगामानंतरच्या काळात यामुळे मोठे नुकसान होते. ते जवळपास ४०% एवढे मोठे आहे. सबब या अनुषंगाने शेतीला आवश्यक सोयी सुविधांबरोबरच शेती, शेती आदानांच्या किंमती सरकारने कमी केल्या पाहिजेत. जलसिंचन वृध्दी बरोबरच आधुनिक तंत्राचा शेतीत वापर करून उत्पादन वृध्दी घडवून आणणे गरजेचे आहे. जे आजही भारतात फार मोठया प्रमाणात शक्य आहे.

२. विनीमय दर बाजाराधिष्टीत करणे:

अलिकडील काळात रूपयाचे सातत्याने अवमूल्यन झाले आहे. विनीमय दराच्या स्थिरीकरणासाठी म्हणून RBI यामध्ये मोठया प्रमाणात हस्तक्षेप करते. हा हस्तक्षेप कमी करून विनीमय दर बाजाराधिष्टीत केल्यास काही काळानंतर भाववाढ आपोआप कमी होईल असे वाटते. अर्थात बाजाराधिष्ठित विनीमय दराने निर्यात वस्तूंच्या किंमती वाढून निर्यात घट होण्याचा धोका देखील संभवतो.

३. वित्तीय तूट कमी करणे:

भारताच्या वाढत्या वित्तीय तुटीचा परिणाम म्हणून देखील झालेली भाववाढ कमी करण्यासाठी ही तूट कमी केली पाहिजे. यासाठी सरकारने अतिरीक्त व्याज, सबसीडी इ. अनुत्पादक खर्चावर नियंत्रण आणले पाहिजे. तसेच शक्य झाल्यास परिस्थितीनुरूप संरक्षण खर्चात कपात करण्याचे धाडस देखील ठेवले पाहिजे. याबरोबरच कर महसूल वाढविण्याचे सर्व प्रयत्न केले पाहिजेत.

४. शिलकी साठा करणे:

भाववाढीसंदर्भात अतिसंवेदनशील असणा-या वस्तू उदा. इंधन, तेल, खाद्यतेल, डाळी इ. चा शिलकी साठा शासनाने ठेवला पाहिजे. जेणेकरून भाववाढीच्या परिस्थितीत त्याचा वापर करून भाववाढ नियंत्रण करता येईल.

५. स्वस्त धान्य दुकानांची परिणामकारक अंमलबजावणी:

सरकारने संपूर्ण भारतभर ज्या उद्‌देशाने स्वस्त धान्य दुकानांची उभारणी केलेली आहे, तो उद्‌देश आज कितीतरी स्वस्त धान्य दुकानदार विसरले आहेत. काळया बाजाराचे पेव या दुकानदारांनी फोडले आहे. त्यामुळे अस्तित्वातील कायद्यांची कडक अंमलबजावणी करून ही दुकाने चालविल्यास भाववाढ आटोक्यात आणण्यास मदत होईल.

६. व्यापार धोरणात सुधारणा:

देशाच्या आयात निर्यात धोरणाचा देखील भाववाढीवर विशेष परिणाम दिसून येतो. जागतिक अन्न सुरक्षिततेसाठी दोहा व्यापार परिषदेत खुल्या व्यापाराच्या अनुषंगाने पहिले क्रांतीकारक पाऊल टाकण्यात आले होते. अशा प्रकारच्या शेती, उद्योग, सेवा इ. सर्वच क्षेत्रांमध्ये व्यापार सुधारणा घडवून आणल्यास भाववाढीस आळा बसेल.

७. इतर उपाय:

उपरोक्त उपायांबरोबरच मौद्रीक धोरणाच्या अनुषंगाने RBI ने काही कठोर निर्णय घेणे आवश्यक आहे. वित्त मंत्रालयाच्या मौद्रीक धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या होणारा अतिरेकी हस्तक्षेप कमी झाला पाहिजे. तसेच भारतातील तरूण पिढीच्या मनोवृत्तीत देखील बदल घडवून आणणे गरजेचे आहे. कारण अलिकडे भारतातील तरूणांचा अनावश्यक वस्तूंच्या उपभोगाकडे वाढता कल आहे. तो बदलून जपानी तरूणांप्रमाणे त्यांना बचतीची व आवश्यक उपभोगाची सवय लावली पाहिजे. जेणेकरून मागणी आधारीत होणारी भारतातील भाववाढ नियंत्रित होईल.

## समारोप:

अशा प्रकारे सदर शोधनिबंधातून आपण भारतातील भाववाढीचे आंतर्गत दृश्य व भाववाढीची कारणे आणि उपाय यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतू या ठिकाणी एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे ती म्हणजे

मर्यादित प्रमाणात भाववाढ होणे हे अर्थव्यवस्थेला पोषकच असते. कारण सध्याची मर्यादित भाववाढ ही उत्पादक व कामगारांच्या दृष्टिने भविष्यातील फायद्याची व उत्पन्न वाढीची नांदीच असते. त्यामुळे भाववाढ ही नेहमीच धोकादायक असते असे नाही.

## संदर्भ सूची:


1. D. Subbarao (2012), *'India in a Globalising World – Some Policy Dilemmas'*, Speech delivered at Cornell University, New York 28th Aug. 2012 – www.rbi.org.in- Date 29/08/2012

2. Mohanti, Deepak (2011), *'Monetary Policy Response to Recent Inflation in India'*, Speech delivered at The Indian Institute of Technology (IIT), Guwahati, 3rd Sept., 2011 -http://www.bis.org/review/r110906e.pdf - Date : 16/08/2012

3. R.B.I Monthly Bulletin (2010),.- New series of The Wholesale Price Index Numbers (Base 2004-05 = 100), October.

4. Office of the Economic Advisor, Ministry of Commerce and Industry, Government of India. - http://eaindustry.nic.in- Date 29/08/2012.

5. Waingade Rajkumar A.(2010), *'A Historical Analysis of Inflation in India'*, Ph.D. Thesis, Shivaji University, Kolhapur, June.

Websites :

1. http://business.mapsofindia.com/inflation/ - Date : 02/08/2012

2. http://bisquiz.blogspot.in/2011/05/food-inflation-in-india-causes-and.html - Date : 22/08/2012

3. http://www.business-standard.com/india/news/inflation-current-account-deficit-causes-for-concern-fm/424395/ - Date : 22/08/2012

4. http://carnegieendowment.org/2011/04/06/soaring-food-prices-causes-consequences-and-remedies/1ofu - Date : 19/08/2012

5. http://www.e-investing.in/indian-economy/5052-causes-

inflation.html - Date : 11/08/2012

6. http://lastbull.com/what-is-inflation/- Date :07-08-2012

वर्तमानपत्रातील लेख:

१. देसाई हेमंत - *''महागाईच्या 'वर्मा' वर बोट!''* - सप्तरंग पुरवणी, दै.सकाळ, दि.२६.०८.२०१२.

२. कोनकर अनिकेत- *''महागाईचा आनंद''*- महाराष्ट्र टाईम्स, कोल्हापूर पृ.११, दि. २३.०८.२०१२

३. महाराष्ट्र टाईम्स- *''महागाईचा आनंद कसा?''*- कोल्हापूर शहर - पृ.३, दि. २२.०८.२०१२.

## आधुनिक शेती विशेषांक

अर्थसंवादचा जानेवारी-मार्च २०१३ चा अंक आधुनिक शेती विशेषांक म्हणून प्रसिध्द केला जाणार आहे. भुसावळ येथील भुसावळ कला, विज्ञान आणि पु.ओ.नाहाटा वाणिज्य महाविद्यालयात पार पडलेल्या परिषदेच्या छत्तिसाव्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या उद्घाटन समारंभात प्रमुख अतिथी जळगावच्या जैन उद्योग समुहाचे उपाध्यक्ष मा.श्री.अशोकभाऊ जैन यांनी या विशेषांकासाठी येणारा सर्व खर्च देण्याची घोषणा केली होती. यासाठी मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा.चारुदत्त गोखले व प्रमुख संपादक डॉ. अविनाश निकम यांनी प्रयत्न केले. परिषद मा.श्री.अशोकभाऊ जैन यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करते.

-प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'

# सर्वसमावेशक वृद्धीची गरज

**बी. जे. कदम, कोल्हापूर,**
संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ.
भ्रमणध्वनी : ९९७०५३५७२३

**जे. एस. पाटील, कराड,**
प्राचार्य, शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय,
अधिष्ठाता, सामाजिकशास्त्रे,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
भ्रमणध्वनी : ९४२३२६१७९६

## प्रास्ताविक :

सर्वसमावेशक वृद्धीची संकल्पना शाश्वत आर्थिक विकासाच्या दृष्टीने व कल्याणकारी राज्याच्या निर्मितीसाठी नेहमीच उपकारक ठरते. दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या बहुसंख्य अल्पविकसित राष्ट्रामध्ये शासकीय पुढाकाराने विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात आहेत. या दृष्टीने भारतीय अर्थव्यवस्थेत ११व्या पंचवार्षिक योजनेत 'अधिकतर समावेशक वृद्धी' (More Inclusive Growth) उद्दिष्टाला प्राधान्य देण्यात आले आहे. सर्वसमावेशक वृद्धीची संकल्पना वर वर पाहता जरी सामाजिक न्याय प्रस्थापित करणारी असली तरी प्रत्यक्ष भारतीय समाजव्यवस्थेत त्या दृष्टीने मूलभूत स्वरूपाचा बदल झाला आहे किंवा नाही हे योजनेच्या अखेरच्या वर्षात तपासून पाहणे आवश्यक ठरते.

भांडवलशाही विकासाची प्रक्रिया ही मूलतः विषमता निर्माण करणारी असते. काही वेळा या विषमतेचे रूपांतर भयंकर दारिद्र्यातही होते म्हणून दारिद्र्याची पातळी सोसण्याच्या मर्यादेत आणणे व विषमतेची पातळी सर्वसामान्यांच्या डोळ्यांत खुपणार नाही इतपत नियंत्रित करणे यासाठी समावेशक वृद्धी व त्याला सुसंगत असे आर्थिक सामाजिक न्यायाचे धोरण राबवावे लागते. विकासाची प्रक्रिया ही सामाजिक न्याय वाढविणारी असावी. सर्वसमावेशक वृद्धीत सर्वांना सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक प्रगतीचे लाभ मिळावेत ही अपेक्षा असते. त्यामुळे समाजाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळू शकते. या धोरणामुळे देशाचा सर्वांगीण

विकास होतो. यामुळे आर्थिक विकासाच्या मुख्य प्रवाहात सर्वांचा समावेश असतो. कोणीही विकासाच्या लाभापासून वंचित रहात नाही. जर सर्वसमावेशक धोरण राबविले गेले नाही तर देशात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात विषमता वाढते.


सर्वसमावेशक वृद्धी व कल्याणकारी राज्य या दोन्ही संकल्पना परस्पर पूरक आहेत. या दोन्ही संकल्पनांचा विचार नव्याने होत असला तरी प्राचीन काळापासून निरनिराळ्या स्वरुपात चालत आलेल्या आहेत. रामराज्य कौटिल्याची आदर्श शासन व्यवस्था, प्लेटोचे रिपब्लिक या प्राचीन तर अर्वाचीन काळातील गांधीवादातील अंत्योदय व सर्वोदय, ए.पी.जे. अब्दुलकलाम, डॉ. एम. एस. स्वामीनाथन व वर्गीस कुरियन यांच्या स्वप्नातील भारत या साऱ्या संकल्पनांचा मूळ गाभा 'कल्याणकारी राज्य व सर्वसमावेशक वृद्धी' हाच आहे. तसेच राममनोहर लोहिया, पॉल स्वीझी, अब्राहम लिंकन, अमर्त्य सेन, मार्टिन ल्यूथर किंग, नेल्सन मंडेला या विचारवंताच्या दृष्टिकोणातूनही कल्याणकारी राज्यावर भर आहे.

## सर्वसमावेशक वृद्धीच्या संकल्पनेचे सैद्धांतिक विवेचन:

अलिकडच्या काळात जगातील बहुसंख्य विकसित राष्ट्रांनी सर्वसमावेशक वृद्धीचे तत्त्व हे अर्थव्यवस्थेला शाश्वत विकासाचा एक निकष म्हणून धोरणात्मक दृष्टिकोणातून मान्य केले आहे. इंग्लड, दक्षिण अमेरिका, चिली यांसारख्या देशात गरिबांसाठी ज्या योजना आखल्या त्या समावेशक वृद्धिचाच भाग होता. भारतामध्ये विविध पंचवार्षिक योजनांची जी विविध उद्दिष्टे निश्चित करण्यात आली, त्यामध्येही समावेशक वृद्धीच्या दिशेने वाटचाल करण्याचा हेतू निर्धारित करण्यात आला आहे. माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी १९७० नंतर 'गरिबी हटाओ' या कार्यक्रमाची घोषणा व अंमलबजावणी समावेशक विकासाचाच भाग होता. शेती विकासाला प्राधान्य, औद्योगिक विकास, स्थैर्यासहित विकास, किंमतस्थैर्य, रोजगारनिर्मिती, आर्थिक विषमता कमी करण्यासाठी उपाययोजना, दारिद्र्य निर्मूलनासाठी आखलेल्या विविध योजनांमुळे समतेवर आधारित समाज व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. परंतु प्रत्यक्षात निरपेक्ष दारिद्र्य, बेकारी, आर्थिक विषमता, भाववाढ या समस्यांमध्ये वाढच होत गेली. म्हणूनच भारताच्या ११ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये उघडपणे 'जलद अधिकतर सर्वसमावेशक वृद्धीच्या' तत्त्वाचा समावेश करण्यात आला होता. नियोजन काळात भारतात प्रादेशिक, क्षेत्रिय असमतोल, स्त्री-पुरूष असमानता निर्माण झाल्यामुळे सर्व समावेशक वृद्धीचा विचार अधिक महत्त्वाचा ठरतो.

दरडोई उत्पन्नातील वाढ ही कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासाची आवश्यक अट असली तरी आधुनिक काळात विकासाच्या मानवी चेहऱ्याला महत्त्व आहे. म्हणून १९९० नंतर आर्थिक वृद्धीच्या प्रक्रियेत मानव विकास निर्देशांकाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. यामध्ये शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, सरासरी आयुर्मान, मुलभूत सोयी सुविधा यांची पुरेशा प्रमाणात उपलब्धता होणे अपेक्षित आहे.

सर्वसमावेशक वृद्धी संकल्पनेत आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत होणाऱ्या उत्पन्न




विषमतेबरोबरच सामाजिक वंचिततेला महत्त्व आहे. याचे तार्किक अनुमान असे की, दारिद्र्य निवारण्याच्या कार्यक्रमात गरिबांच्या शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, संरक्षण, मुलभूत सुविधा-सेवांच्या बाबींवर निधींचा अग्रक्रमाने वापर केला पाहिजे. म्हणजेच सुत्ररूपाने आपणास ही संकल्पना वरीलप्रमाणे मांडता येईल.

महेंद्रदेव आणि माधवसिंग यांनी ''मूलतः सर्वसमावेशक वृद्धी म्हणजेच उत्पादन घटकांचे अशा रितीने न्याय वाटप करावे की त्यांचा लाभ समाजाच्या प्रत्येक घटकाला व्हावा. उत्पादन घटकांचे केवळ समसमान वाटप म्हणजे सर्वसमावेशक वृद्धी हे भारतातील आजच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीच्या संदर्भात पूर्णतः लागू पडत नाही. वास्तविक पाहता सर्वसमावेशक वृद्धी या संकल्पनेत अपुरी साधन सामग्री असणाऱ्या गरीब व्यक्तीत (श्रम शक्तीत) स्पर्धक प्रवृत्ती आणि आत्मविश्वास निर्माण करणाऱ्या समसमान संधीची उपलब्धता निर्माण करणे अपेक्षित आहे.'' असे मांडले.

नोबेल पारितोषिक विजेते अमर्त्य सेन यांनी असे म्हटले आहे की, '' दारिद्र्याचा प्रत्यक्ष घनिष्ठ संबंध मनुष्यातील मुलभूत क्षमतांपासून दुरावलेल्या गरीबांशी अधिक जवळचा आहे. गरीबांजवळ असणारे कमी उत्पन्न ही गौण बाब आहे. गरीबांच्या सुप्त क्षमता शक्तीत आणि कौशल्यात जसजशी वाढ होईल तसतशी त्या गरीबांना दारिद्र्यापासून मुक्त होण्याची प्रेरणा मिळते. दारिद्र्यातील घट होण्याची सर्वसमावेशक वृद्धीची आवश्यकता असते. यासाठी विकासाचा पाया विस्तृत असावा लागतो. विकासाचे जे सूक्ष्म व समग्र निर्देशक आहेत त्यामध्ये सहसंबंध असला पाहिजे.''

जागतिक बँकेने २००६ मध्ये जात, धर्म, पंथ, गरीब, श्रीमंत असा विचार न करता मानव हा घटक विचारात घेऊन आर्थिक वृद्धीची प्रादेशिक व्याप्ती वाढविणे, भावी पिढीसाठी साधनसंपत्ती, बाजारपेठा, संधीतील समानता याचा विस्तार करणे समावेशक विकासासाठी आवश्यक आहे असे म्हटले आहे. तर अमर्त्य सेन म्हणतात, ''कृषिक्षेत्र व बिगर कृषिक्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या उत्पन्नातील विषमता कमी करणे हे समावेशक वृद्धीचे उद्दिष्ट असले पाहिजे.'' भारतीय नियोजनमंडळाचे उपाध्यक्ष डॉ. अहलुवालीया यांच्या मते, विकास साधत असताना विकासाचा लाभ वेगवेगळ्या परिस्थितीत राहणाऱ्या लोकांना मोठ्या प्रमाणात झाला पाहिजे.

यू. एन. डी. पी. चा २००८ अहवाल सांगतो, सर्वसमावेशक वृद्धी संकल्पना उत्पादन आणि उत्पन्न यावर भर देते. समाजातील सर्व प्रकारच्या उत्पन्न घटातील लोकांचा उत्पादनातील सहभाग, विकास आणि वितरणातील समानता

महत्त्वाची आहे. एका बाजूला सर्व गटातील लोकांचे संघटन तर दुसऱ्या बाजूला सर्वांसाठी त्याचे फायदे असे झाले तरच समावेशक उद्दिष्ट साध्य करणे शक्य होईल.

सर्वसमावेशक वृद्धी ही दीर्घकालीन प्रक्रिया असून उत्पन्नाचे प्रत्यक्षात वितरण करण्यापेक्षा, उत्पादक रोजगार निर्मिती करणे गरजेचे आहे. कारण त्यामुळे विकासापासून वंचित असणाऱ्या लोकांच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते. श्रमशक्तीचा विकास प्रक्रियेतील सहभाग हा सर्वसमावेशक वृद्धीचा कार्यक्षम मार्ग आहे.

गेल्या ५० वर्षाच्या आर्थिक नियोजनात दारिद्र्य निर्मूलन हे उद्दिष्ट होते. परंतु सर्वसमावेशकतेच्या अभावामुळे हा प्रश्न आता बहुआयामी होऊन प्रादेशिक वाद आणि जात यांच्याशी जोडला जाऊ लागला. कृषी, शिक्षण आणि आरोग्य यासाठी सर्वसमावेशक व्यूहरचना तयार करण्याची आवश्यकता आहे. जागतिक बँकेने सर्वसमावेशक वृद्धीच्या संकल्पनेत गरिबांना समसमान संधी या मुद्यावर भर दिलेला आहे. पुरेशा निधीची उपलब्धता, सक्षम प्रशासकीय यंत्रणा, बंधनमुक्त बाजार व्यवस्था आणि सामाजिक सुरक्षा इत्यादी बाबी आजच्या आर्थिक सुधारणा काळात गरिबांना मोठ्या प्रमाणावर आणि सुलभतेने जसजशा प्राप्त होतील तसतसे सर्वसमावेशक वृद्धीचे धोरण यशस्वी होऊन गरिबीचे लवकरात लवकर निवारण करणे शक्य होईल.

ऑर्थर लेविस आणि अमर्त्य सेन यांच्या मते, विकास म्हणजे निवडीचा विस्तार हीच संकल्पना असली तरी दारिद्र्य निर्मूलन ते मानव विकास याप्रकारे विषयाची आशय घनता वाढत गेली. विकासामध्ये मनुष्याचा सर्वांगीण विकास अभिप्रेत आहे. विकास म्हणजे मानवी समाजाचे सातत्यपूर्ण उन्नयन, विकास म्हणजे अधिक मानवी जीवनाकडील वाटचाल होय. थोडक्यात विकासाचे साधन मनुष्य आहे हा भाग मात्र कायम आहे. आर्थिक विकासातून मानवी विकासाचे उद्दिष्ट जागतिक पातळीवर मान्य होऊन संयुक्त राष्ट्र संघाच्या विकास कार्यक्रमाच्या मार्गदर्शनानुसार विकासाची वाटचाल सुरू झाली. मानवी क्षमतांच्या विकासासाठी शिक्षण, आरोग्य व विशेषत: उत्पन्न वाढीचे प्रयत्न सुरू राहिले.

अलिकडे सर्वसमावेशी वृद्धीची कल्पना त्यासाठीचे प्रयत्न व आशादायक निष्पतीचा दावा केला जातो. ११ व्या पंचवार्षिक योजनेची व्यूहनीती ही त्यावर आधारलेली आहे. विकासातून वगळल्या गेलेल्यांचा वृद्धी प्रक्रियेच्या मुख्य प्रवाहात समावेश म्हणजे सर्वसमावेशक वृद्धी होय. समावेशनाचा विचार उत्पादन, उत्पन्न व उपभोग वितरणाच्या संदर्भात करता येतो. व्यावहारिक दृष्टीने भौतिक व मानवी संपत्तीच्या अभिदानापासून वंचित, परिणामत: उत्पन्न वितरणाच्या तळाच्या पातळीमुळे वृद्धीच्या लाभापासून वंचिताना किती लाभ देता आला यावरून समावेशनाचे यश लक्षात येते.

## सर्वसमावेशक वृद्धीचे निकष :

सर्वसमावेशक वृद्धीच्या तत्त्वाचे भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात व्यावहारिकता तपासून पाहताना या संकल्पनेचे निकष विचारात घेणे आवश्यक ठरते.

१. दारिद्र्य निवारण :

सर्वसमावेशक वृद्धी ही दारिद्र्य निर्मूलनासाठी आवश्यक ठरते. बहुसंख्य विकसनशील देशात " सार्वत्रिक दारिद्र्य" ही मुलभूत समस्या असते. दारिद्र्य निर्मूलनासाठी अर्थव्यवस्थेतील शेती व उद्योग या क्षेत्रात मानवी कौशल्ये विकसित करून रोजगार वाढ घडवून आणता येणे शक्य आहे. त्यामुळे मानवी कौशल्ये विकसित होऊन दारिद्रय अवस्थेतील लोकसंख्येचे प्रमाण व आकार कमी होण्यास मदत होईल. अलिकडेच आंतरराष्ट्रीय स्तरावर दिलेल्या प्रमाणकानुसार देशातील ४०% लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली जीवन कंठीत आहेत. तथापि, भारतातील दारिद्र्यावस्थेत जीवन जगणारी लोकसंख्या १९५०-५१ ते २००९-१० या काळात १८ कोटीवरून ४४ कोटीपर्यंत वाढली आहे. याचाच अर्थ, दारिद्र्याच्या सापेक्ष व निरपेक्ष स्थितीचा विचार करता भारतात सर्वसमावेशक वृद्धीच्या धोरणाची निकड सध्या निर्माण झाली आहे.

२. जीवनावश्यक वस्तूंची उपलब्धता :

शाश्वत आर्थिक विकासासाठी समाजातील सर्व लोकांना वाजवी राहणीमानाचा दर्जा प्राप्त करून देण्यासाठी माफक प्रमाणात जीवनावश्यक वस्तूंची उपलब्धता करून देणे हे शासनाचे आद्य कर्तव्य मानले जाते. या दृष्टिकोणातून सर्वसमावेशक वृद्धीच्या तत्त्वात जीवनावश्यक वस्तूंच्या उपलब्धतेच्या निकषास महत्त्व आहे. यामध्ये अन्नधान्य, भाजीपाला, दूध पेट्रोल, डिझेल, पिण्याचे पाणी, पोस्टल सेवा इत्यादींना सुद्धा महत्त्व प्राप्त झाले आहे. भारतात ११ व्या पंचवार्षिक योजनेत सर्वसमावेशक वृद्धीच्या तत्त्वाची अंमलबजावणी करताना जीवनावश्यक वस्तूंच्या उपलब्धतेकडे लक्ष देण्याचे ठरवले आहे. तथापि, खंडप्राय देशात या तत्त्वाची उपयुक्तता व सर्वसमावेशकता विचारात घेता शासनाचा विधायक दृष्टिकोण अत्यंत महत्त्वांचा आहे.

३: रोजगार निर्मिती :

सर्वसमावेशक वृद्धी ही कोणत्याही समाजातील विविध स्तरावरील व्यक्तीच्या उत्पन्न पातळीत समतोल प्रमाणात वाढ घडवून आणणारी असावी या दृष्टीने भारतात ११ व्या पंचवार्षिक योजनेतील पहिल्या ४ वर्षात ठोस स्वरुपाचे प्रयत्न फारसे झालेले दिसून येत नाहीत. इतकेच नव्हे तर देशातील उपलब्ध व काम करण्यास लायक मनुष्यबळाला कौशल्ये विकसित करण्यात शासन व स्वयंसेवी संस्था यांचा सहभाग न्यूनतम पातळीवर आढळून येतो. २ ऑक्टोंबर २००५ पासून देशात महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे. या योजनेनुसार देशातील सुमारे ५ कोटी मजुरांना वर्षातील १०० दिवस रोजगाराची हमी दिलेली आहे. सर्वसमावेशक वृद्धीकडे वाटचाल करण्याचा नियोजनकारांचा हा दृष्टिकोण स्तुत्य असला तरी पुरेसा नाही.

४. मागणीची कमतरता :

प्रसिद्ध भारतीय अर्थतज्ज्ञ डॉ. अमर्त्य सेन यांनी गेली ५० वर्षे संशोधन करून शाश्वत विकासाच्या संकल्पनेचे मूळ शोधण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी केलेल्या अभ्यासानुसार श्रीमंताची श्रीमंती व गरिबांची गरिबी कमी करण्यासाठी शासनाने व्यापक स्तरावर प्रयत्न करणे आवश्यक आहे तरच सर्वसमावेशक वृद्धी घडून

येईल. म्हणून भारतात या तत्वाची अंमलबजावणी करताना गरिबांची मागणी वाढविण्यासाठी त्यांचे दरडोई उत्पन्न वृद्धिंगत करण्यावर भर देण्यात येत आहे. त्यानुसार शासकीय स्तरावर विविध उपाय योजना राबवून गरिबांची खरेदीशक्ती वाढविण्यावर भर देण्यात येत आहे.

५. ग्रामीण व शहरी भागातील विषमता :

कोणत्याही देशाच्या विकासात आर्थिक विषमतेचे निर्मूलन होणे आवश्यक ठरते. जागतिक बँकेच्या सर्वसमावेशक वृद्धीच्या संकल्पनेत गरीब व श्रीमंत व्यक्तीच्या उत्पन्न पातळीवरील विषमता कमी करण्यावर भर देण्यात आला आहे. भारतात १९५१ नंतर आर्थिक नियोजनाच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा व सुविधांचा लाभ ग्रामीण भागाच्या तुलनेने शहरी भागातील लोकांना अधिक मिळाला आहे. त्यामुळे ११ व्या पंचवार्षिक योजनेत जलद आर्थिक विकासासाठी ग्रामीण शहरी भागातील आर्थिक विषमता कमी करण्यासाठी हे तत्त्व मूलभूत मानण्यात आले आहे. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे भारतासारख्या खंडप्राय देशात सर्व प्रकारच्या सुविधांपासून वंचित असलेल्या लोकांना आर्थिक विकासाचे किमान लाभ प्राप्त करून देण्यासाठी देशातील ग्रामीण व शहरी भागातील विषमता कमी करण्याच्या धोरणास प्राधान्य देण्यात येत आहे. थोडक्यात समुदाय विकास योजनेच्या अंमलबजावणीसाठी भारतात ग्रामीण व शहरी भागातील लोकांना सामाजिक न्याय मिळवून देऊन आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी हे तत्त्व अत्यंत उपयुक्त ठरते.

## सर्वसमावेशक वृद्धीबाबतचे शासकीय धोरण:

भारतात १९५१ नंतर आर्थिक नियोजनाच्या माध्यमातून शाश्वत विकासाचे अनेक उपक्रम राबविण्यात आले आहे, या दृष्टीने दारिद्र्य निर्मूलन, रोजगारनिर्मिती, आर्थिक विषमतेत घट व देशातील शहरी आणि ग्रामीण भागातील उत्पन्न पातळीतील तफावत कमी करणे, सार्वजनिक वितरण प्रणालीचा स्वीकार इत्यादी उपक्रम अधिक महत्त्वपूर्ण मानले. वास्तविक पाहता भारतात सर्वसमावेशक वृद्धीचे तत्त्व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत समाजवादी समाजरचनेच्या तत्त्वात सामावलेले होते. नियोजनकारांनी पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून ७ व्या पंचवार्षिक योजनेपर्यंत निश्चित केलेली भारतीय नियोजनाची सर्वसाधारण उद्दिष्टे ही देशाला सर्वसमावेशक वृद्धीकडे नेणारी अशी होती. १९९१ नंतर खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणावर आधारित नव्या आर्थिक धोरणाचा अर्थव्यवस्थेच्या कृषी, उद्योग व सेवा क्षेत्रावर अनुकूल व प्रतिकूल अशा दुहेरी स्वरुपाचा परिणाम झाला. त्याचबरोबर भारतीय अर्थव्यवस्थेच्या संरचनात्मक चौकटीमध्ये उपलब्ध मनुष्यबळाला पुरेशा भौतिक व सामाजिक सुविधा प्राप्त करून देण्यात अडथळे निर्माण होऊ लागले. त्यातच बदलत्या आंतरराष्ट्रीय वातावरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम होऊ लागला. परिणामी विख्यात भारतीय अर्थशास्त्रज्ञ डॉ. अमर्त्य सेन यांच्या संकल्पनेतील 'सामान्य मानव' साकार करण्यासाठी नव्याने सर्वसमावेशक वृद्धीचे तत्त्व स्वीकारण्यात आले. त्यांच्या मते, आर्थिक विकासाबरोबर गरिबांची खरेदीशक्ती वाढल्यास सामाजिक कल्याण साधले जाऊन आपोआप सर्वसमावेशक वृद्धी घडून येईल.

डॉ. अमर्त्य सेन यांचा सामाजिक कल्याणाचा हा निकष सर्वंकष मानून ११ व्या पंचवार्षिक योजनेत सर्वसमावेशक वृद्धीस मूर्त रूप देण्यात आले.

भारतात सर्वसमावेशक वृद्धी घडवून आणण्यासाठी पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून प्रयत्न करण्यात येत आहेत. यामध्ये पहिल्या पंचवार्षिक योजनेत शेतीविकास, दुसऱ्या योजनेत जलदगतीने औद्योगिकरण व १९६६ नंतर राबविण्यात आलेला हरीतक्रांतीचा समावेश ग्रामीण विकासाच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचा ठरविण्यात आला. चौथ्या पंचवार्षिक योजनेत आर्थिक स्वावलंबन साध्य करण्यासाठी निश्चित करण्यात आलेले स्थैर्यासहीत आर्थिक विकास हे उद्दिष्ट भारतीय अर्थव्यवस्थेत सर्वसमावेशक समाज निर्माण करण्यासाठी महत्त्वाचे ठरविण्यात आले. भारतात गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी कमी करण्यासाठी पाचव्या पंचवार्षिक योजनेत स्वीकारण्यात आलेल्या २० कलमी कार्यक्रमामध्ये दारिद्र्य निर्मूलन व राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी महाराष्ट्रासारख्या घटक राज्यात १९७२ मध्ये सुरू करण्यात आलेली 'रोजगार हमी योजना' आज राष्ट्रीय स्तरावर स्वीकारण्यात आलेली आहे. या योजनेची मूलभूत उद्दिष्टे ही देशातील अकुशल व्यक्तींना रोजगार संधी प्राप्त करून देऊन त्यांच्या खरेदी शक्तीत वाढ घडवून आणण्यास प्रेरक ठरत आहेत. २००८-२००९ मध्ये राष्ट्रीय योजनेतून १० कोटी श्रमदिवस रोजगारनिर्मिती होऊन त्याचा लाभ देशातील सुमारे २.४२ कोटी कुटुंबांना झाला आहे. रोजगार निर्मितीद्वारे सरकारने सर्वसमावेशक वृद्धीसाठी केलेला हा प्रयत्न अत्यंत प्रशंसनीय असा मानला जातो.

याशिवाय भारतात १९८० नंतर लघुउद्योग व कुटीरोद्योगांच्या विकासातून ग्रामीण व शहरी भागात निर्माण होणारी रोजगार निर्मिती शाश्वत विकासाला प्रेरक ठरत आहे. अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रात या तत्त्वांची अंमलबजावणी करीत असताना इतर काही सामाजिक व राजकीय निकष लावले आहेत. त्याचाही प्राधान्यक्रमाने विचार करणे योग्य ठरते. यामध्ये देशातील विविध विद्यापीठांमध्ये सामाजिक समावेशनाचे अभ्यासक्रम, आरक्षणाचे धोरण, लोकशाही विकेंद्रीकरणासाठी पंचायत राज्य व्यवस्थेचा स्वीकार, महिलांना नोकऱ्यांमध्ये ३० टक्के आरक्षण इत्यादी विविध प्रकारच्या उपक्रमांचा समावेश होतो. याचबरोबर देशातील न्यूनतम स्तरावर जीवन जगणाऱ्या व्यक्तीसाठी विमा योजना अंत्योदय योजना, आश्वासित रोजगार योजना, संजय गांधी निराधार योजना, इंदिरा आवास योजना, कामासाठी अन्न योजना इत्यादी योजनांचा समावेश होतो. याशिवाय शासनाच्या रोजगार व दारिद्र्यनिर्मूलनाच्या विविध योजना या सर्वसमावेशक वृद्धीच्या दृष्टीने अधिक महत्त्वाच्या मानल्या जातात. यामध्ये आपणास भारतात गेल्या ५० वर्षात राबविण्यात आलेल्या पुढील प्रमुख योजनांचा समावेश करावा लागेल.

१) प्रकर्षित शेती विकास योजना २) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ३)ग्रामीण रोजगार धडक कार्यक्रम ४)एकात्मिक ग्रामीण विकास योजना ५) ग्रामीण महिला व बालविकास योजना ६) पीक विमा योजना ७)जवाहर रोजगार योजना ८) यशवंत ग्राम समृद्धी योजना ९)राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रम १०) कस्तुरबा गांधी शिक्षण योजना ११) जवाहर ग्रामसमृद्धी योजना

१२)प्रधानमंत्री ग्रामोदय योजना १३) राष्ट्रीय झोपडपट्टी विकास कार्यक्रम.१४) सामाजिक सुरक्षितता पथदर्शी योजना १५) भारत निर्माण कार्यक्रम १६) प्रधानमंत्री ग्रामसडक योजना. १७)स्वयंसहाय्यता गटांची निर्मिती १८) सूक्ष्म वित्तपुरवठा १९) वाल्मिकी आंबेडकर आवास योजना २०) आश्रय विमा योजना.

वरील सर्व योजनांद्वारे भारतात १९५१ ते २००६ पर्यंत सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न शासनाने केला. या सर्व योजना शाश्वत सामाजिक विकासासाठी महत्वाची भूमिका बजावू शकतात. तथापि, त्यांची यशस्वी व प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक होते. विविध शासकीय योजना व त्याचा समाजाला होणारा लाभ याचे विश्लेषण करताना भारताचे माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांनी असे म्हटले होते की, एक रुपयातील अवघे पंधरा पैसेच गरिबांपर्यंत पोहोचतात. हे वास्तव भयानक आहे. १९९१ नंतर भारतीय अर्थव्यवस्थेत खाजगीकरण व स्पर्धात्मकतेच्या आव्हानास तोंड देण्यासाठी अर्थव्यवस्थेच्या रचनेत मूलभूत बदल करणे आवश्यक होते. आर्थिक विकासाची फळे समाजातील तळागाळातील व्यक्तींनाही चाखावयास मिळावीत हा प्रधान हेतू डोळ्यांसमोर ठेवून व व्यापक सामाजिक कल्याणाचा दृष्टिकोण साकार करण्यासाठी सर्वसमावेशक वृद्धीचे तत्त्व ११ व्या योजनेत स्वीकारण्यात आले. अर्थव्यवस्थेचा अधिक जोमाने विकास घडवून आणण्यासाठी आर्थिक व सामाजिक क्षेत्रात क्रांतीकारक बदल घडवून आणण्याचा शासनाचा मानस आहे.

## सर्वसमावेशक वृद्धीचा परिणामकारकता वाढविण्याचे उपाय :

भारताच्या ११ व्या पंचवार्षिक योजनेत निश्चित करण्यात आलेल्या सर्वसमावेशक वृद्धीसाठी आपणास पुढील उपाय सुचविता येतील.

भारतात ग्रामीण व शहरी भागातील दारिद्र्याची वास्तव स्थिती विचारात घेता सर्वसमावेशक आर्थिक वृद्धीसाठी अधिक व्यापक स्वरुपाचे प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. देशातील आंध्रप्रदेश, गुजरात, कर्नाटक, मध्यप्रदेश, छत्तीसगड, तामिळनाडू व ओरिसा या घटक राज्यातील दारिद्र्य रेषेखालील लोकांचे उत्पन्न राष्ट्रीय दारिद्र्य रेषेच्या उत्पन्न पातळीपेक्षा कमी आहे. त्यामुळे देशात गेल्या काही वर्षात दरिद्री, अतिदरिद्री व अतिश्रीमंत अशा प्रकारच्या उत्पन्नातील विषमतेचे दर्शन घडत आहे. सर्वसमावेशक आर्थिक वृद्धीसाठी उत्पन्नातील ही विषमता कमी करून दारिद्र्य अवस्थेतील लोकसंख्येचे प्रमाण न्यूनतम पातळीवर आणण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी ग्रामीण भागात शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी व इतर मूलभूत सुविधा माफक प्रमाणात उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे.

देशातील दारिद्र्य व आर्थिक विषमता कमी करण्यासाठी मानवी कौशल्ये विकसित करून शहरी व ग्रामीण भागात विविध क्षेत्रात रोजगार संधी निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

भारताच्या संरचनेत महिलांचे सहकार्य ५० टक्के असूनही त्याचा निर्णयप्रक्रियेतील व विकासप्रक्रियेतील सहभाग त्या प्रमाणात वाढलेला नाही. त्यासाठी युनोमार्फत १९७५ पासून महिला

वर्ष साजरे केले जात आहे. १९९५ मध्ये बिजिंग येथे भरलेल्या ४ थ्या महिला परिषदेमध्ये युनोच्या भारतासह सतरा देशांनी महिला सबलीकरणाची संकल्पना स्वीकारली आहे. सर्वसमावेशक वृद्धीसाठी प्राप्त परिस्थितीत भारतात महिलांना देण्यात येणारे अधिकार, सुविधा व शासकीय प्रयत्न अपुरे आहेत. इतकेच नव्हे तर देशाच्या ग्रामीण भागात शिक्षण, आरोग्य, स्वच्छतागृह व शौचालयाची उपलब्धता इत्यादी बाबतीत वाणवा आहे. अधिकतर सर्वसमावेशक वृद्धीसाठी महिलांना सार्वजनिक उपयुक्ततेच्या सुविधा प्राप्त करून देणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण व शहरी भागातील महिलामध्ये किमान आवश्यक कौशल्ये विकसित करून रोजगार संधी मिळवून देणे गरजेचे आहे. महिलांचा कामकाजातील वाढता सहभाग विचारात घेऊन महिलांच्या विकासासाठी धोरण ठरविण्यात यावे. परिणामी स्त्री-पुरूष यांच्यामधील अर्थिक व सामाजिक विषमता कमी होऊन समावेशक विकासास चालना मिळेल.

भारतात स्वातंत्र्योत्तर काळात दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमाचा एक भाग म्हणून सार्वजनिक वितरण प्रणालीचा स्वीकार करण्यात आला आहे. १९६५ ते १९९० पर्यंत गरिबांची गरीबी कमी करण्यात सार्वजनिक वितरण प्रणालीने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. १९९१ पासून मात्र आर्थिक सुधारणा काळात सार्वजनिक वितरण प्रणालीची उपयुक्तता घटत आहे. याला अनेक घटक जबाबदार आहेत. सद्यस्थितीत भारतातील गरीब व श्रीमंताची आर्थिक दरी कमी करण्यासाठी सार्वजनिक वितरणप्रणालीचा फेरविचार करण्याची आवश्यकता आहे.

देशातील ३६ टक्के लोक अद्याप निरक्षर आहेत. त्यातही ग्रामीण भागात निरक्षरतेचे प्रमाण अधिक आहे. या समाजाला गेल्या पंचवार्षिक योजनेत राबविण्यात आलेल्या विविध विकास योजनांचा फारसा लाभ झालेला नाही. हे वास्तव विचारात घेऊन प्राथमिक स्तरावरील मुलांच्या गळतीचे प्रमाण कमी करणे, व्यावसायिक शिक्षणाचा विस्तार करणे, उच्चशिक्षणात कौशल्य व रोजगारप्रधान उपक्रमावर भर देणे आणि पर्यायाने उपलब्ध शिक्षण व संशोधनाचा अधिकाधिक मानवी कल्याणासाठी उपयोग करणे-ही २१ व्या शतकात सामोरे जाण्यासाठी शासनाने पार पाडावयाची महत्त्वाची जबाबदारी मानता येईल. त्या दृष्टीने स्थानिक पातळीपासून राज्य व केंद्र सरकारपर्यंत सर्वच घटकांनी क्रियाशील असणे आवश्यक आहे. अलिकडेच केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री कपिल सिब्बल यांनी उच्च शिक्षणात दूरगामी बदल करण्याचे सूतोवाच केले आहे. हे सर्वसमावेशक वृद्धीच्या दृष्टीने टाकण्यात आलेले अचूक व दिशादर्शक पाऊल मानता येईल.

## सारांश :

भारताच्या आर्थिक विकासाची चौकट व १९५१ पासून नियोजित आर्थिक विकासासाठी निवडण्यात आलेले प्रतिमान याचे सिंहावलोकन केले असता आपणास असे दिसून येते की, शासकीय धोरण किंवा योजना या विकासास नेहमीच परस्परपूरक आहेत. मात्र त्याची अंमलबजावणी ज्या विशिष्ट आचारसंहितेत होणे गरजेचे आहे त्या प्रमाणात न झाल्यामुळे सर्वसमावेशक वृद्धी आतापर्यंत घडून आली नाही. सन २००७ पासून नियोजनकारांनी अधिकतर

सर्वसमावेशक वृद्धीचे तत्त्व प्रादेशिक समतोल विकास साध्य करण्यासाठी स्वीकारले आहे. शासनसंस्था, लोकप्रतिनिधी व सनदी नोकर विविध विकास योजनांची अंमलबजावणी किती प्रामाणिकपणे व प्रभावीपणे करतात त्यावरच समावेशक वृद्धीचे भवितव्य अवलंबून आहे.

## संदर्भ सूची:


1. Datta/Sundaram : Indian Economy, S. Chand Company, New Dehli, 60th ed. 2009
2. Eleventh Five year plan, (2007-12) : Vol. I : Inclusive Growth
3. Economic Survey : 2009-10: Oxford University press
4. Human Development Report : UNDP : 2008-09
5. Sahasrabudhe S.S., Kakade V.B., Dagade S.D.

   Fighting poverty and unemployment, Phadake Prakashan, Kolhapur 2002
6. World Development Report : 2008-09

७. प्रा. डॉ. जे. एस. पाटील : *सर्व समावेशक वृद्धी : संकल्पनात्मक व अनुभवजन्य विश्लेषण* (अध्यक्षीय भाषण) शिवाजी विद्यापीठ इकॉनॉमिक्स असोसिएशनचे २१ वे वार्षिक अधिवेशन २०१०

८. पाटील जे. एफ. : *अकराव्या पंचवार्षिक योजनेचा दृष्टिकोण : एक भूमिका,* प्रबोधन प्रकाशन ज्योती, इचलकरंजी, नोव्हेंबर २००६

९. पाटील जे. एफ. : *रोजगार बाजारातील चमत्कार,* दैनिक तरूण भारत, ३ सप्टेंबर, २००७

# जागतिकीकरण, लोकशाही व सेन यांची न्याय संकल्पना

**श्रीराम पेडगांवकर, पुणे,**
ए-५, व्हिस्परिंग विंड,
बाणेर-पाषाण लिंक रोड, पाषाण.
भ्रमणध्वनी: ९०११७२९३१०

---

प्रस्तावना :

भारत हा जगातील सर्वांत मोठा लोकशाही देश आहे. अलिकडेच संसदेची साठी उत्साहात साजरी झाली. लोकशाहीचा अविभाज्य भाग म्हणजे मुद्रण स्वातंत्र्य व प्रसार माध्यमाचे स्वातंत्र्य तांत्रिक प्रगतीबरोबर प्रसार माध्यमांचे स्वरुप व पोहोच (reach) वाढत आहे. दूरदर्शन वरील बातम्या व चर्चा व विविध प्रकारच्या जनआंदोलनाला त्यातून मिळणारी प्रसिध्दी यांचा परिणाम विविध प्रकारच्या अन्यायाला वेशीवर टांगण्यास मदत करीत आहे. देशात दुष्काळ, चारा टंचाई, पाणी टंचाई, भ्रष्टाचाराची प्रकरणे, मंत्र्याचे घोटाळे, संप, मोर्चे आदी बातम्या सरकारची झोप उडवितात. काहीतरी कारवाई होते. काहींना चौकशीला सामोरे जावे लागते. कालचे सत्ताधीश आज जेलची हवा खावू लागतात. उदाहरण घ्यावयाचे झाल्यास तहलकाने २००१ मध्ये बाहेर काढलेले एका मंत्र्याचे भ्रष्टाचार प्रकरण व आज २०१२ मध्ये त्यांना झालेली शिक्षा किंवा सत्यमेव जयते दूरदर्शनच्या कार्यक्रमातून वैद्यकिय विश्वाचे ओंगळ स्वरुप दाखविल्यानंतर कित्येक डॉक्टरांची भ्रूणहत्येची प्रकरणे बाहेर आली व इंडियन मेडिकल कौन्सिलने अनेक डॉक्टरांना निलंबित केल्याची प्रकरणे ताजी आहेत. अण्णा हजारे-रामदेव बाबांच्या जनआंदोलनाने भारतातील अशासकीय संघटनाचे (NGOS) दबाब तंत्र व या आंदोलनाला चिरडून टाकण्याचे सरकाचे प्रयत्न, जनलोकपाल बिल संसदेत मांडणे या घटना ताज्या आहेत. बरीचशी जनआंदोलने विशेषतः पर्यावरण, मानवी हक्क या संबंधातील आंतरराष्ट्रीय बिगर सरकारी संघटनांच्या माध्यमातून / मदतीतून उभारली जातात. ही गोष्ट जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून पुढे आल्याचे दिसून

येते. "अन्याय घडो कोठेही चिडून जाऊन आम्ही" अशी भूमिका घेणाऱ्या संस्था व व्यक्ती यांची संख्या वाढत आहे.

अमर्त्य सेन यांनी Poverty and Farmines या ग्रंथात लोकशाही व दुष्काळनिवारण यांच्या संबंधाचा अभ्यास केला आहेच. पण अलिकडे आपल्या Idea of Justice (२००९) या ग्रंथात सेन यांनी न्यायसंकल्पनेचा लोकशाही जागतिकीकरण, प्रसार माध्यमे, मुद्रण स्वातंत्र्य यांच्याशी संबंध जोडला आहे. प्रस्तुत निबंधात सेन यांच्या न्यायविषयक विचारांचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे.

### सेन यांची न्याय संकल्पना :

सेन यांची न्याय संकल्पना समजावून घेण्याआधी २० व्या शतकातील अत्यंत प्रभावी विचारवंत जॉन रॉल्स यांची न्याय संकल्पना व त्यावरील सेन यांचे आक्षेप विचारात घेणे जरुरीचे आहे.

रॉल्स यांची न्यायसंकल्पना हॉब्ज, रुसो, लॉक व काँट यांच्या करार सिध्दांताच्या परंपरेतील आहे. फरक एवढाच की, रॉल्स यांचा हा करार प्रत्यक्ष नसून तो अज्ञानाच्या पडद्याआड पारंपारिक स्थितीमध्ये घडतो.

त्यास निःपक्ष मताचे स्वरुप दिले आहे. त्यांच्या मते, "न्याय म्हणजे रास्तपणा" न्यायविषयक तत्त्वांची उत्पत्ती प्रारंभिक अवस्थेत होते. तेव्हा न्यायाची दोन तत्त्वे निष्पन्न होतात व या तत्त्वांचा संबंध स्वातंत्र्य व वाटप यांच्याशी आहे. या तत्त्वांप्रमाणे न्याय स्थापन करण्यासाठी संसद न्यायव्यवस्था कायदे अशा प्रकारच्या संस्थांची गरज आहे. अशा प्रकारच्या संस्थांची निर्मिती झाली की, न्याय आपोआप स्थापन होतो. कारण व्यक्ती समाजात नैतिक जाणिवेने जोडल्या जातात. अशा प्रकारच्या समाजाला रॉल्स यांनी सुघटित समाज (Well Ordered Society) हे नाव दिले आहे.

सेन यांनी रॉल्स यांच्या विवेचनातील पुढील प्रमुख तीन मुद्यांवर आक्षेप घेतला आहे.

१) संस्थात्मक व्यवस्थेपेक्षा प्रत्यक्ष वर्तणूक महत्त्वाची आहे. कारण न्यायाच्या स्थापनेसाठी संस्थांची निर्मिती आवश्यक असली तरी अशा संस्था निर्माण केल्या की आपोआप न्यायाची स्थापना होईल, याची ग्वाही देता येणार नाही.

२) रॉल्स यांनी न्यायाची संकल्पना करार तत्त्वावर उभारली आहे. सेन यांच्या मते, करार तत्त्वाला पर्याय असू शकतात. ॲडम स्मिथ यांनी मांडलेला तटस्थ प्रेक्षकांचा पर्याय सेन यांनी उचलला आहे. या पर्यायात प्रारंभिक स्थिती व करार या दोहांची गरज नाही.

३) तिसरा आक्षेप रॉल्स यांचा करार सिध्दांत देशांतर्गत न्यायाला लागू पडतो. करारातील व्यक्ती ज्या भूभागाशी संबंधित आहेत, त्यांनाच करार लागू पडेल. अशा करारात काही अंगभूत दोष असतील व त्यामुळे देशादेशामधील संबंधाचा व त्यातून निर्माण होणाऱ्या न्यायविषयक प्रश्नांचा विचार करण्यासाठी पर्यायी न्याय सिध्दांताची गरज आहे. रॉल्स यांचा सिध्दांत दहशतवाद जागतिक पर्यावरणाचा प्रश्न सोडविण्यास उपयोगी नाही. रॉल्स यांच्या न्याय सिध्दान्ताला सेन यांनी अलौकिक

संस्थावाद (Transendental Institutionalism) असे संबोधले आहे. कारण हा सिध्दांत आदर्श व्यवस्था कशी असावी, हे सांगतो व त्यासाठी कोणत्या संस्था उभ्या कराव्यात हे सांगतो. याठिकाणी न्याय व अन्याय असे दोनच पर्याय आहेत. कमी न्याय व अधिक न्याय अशी तुलना करता येत नाही. म्हणून त्यास अलौकिक असे संबोधले आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे पुर्णतेच्या शोधात अलौकिक संस्थावाद फक्त योग्य संस्था निवडण्यावर भर देतो. पण त्यातून प्रत्यक्ष कशा प्रकारचा समाज निर्माण होईल याचा वेध घेतला जात नाही. पण सेन यांच्या मते, समाजाची अवस्था केवळ योग्य प्रकारच्या संस्थावर अवलंबून नसते तर लोकांचे प्रत्यक्ष वर्तन आणि सामाजिक आंतरक्रिया अशा प्रकारच्या बिगर संस्थात्मक बाबींवर पण अवलंबून असते.

सेन यांच्या मते, सामाजिक निवड सिध्दांतातून सामाजिक न्यायाची स्थापना, अनुभूति व तौलनिक चर्चा या गोष्टी साध्य होऊ शकतात. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धातील फ्रेंच गणितज्ञ बोर्डो आणि कॉडर सेट यांच्या लिखाणात सामाजिक निवड सिध्दांतांचा आरंभ सापडतो. एखाद्या गटातील विभिन्न व्यक्तींच्या वैयक्तिक निवडीतून एकत्रीकरण करून गटाची निवड ठरविण्याची पध्दत म्हणजे सामाजिक निवड सिध्दांत. हा सिध्दांत क्लिष्ट गणिताच्या रुपात मांडण्यात आला असला तरी त्याची सोडवणूक करण्यात अनेक अडचणी उभ्या राहतात. यातून ॲरो यांचे 'अशक्यता प्रमेय' पुढे आले. अशक्यता प्रमेयाची सोडवणूक कशी करावी याचे बरेच विचारमंथन झाले. सामाजिक कल्याण फलाकडून काही किमान अटींची पूर्तता व्हावी, असा विचार ॲरो यांनी मांडला. पण या सर्व अटी एकाच वेळेस पूर्ण होत नाहीत व त्यातून अशक्यता प्रमेयाला दुजोरा मिळतो. अशा परिस्थितीत सामाजिक स्थितीची सामाजिक दृष्टिकोनातून क्रमवारी लावणे शक्य आहे, असे सेन यांचे प्रतिपादन आहे.

एखादी निवड करण्याच्या प्रक्रियेत सहभागी व्यक्तींनी आपली पसंती पूर्ण क्रमवारीने मांडली असली तरी हे सर्व पसंतीक्रम संवादी नसतील तरीही व्यक्तिगत क्रमवारीचा छेदसंच अपूर्ण क्रमवारी लोकांमधील समान धारणा व्यक्त करते. सेन यांच्या मते, अशी क्रमवारी सामाजिक निवडीसाठी पुरेशी आहे. रॉल्स यांच्या प्राथमिक अवस्थेतील पूर्ण संमती न्याय संकल्पनेसाठी आवश्यक नाही किंबहुना ती अपुरी आहे. अपूर्ण क्रमवारीत न्याय स्थितीची तुलना शक्य आहे. जी सर्वोत्तमचा ध्यास घेणाऱ्या रॉल्स् यांच्या विवेचनात शक्य नाही.

आपल्या सामाजिक निवड सिध्दांताचे न्याय सिध्दांत म्हणून महत्त्व स्पष्ट करण्यासाठी सेन यांनी सात युक्तिवाद मांडले आहेत. यापैकी सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सामाजिक निवड प्रक्रियेत सार्वजनिक तर्काला विशेष महत्त्व आहे. सामाजिक निवड सिध्दांत ॲरो यांच्यासारख्या गणिततज्ज्ञांनी गणिती भाषेत मांडला असला तरी त्याच्या सोडवणुकीत सार्वजनिक चर्चेला अनन्य साधारण महत्त्व आहे. माहितीत कोणता बदल केला असता प्रमेयाची सोडवणूक करता येईल, याचे उत्तर सार्वजनिक चर्चेतूनच मिळते.

सेन यांनी न्यायाच्या स्थापनेसाठी विवेकशील युक्तिवादाची शिफारस केली आहे.

अन्यायाला विरोध नाराजी व युक्तीवाद या दोहोंद्वारे केला जातो. नैराश्यातून दुःख होते. पण त्यातून आपल्याला प्रेरणा मिळू शकते व चर्चेद्वारे त्यातून मार्ग काढता येतो. अशा अन्याय निवारण्याच्या मार्गाचा सेन यांनी पुरस्कार केला आहे. विरोध डांबून न टाकता त्यावर चर्चा झाली पाहिजे. त्यांनी मेरी वोलस्टोन क्राफ्ट या स्त्रीवादी विदुषीच्या चीड आणणाऱ्या लिखाणाचा दाखला दिला आहे. क्षोभ वाढविणाऱ्या लिखाणातून योग्य बोध घेतला पाहिजे.

न्याय प्रश्नात न्यायासाठी पुढे येणारी कारणे अनेक असू शकतात. यांचा सेन यांनी विशेष उल्लेख केला आहे व ही गोष्ट त्यांच्या लिखाणाचे वेगळेपण दाखविणारी आहे. कारणे अनेक असतील व त्यांच्यातील तुलना शक्य नसेल तर कोणत्या मूल्याच्या आधारे न्याय व अन्याय यांच्यातील फरक ओळखावा हा प्रश्न निर्माण होतो. सर्वच मूल्ये आनंद व दुःख या रुपात व्यक्त करता आली तर (म्हणजे उपयुक्ततावाद) असा प्रश्न येणार नाही. न्यायाच्या संबंधातील निर्णय देतांना विविध प्रकारची कारणे व मूल्यमापनाची काळजी घेतली पाहिजे. विविध पर्यायी गोष्टीचा महत्त्वानुसार क्रम लावता येतो याचा अर्थ पर्यायांची व्यक्तीला पूर्ण क्रमवारी लावता येते, असा नव्हे. एखाद्या व्यक्तीला एका प्रश्नाच्या बाबतीत विविध पर्यायातून निर्णायक मत देता येते याचा अर्थ दुसऱ्याही प्रश्नाच्या बाबतीत तसे करता येईल असा होत नाही. त्यामुळे विवेकयुक्त विचारांनी काढलेले निर्णय आंशिक क्रमवारीचे रुप घेतात. पूर्ण क्रमवारीची शाश्वती नाही ही गोष्ट आपण मान्य केली पाहिजे. व्यक्तीच्या बाबतीत अपूर्ण अनिश्चिती ही नित्याची बाब असेल तर सामाजिक निवाड्यातही ती अपरिहार्यपणे स्वीकारावी लागेल. सामाजिक निवड व्यक्तिगत निवडीवर अवलंबून असल्यामुळे व्यक्तीगत निवडीचे सर्व गुणधर्म व अडचणी तीत जाणवणार. सामाजिक निवड व्यक्तिगत निवडीच्या अडचणीवर मात करुन कशी यशस्वी सिध्द करता येते. यासाठी सेन यांनी मेरी वोल स्टोन क्राफ्ट यांचा संदर्भ देवून स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते, गटातील विविध व्यक्तीमध्ये एखाद्या प्रश्नाबद्दल एकमत नसेल तर चर्चेतून ते विवेकाच्या आधारे इष्ट प्रकारे बदलवून घेता येते.

अनेक तर्क असणे ही बाब आंशिक पूर्णत्व सोडवणुकीमुळे बऱ्याच वेळा अडचणीची होत नाही. पण काही वेळा ही बाब गंभीर आव्हान निर्माण करते व सोडवणूक अशक्य बनते. ही गोष्ट सेन यांनी तीन विद्यार्थ्यांपैकी कुणाला बासरी देणे न्याय ठरेल याचे तीन तर्क दिले आहेत व ते सर्व सारखेच पटणारे आहेत. अशा परिस्थितीत न्यायाच्या प्रश्नाची सोडवणूक करणे कठीण आहे. हे त्यांनी मान्य केले आहे तेव्हा न्यायाची संकल्पना कधी एकमताची तर कधी निर्णय घेण्यास कठीण परिस्थिती, अनिर्णितता अशी परिस्थिती निर्माण करते. याचा अर्थ न्याय संकल्पनेत अशा एकमत न होणाऱ्या परिस्थितीचाही समावेश करावा लागतो. अनेक तर्क असतांना सुध्दा निश्चित निष्कर्ष प्राप्त होतात. अशा परिस्थितीत तौलनिक भार देण्याऐवजी भारांचा विचार न करता योग्य उकल कशी करता येईल, या दृष्टीने बघितले पाहिजे. पर्यायी समर्थनात काही ठिकाणी मत्यैक्य तर काही ठिकाणी मत भिन्नता असू शकते. काही पर्यायांची इतरांशी तुलना शक्य होते व क्रमवारी लावता येते. तर काही ठिकाणी तुलनाच शक्य नसते. अशा स्थितीत क्रमवारीतून मिळणाऱ्या समान घटकांचा छेदसंच

अपूर्ण क्रमवारी निर्माण करतो व त्यातून सामाजिक निवड करता येते.

सर्वसंमत अशा क्रमवारी काही बाबतीत नि:संदिग्ध निर्णय येईल तर इतर बाबतीत मौन ठेवणेच पसंत करेल.

याउलट अशी अनेक उदाहरणे सापडतात ज्यात अंश क्रमवारी व काही पोकळी उरते. जी आपणांस योग्य निर्णयाला मार्गदर्शक ठरू शकते. उदा. विश्लेषणात्मक छाननीद्वारे न्यायाच्या कारणांचा X हा पर्याय आपण Y व Z या दोहोंवर ठेवू शकतो व Y व Z च्या बाबतीत आपण कोणताच निर्णय घेऊ शकत नाही, अशा परिस्थितीत अंशक्रमवारीच्या साह्याने X ची निवड करता येते.

न्यायासंबंधीचे वाद विशिष्ट विवेकाशी निगडीत असतील तर ते तुलनेशी निगडीत असतील, न्याय वाढविणाऱ्या उपायांची तुलनात्मक छाननी करावी लागेल. फक्त न्यायपूर्ण समाजाची ओळख पुरेशी नाही.

त्यांच्या न्यायसंकल्पनेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे न्यायाविषयीची तर्कचिकित्सा एखाद्या भौगोलिक क्षेत्रापुरती सीमित न ठेवता ती वैश्विक असावी. स्मिथच्या तटस्थ प्रेक्षकाचा त्यांनी उल्लेख केला आहे. पुढील भागात याचा अधिक विस्ताराने विचार करु.

**लोकशाही व न्याय :**

सेन यांच्या न्याय संकल्पनेत लोकशाहीला अनन्य साधारण महत्त्व आहे. त्यांच्या मते लोकशाही व्यवस्था न्यायाच्या प्रस्थापनेचे साधन आहे. आपल्या मुद्याच्या स्पष्टीकरणासाठी त्यांनी लोकशाही संकल्पनेचा व तिच्या अंगभूत असलेल्या मतदान, सार्वजनिक चर्चा व मुद्रण स्वातंत्र्य या घटकांची सविस्तर चर्चा केली आहे. लोकशाहीचा एक अर्थ सार्वजनिक चर्चा असा घेतला जातो. सेन यांना न्यायाच्या प्रस्थापनेसाठी हा अर्थ अत्यंत उपयोगी वाटतो. त्यांच्यामते, अशी सार्वजनिक चर्चा देशापुरती सीमित न ठेवता वैश्विक पातळीवर होणे अधिक उचित ठरते.

जनतेचा सहभाग हा लोकशाहीचा दुसरा आणखी एक अर्थ त्यांनी विचारात घेतला आहे. जनतेचा सहभाग वाढल्यास न्यायाची सिध्दता सोपी जाते. जनतेचा सहभाग प्रत्यक्ष व अप्रत्यक्षही असू शकतो. अप्रत्यक्ष सहभागात निवडणुकांचा समावेश होतो. निवडून आलेल्या सभासदांनी जनतेचे प्रश्न मांडावेत, त्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी अपेक्षा असते. पण प्रत्यक्षात जनमत व प्रतिनिधींचे कार्य यात विसंवाद असू शकतो. अशा परिस्थितीत लोक प्रतिनिधींना परत बोलावण्याचा अधिकार असावा, अशी मागणी आज मूळ धरु पाहत आहे. निवडणूका म्हणजेच लोकशाही असे मानने लोकशाही व न्याय यांची सांगड घातल्यास पुरेसे नाही. तर निवडणुकाच्या परिणामकारितेसाठी भाषण स्वातंत्र्य, माहिती मिळविण्याचा अधिकार व भिन्नमत नोंदविण्याचा अधिकार या गोष्टी न्यायाच्या सिध्दतेसाठी मदत करणाऱ्या ठरतात, याकडे सेन यांनी लक्ष वेधले आहे.

जगामध्ये सार्वजनिक चिकित्सा विकसित करण्यास स्वतंत्र व स्वायत्त प्रसार माध्यमांची गरज असते. पण बऱ्याच देशात याचीच कमतरता आढळून येते. विशेषत: हुकूमशाही प्रणालीत मुद्रणस्वातंत्र्यावर बंधने येतात.

सुदृढ व मुक्त प्रसार माध्यमांची लोकशाहीला कशी मदत होते, याची सेन यांनी विस्ताराने चर्चा केली आहे.

अभिव्यक्ती स्वातंत्र्य व माध्यमस्वातंत्र्य यामुळे जीवनाची गुणवत्ता वाढविता येते. कारण माध्यम स्वातंत्र्यामुळे आम्हाला इतरांशी संवाद साधता येतो. याच्या अभावी एकाधिकारशाहीत मानवी जीवांची गुणवत्ता कमी असते. त्याचप्रमाणे प्रसार माध्यमे ज्ञान प्रसाराचे महत्त्वाचे कार्य करते. ज्यामुळे चिकित्सक परिक्षण शक्य होते. ज्या गोष्टी समाजापुढे आल्या नसत्या त्या प्रसार माध्यमांमुळे जनतेसमोर येतात. भारतात प्रसार माध्यमामुळे भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघडकीस आल्या आहेत.

आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे माध्यम स्वातंत्र्यामुळे समाजातील दुर्लक्षित व वंचित गटांची नोंद घेतली जाते. परिणामी मानवी सुरक्षिततेत वाढ होण्यास मदत होते. बऱ्याच वेळा शासनकर्त्यांना अशा समाजाची दु:खे समजू शकत नाही. माध्यमांनी ओरड केल्यानंतर अशा प्रश्नांची जाणीव निर्माण होते. माध्यम स्वातंत्र्यामुळे ती साधली जाऊ शकते. अशी आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे विवेकशील मूल्य निर्मिती. प्रसार माध्यमांना स्वातंत्र्य असेल तर नवीन मानके, नवे प्राधान्यक्रम निर्माण होण्याची प्रक्रिया सोपी जाते. याचा परिणाम जीवनाचा दर्जा वाढविण्यात होते. कुटुंबाचा आकार मर्यादित ठेवणे, स्त्री शिक्षणाला प्राथमिकता देणे अशा गोष्टी प्रसार माध्यमांवरील चर्चेतून, माहितीच्या प्रसारातून जनतेच्या मनावर बिंबवल्या जाऊ शकतात व लोकांच्या मानसिकतेत विचार प्रक्रियेत बदल घडू शकतो. प्रसार माध्यम व लोकशाही यातून न्यायाची सिध्दता कशी होते हे सांगण्यासाठी सेन यांनी आपल्या दुष्काळाच्या अभ्यासाचा दाखला दिला आहे. १९४३ सालच्या बंगालमधील दुष्काळाचे वास्तव वर्तमानपत्रे व प्रसार माध्यमे यामुळेच ब्रिटिश सरकार पुढे आले व त्यावर उपायोजना झाल्याचे त्यांनी नमूद केले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारत व चीन यांची दुष्काळ निवारण व भूकबळीची तुलना करुन त्यांनी भारताच्या या संबंधातील यशाला लोकशाहीच जबाबदार असल्याचे स्पष्ट केले आहे.

लोकशाही व विकास यांच्यातील संबंध स्पष्ट करतांना सेन यांनी विकास म्हणजे स्वातंत्र्य अशी भूमिका घेतली आहे. लोकशाहीचा संकेत असणाऱ्या देशात आर्थिक मंदीचा फटका अधिक नसतो. त्यामुळे दरडोई उत्पन्नात वाढ म्हणजे विकास नसून विकास म्हणजे शक्ततेत (Capabilities) वाढ व शक्ततेला संधी व स्वातंत्र्य यास महत्त्व आहे.

### जागतिक लोकशाही व न्याय :

मुक्त तटस्थता किंवा रास्तपणा ही रॉल्स यांची संकल्पना केवळ देशाच्या जनतेपुरती मर्यादित न ठेवता ती विश्वात्मक (जागतिक) असावी, असे सेन यांचे म्हणणे. त्यांच्या मते न्यायासंबंधीची सार्वजनिक (आम) तर्कचिकित्सा एखादे राज्य वा देशाच्या पातळीपेक्षा अधिक व्यापक व इतर देशातील जनतेचे हितसंबंध जोपासणारी असावी म्हणजे आपापसातील पूर्वग्रह दूर होऊन त्यांच्यातील रास्तपणाची भावना वाढेल. इतरांचा दृष्टीकोन विचारात घेतल्यामुळे आपली स्वत:ची तत्त्वे शोधण्याची व्याप्ती वाढेल व परिणामी आपलीच मते योग्य मानण्याची संकुचित वृत्ती, स्थानिक मूल्ये व रुढी यांचा पगडा कमी होईल. ॲडम स्मिथ यांच्या तटस्थ दृष्टीच्या भूमिकेतून न्यायाची चिकित्सा केली पाहिजे, असे सेन यांचे म्हणणे आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत देशादेशामधील

अवलंबित्व वाढले आहे. अशा परिस्थितीत या गोष्टीला अधिक महत्त्व आहे. उदाहरणार्थ ९/११ च्या हल्ल्याच्या संदर्भात अमेरिका कोणती भूमिका घेते याचा संबंध व परिणाम इराण, इराक, अफगाणिस्थान या सारख्या इतर देशातील लाखो लोकांच्या जीवनाशी निगडीत आहे. अमेरिका, युरोप यासारख्या प्रगत देशातील आर्थिक संकटाचा परिणाम आज संबंध जगाला भोगावा लागत आहे.

त्याचप्रमाणे एड्स आणि स्वाईन फ्ल्यू सारखे आजार एका देशातून दुसऱ्या देशात झपाट्याने पसरतात. ही प्रतिकुल परिस्थिती तर एका देशातील वैद्यकिय संशोधनाचा लाभ इतर अनेक देशांना मिळतो या अनुकूल परिस्थितीचाही विचार करावा लागेल. या सर्व गोष्टी परस्परांवलंबित्वाचे महत्त्व स्पष्ट करतात.

परस्परावलंबनात एका देशातील अन्यायासंबंधीची भावना इतर देशातील जीवन व स्वातंत्र्यावर परिणाम करते, याही गोष्टींचा विचार करावा लागतो. मार्टिन ल्यूथर किंग यांच्या "जगाच्या कुठल्याही भागात अन्याय घडत असेल तर त्याचा सर्व ठिकाणच्या न्यायालयाला धोका पोहोचतो." या वचनाचा सेन यांनी उल्लेख केला आहे. आपले शेजारी म्हणजे सामाजिक भौगोलिक सीमा असणारे देश राहिले नाहीत तर जगातील सर्वच देश व्यापार व दळणवळणाच्या साधनातील प्रगतीमुळे आपले शेजारी बनले आहेत. स्मिथ यांनी विधी, नैतिक व राजकीय युक्तीवादामध्ये संकुचित दृष्टीकोनाचा काय परिणाम होतो. यासाठी ग्रीसमधील शिशु हत्येच्या रुढीला प्लेटो ॲरिस्टॉअल सारख्या तत्त्वज्ञांनी विरोध केला नाही, इकडे आपले लक्ष वेधले आहे. सेन यांनी अलिकडच्या काळात भारत, चीन व कोरीया येथील स्त्रीभ्रूण हत्यांचा उल्लेख केला आहे. एखाद्या गुन्ह्याकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगवेगळ्या देशात रुढी परंपरेमुळे भिन्न असू शकतो. अशा परिस्थितीत इतर देशातील संबंधित कायद्याचा विचार केल्यास आपल्या देशातील कायद्यामध्ये इष्ट बदल करता येतात. आज बीड, परळी व महाराष्ट्रातील अनेक भागातील भ्रूणहत्येचे प्रकार पुढे येत आहेत.

दूरस्थ लोकांच्या मतांना, विरोधी मतांना आणि विश्लेषणाला गांभीर्याने घेणे ही एक सहभागात्मक प्रक्रिया आहे. ती लोकशाहीचा म्हणजेच लोकांच्या युक्तीवादावर चालणाऱ्या प्रणालीशी जवळ आहे. दोन्ही प्रक्रियेमध्ये बऱ्याच गोष्टी समान असल्या तरी त्या भिन्न व्यवस्था आहेत. लोकशाहीचे स्वरुप राजकीय मूल्यमापन करुन म्हणजे चर्चेद्वारे शासन असे असते तर दूरस्थ लोकांच्या दृष्टिकोनाला महत्त्व देऊन स्थानिक संकुचित दृष्टिकोनाचा त्याग याचा संबंध वस्तुनिष्ठ तेची मागणी असा होतो. लोकशाहीची मागणी सुध्दा राजकीय क्षेत्रात वस्तुनिष्ठता यावी यासाठी केली जाते. जागतिक लोकशाहीचा विचार करताना या साधर्म्याचा विचार करावा लागतो.

असे म्हटले जाते की, नजिकच्या भविष्यकाळात तरी जागतिक लोकशाही व जागतिक शासन यांचा विचार करता येणार नाही. ती एक अशक्यता आहे. ही गोष्ट मान्य करुन सेन यांनी लोकशाही याचा अर्थ जनतेचा युक्तीवाद असा घेतला तर जागतिक लोकशाही हे स्वप्न नव्हे तर वास्तव म्हणून स्विकारता येईल. वेगवेगळ्या ठिकाणांवरुन येणाऱ्या मतांची चिकित्सा करुन एखाद्या देशात न्याय निवाडा होत असेल म्हणजेच संकुचित राष्ट्रवादात बदल होत असेल तर ती जागतिक लोकशाहीचीच प्रक्रिया

होय. अशा प्रकारची लोकशाही स्थापन करण्यात स्वयंसेवी संस्थांचा वाटा मोलाचा ठरतो. अशा संस्थांमुळे माहितीचा प्रसार घडून त्यायोगे जागतिक पातळीवर चर्चा घडू शकते. या स्त्रोताची अनेकता जागतिक लोकशाहीची व्यापकता वाढविते.

या कामात संयुक्त राष्ट्रसंघ व तिच्या सहयोगी संस्था याचबरोबर नागरिक संघटना व अनेक अशासकीय संघटना व प्रसार माध्यमे यांचा वाटा महत्त्वाचा आहे. याच्या जोडीला अनेक चळवळ्या व्यक्तींनी घेतलेला पुढाकार तेवढाच मोलाचा आहे. भारताच्या संदर्भात आज अण्णा हजारे, बाबा रामदेव, मेधा पाटकर, अमीर खान अशी अनेक नावे समोर येतात. अशा प्रकारच्या चळवळीला मुलकी समाज असे म्हणतात. त्याचा पुढील भागात विचार केला आहे.

## मुलकी समाज :

डॉ. पुटनम यांनी आपल्या "Making Democracy Work" या ग्रंथात चांगल्या प्रशासनासाठी मुलकी समाजाची आवश्यकता प्रतिपादली आहे. सेन यांनी "मुलकी समाज" हा शब्द वापरला नसला तरी त्यांच्या लोकशाहीच्या कल्पनेत तो गृहित आहे. नागरी मानके व सामाजिक संबंधांचे जाळे लोकशाहीचे कार्य सुलभ करतात, मुलकी समाजाची कल्पना ग्रामस्की यांच्या लिखाणात आढळते. त्यांच्या मते, राज्यशासन, बाजार आणि कुटुंब व्यवस्था सोडून अशी ही व्यवस्था असते. राज्याकडून होणाऱ्या अन्यायाचे निवारण करण्याची ती लोक चळवळ आहे. फिलीप पेटिट यांनी सुध्दा लोकशाहीत लोकांचा आवाज महत्त्वाचा असतो व त्यासाठी मतदान व्यतिरिक्तच्या अहसमती नोंदविणे विरोध करणे या मार्गाचा उल्लेख केला आहे. त्यांच्या मते लोकांच्यामध्ये चर्चा झाल्यास विरोधातूनही एकमताकडे प्रवास घडू शकतो. यासाठी लोकशाहीला सामान्य समूहाची (Common Places) गरज आहे.

१९९० च्या दशकात मुलकी समाजाने आंतरराष्ट्रीय स्वरुप धारण केले व सेन यांनी उल्लेख केल्याप्रमाणे त्यामध्ये आंतरराष्ट्रीय माहितीजालामुळे अनेक प्रश्नांचा, त्यावरील आंदोलनाचा व जनजागृतीचा समावेश झाला. उदा. पर्यावरण, हवामानात बदल, धरणे, एड्स, कंपन्याचे सामाजिक उत्तरदायित्व या संबंधीचे लढे. मुलकी समाजाचा आजपर्यंत समाविष्ट नसणारा ग्रामस्कीला अभिप्रेत नसलेला, महत्त्वाचा गट म्हणजे अशासकीय संघटना. बऱ्याच वेळा अशा संघटनांना सरकारचे व आंतरराष्ट्रीय संघटनांचे पाठबळ असते.

मुलकी समाजाने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक प्रश्नांना वाचा फोडली आहे. अनेक समस्यावर विचारमंथन करावयास लावले आहे. यापैकी काही प्रश्नांची सोडवणूक करण्यात ही यश संपादन केले आहे. उदा. भारतात माहितीचा अधिकार, अन्न सुरक्षितता कायदा, स्त्रियांचे शिक्षण, रोजगार आदी सबलीकरणाचे प्रयत्न याबाबतीत बऱ्याच अंशी यश मिळाले असले तरी नर्मदा बचाव आंदोलन, भ्रष्टाचार निर्मूलन, रोजगारीचा प्रश्न, महागाई अशा अनेक प्रश्नांवर मुलकी समाजाला यश मिळाले नाही. एवढेच नव्हे तर मुलकी समाज विरुध्द संसदीय लोकशाही असा संघर्ष उभा राहिला आहे. बाबा रामदेव व अण्णा हजारे यांची जनआंदोलने ज्याप्रकारे हाताळली गेली त्यावरुन ही गोष्ट स्पष्ट होते. मुलकी समाजाची एक महत्त्वाची मर्यादा म्हणजे त्यांचे आर्थिक स्त्रोत. बऱ्याचवेळा जागतिकीकरण व नवउदारमतवाद यांची भाटगिरी करण्यासाठी जागतिक बँक व अनेक

बहुराष्ट्रीय कंपन्या त्यांना आर्थिक मदत करतात. अशा परिस्थितीत त्यांचा आवाज हा जनतेचा आवाज कसा राहील?

**चर्चा व समारोप :**

प्रस्तुत निबंधात सेन यांच्या न्यायसंकल्पनेचा परिचय करुन देणाचा प्रयत्न करण्यात आला आहे. सेन यांची तळमळ जगातील अन्याय कमी कसा होईल, ही आहे. न्यायाच्या तात्त्विक विवचेनापेक्षा न्याय प्रस्थापित करण्यासाठी काम केले पाहिजे, यांवर त्यांचा भर आहे. न्याय प्रस्थापनेसाठी लोकशाही हा मार्ग आहे व लोकशाहीचा त्यांचा अर्थ लोक सहभाग, लोक चळवळी मानवी अधिकार चळवळ व प्रसिध्दी माध्यमांद्वारे जनजागृती, पण या चळवळींना विवेकाचे अधिष्ठान पाहिजे, म्हणजेच त्यांनी न्याय संकल्पनेचा पाया नीति हाच असतो, हे गृहित धरले आहे. पण ही नीतीची कल्पना त्यांनी आदर्शवादी न ठेवता वर्तनवादी केली आहे. त्यांची नीति मिमांसा अर्थशास्त्राच्या चौकटीत होते. ही मर्यादा म्हणावी तर दुसऱ्या बाजूला आर्थिक विवेचनात नीतितत्त्वांचा समावेश करुन त्यांनी अर्थशास्त्राची व्याप्ती वाढविल्याचे दिसून येते. तेव्हा नीतिशास्त्र व अर्थशास्त्र या दोहोंचाही विचार समाजात न्याय प्रस्थापित करण्यासाठी कसा आवश्यक आहे, हे दाखविण्याचा प्रयत्न या समारोपात करावयाचा आहे.

न्यायाचा संबंध मानवी वर्तनाशी आहे, हे वर्तन (आपल्या कल्पनेप्रमाणे जगण्याचा) ठरविण्याचा अधिकार असावा या अर्थाने आपण व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करतो. पण हे स्वातंत्र्य व्यक्ती व्यक्तीमधील संबंध बिघडवीत असेल तर त्यावर नियमनाची (नियंत्रणाची) गरज भासते. हे वर्तन योग्य का अयोग्य हे दाखविण्याचे काम नीतिशास्त्र करते. चांगले काय, वाईट काय यातून मूल्यनिर्मिती होते व ती नीतिमीमांसा होय. पण नीतीला व्यवहाराची जोड लावण्यासाठी नीतिशास्त्राची गरज आहे. नीतिशास्त्राचे दोन भाग १) आदर्शवादी २) प्रत्यक्षवादी.

आदर्शवादी नीती शास्त्राचा संबंध व्यक्तीच्या वर्तनाला मार्गदर्शन करण्यासाठी वा जगण्याला अर्थ देण्यासाठी नियम बनविणे हा असतो तर प्रत्यक्षवादी नीतीशास्त्राचा भर व्यक्तीच्या वर्तनाचे निरीक्षण करुन त्याच्या वर्तनामागील नियमाचा शोध घेणे हा असतो.

पहिल्या प्रकारच्या नीतिशास्त्राचा विकास ॲरिस्टॉटल, बेंथॅम, मिल यांनी केला आहे. त्यांच्या विचारात चांगल्या जीवनाची कल्पना होती. नीतितत्त्वासाठी त्यांना जगाचे अंतिम सत्य ईश्वर यांची आवश्यकता वाटत होती. युरोपीय दर्शनकार कांट यांनी दृष्य आणि सद्‌वस्तू यात भेद केला आहे. सद्‌वस्तूंचे ज्ञान केवळ शुध्द बुध्दीलाच होईल. विज्ञानाच्या प्रगतीबरोबर धर्म व अध्यात्म यांचा मानवी जीवनावरील प्रभाव कमी होऊ लागला. त्याचबरोबर प्रत्येक धर्म पंथ यांचे तत्त्वज्ञान भिन्न असते. तसेच धार्मिक म्हणजेच नीतिमान असे वैयक्तिक आचरणात दिसून येत नाही. धर्म व पंथ यांचा उपयोग शुध्द आचरणापेक्षा फाजील अभिमान व त्यातून समाजात दूरी निर्माण करणे, अशी अनेक उदाहरणे दिसून येतात. अशा परिस्थितीत न्यायासंबंधीचा विचार राज्यशास्त्रीय सिध्दान्ताच्या रुपात मांडण्याचा प्रयत्न रुसो, लॉक, जॉन रॉल्स आदि करार सिध्दान्तवाद्यांनी केला. अध्यात्म व धर्म यांचा आधार न घेता माणसा माणसांमधील संबंधाचे नियमन करुन समाजामध्ये

संवाद व व्यक्तीचा विकास कसा साधता येईल, हाच त्यांच्या विचारांचा मुख्य विषय होता. रॉल्स यांच्या न्यायतत्त्वामधून ही गोष्ट स्पष्ट होईल. कान्ट यांच्या प्रभावाखाली रॉल्स यांनी नैतिक शक्तीमुळे मुक्त आणि समाज विवेकी व्यक्ती हे मानवी स्वभावाचे वैशिष्ट्य निर्माण होते, असा दावा केला आहे. पण नंतरच्या विवेचनात नीतीमय व्यक्ती स्वतंत्र व समान आहेत व समानतेचा अर्थ हक्कांची समानता असा घेतला आहे. नैतिक व्यक्तीचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्यात सामंजस्य (Reasonable) आणि विवेकशील (Rational) असण्याची क्षमता असते. कान्टच्या प्रेरणेने रॉल्स यांनी विवेकशील स्वायत्तता (Rational Autonomy) ही संकल्पना मांडली. अध्यात्मापासून मुक्त करुन नीती तत्त्वांचा शोध घेण्यासाठी रॉल्स यांनी प्रारंभिक अवस्था ही कल्पना मांडली. या प्रारंभिक अवस्थेचा उद्देश न्यायतत्त्वामध्ये व्यक्तीच्या धर्म, जाती, जन्मस्थान आर्थिक, सामाजिक स्थिती व त्यांचा अभिनिवेश यांचा परिणाम होऊ नये. अज्ञानाच्या पडद्याआड (Veil of Ignorance) सर्व व्यक्तींना समान लेखणे अभिप्रेत आहे. याचबरोबर रॉल्स मांनी मांडलेली सुघटित समाज ही कल्पना एका व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा दुसऱ्या व्यक्तीवर विपरित परिणाम होऊ नये, अशा प्रकारची अपेक्षा ठेवणारी आहे. व्यक्ती स्वातंत्र्याला महत्त्व, व्यक्ती विकासाला संधी दिली जाते. पण हे स्वातंत्र्य इतर व्यक्तींच्या स्वातंत्र्यावर बाधा आणणारे नसावे. हा रॉल्स प्रणीत विवेकशीलतेचा व समंजस व्यक्ती (Reasonable Person) चा विचार आहे. आरंभिक स्थितीच्या काल्पनिक प्रतिमानातून रॉल्स "न्याय म्हणजे रास्तपणा" ही न्याय संकल्पना स्पष्ट करतात. कान्ट यांच्या (Hypothetical Impertive) काल्पनिक आज्ञा ची जागा रॉल्स यांच्या विवेचनात निवडीची विवेकशील तत्त्वे (Rational Principles of Choice and Deliberation) ने घेतली आहे. कान्ट यांच्या नैतिक कायद्याची जागा समंजस आणि न्यायाची समजूतदार तत्त्वाने घेतली आहे.

व्यक्ती स्वातंत्र्याला महत्त्व देवूनही त्याचा दुरुपयोग होऊ नये. म्हणून आपल्या विवेचनात वितरणाच्या न्यायाचा विचार रॉल्स यांनी दुसऱ्या न्यायतत्त्वात मांडला आहे.

न्यायाच्या प्रस्थापनेसाठी रॉल्स मांनी वेगवेगळ्या संस्थांच्या निर्मितीवर भर दिला आहे. पण केवळ संस्थाची निर्मिती पुरेशी नाही. त्याचबरोबर व्यक्तीचे आचरण बदलणे जरुरीचे आहे, असा विचार त्यांनी आपल्या संवाद तत्त्वात मांडला आहे. सुघटित समाजात व्यक्ती इतरांचा विचार करते. त्यामुळे विवेकशीलतेच्याच आधारावर न्यायाची संकल्पना होते, असा बोध त्यांच्या लिखाणातून होतो.

रॉल्स यांच्या विचारातील विवेकशीलतेची संकल्पना स्वातंत्र्याला महत्त्व, वंचिताचा वितरणात विचार या गोष्टी मान्य करुनही सेन यांनी रॉल्सच्या नीतीतत्त्वांवर दोन प्रमुख आक्षेप घेतले आहेत. याचा उल्लेख आपण भाग २ मध्ये केला आहे. एक म्हणजे संस्थांची निर्मिती न्याय प्रस्थापित करेलच असे नाही व दुसरा आक्षेप हीच एकमेव न्यायतत्त्वे असू शकत नाहीत. रॉल्स यांच्या न्याय तत्त्वांना सेन अलौकिक म्हणतात. याचा अर्थ आदर्श समाज व्यवस्थेचा विचार त्यात आहे. समाजात रोज आपण अन्याय पाहतो आहे व तो हजारो वर्षापासून चालू आहे. तेव्हा पूर्ण न्यायी समाजाची निर्मिती

करण्याऐवजी कमी अन्यायी समाजाचा आपण विचार केला पाहिजे. यातूनच त्यांनी तौलनिक न्यायाची कल्पना मांडली आहे. सेन यांचा न्यायविचार विवेकशीलतेवर आधारीत आहे. चांगले व वाईट यांचा तौलनिक विचार (चिकित्सा) व्हायला पाहिजे. असा विचार संबंधित समाजातील प्रत्येकाने केला पाहिजे. पण त्याचबरोबर बाहेरच्या तटस्थ प्रेक्षकांचा विचारही तेवढाच महत्त्वाचा आहे. अन्यायाच्या जाणिवेने न्यायाचा विचार पुढे येतो. ही जाणीव दरवेळी खरी असेलच असे नाही. म्हणूनच चर्चा व चिकित्सा यांचे महत्त्व यामध्ये प्रसार माध्यमे, लोक चळवळी यांचा वाटा सेन यांनी अधोरेखित केला आहे. त्यामुळे सेन यांचा न्यायविचार प्रत्यक्षवादी नीतीविचार आहे.

सेन यांनी न्यायाची संकल्पना अर्थशास्त्रीय सिध्दान्त व अभ्यास पध्दती यांच्या चौकटीत मांडली आहे. नवसनातनी अर्थशास्त्रास छेद न देता त्यांनी वेगळे अर्थशास्त्र मांडले आहे. अर्थशास्त्राची विवेकशील निवड हा सिध्दांत मान्य करुनही त्यांनी अर्थशास्त्र स्वार्थी व व्यक्तिकेंद्रित होऊ दिले नाही. आपल्या रॅशनल फूल्स (विवेकी मुर्ख) या लेखात त्यांनी विवेकशीलतेची कल्पना "स्व"बरोबर इतरांचा विचार करावयास लावणारी आहे. ही गोष्ट स्पष्ट केली. इतरांचा विचार "स्व" मध्ये घालून विवेकशीलतेला त्यांनी नवे परिमाण दिले. इतरांसाठी त्याग करावा वाटणे, बलिदान करणे या गोष्टी पण विवेकशील आहेत. तेव्हा अध्यात्माचा उल्लेखही न करता, आत्मौपम्य बुध्दीची कल्पना त्यांनी मांडली आहे. काय आहे सेन यांचे अर्थशास्त्र ? सेन यांचे अर्थशास्त्र कल्याणकारी अर्थशास्त्र आहे. पण ते आदर्शवादी नसून प्रत्यक्षवादी आहे. त्यांचे अर्थशास्त्र सामाजिक निवडीचे अर्थशास्त्र. ही सामाजिक निवड व्यक्तीच्या पसंतीवर अवलंबून असते, ही ॲरोप्रणित वस्तुस्थिती मान्य करुनही त्यांनी अशक्यता प्रमेयातून वाट काढली आहे. सामाजिक निवडीत नीती तत्त्वे बाहेरुन घेण्याची गरज नाही तर ती व्यक्तींच्या पसंतीतून व्यक्त होतात. जे सर्वमान्य आहे, असे किमान अपेक्षित वर्तन त्यांनी स्वयंसिध्द गृहितकाच्या रुपात मांडून सामाजिक निवडीची प्रक्रिया सोपी केली. निवडीला पूर्ण क्रमबध्दता आवश्यक नाही. अपूर्ण क्रमबध्दतेच्या परिस्थितीत सामाजिक निवड शक्य आहे. याचा विचार सामाजिक निवडीत बसवितांनी त्यांनी एखाद्या सामाजिक धोरणाची व परिस्थितीची दुसऱ्या संबंधित धोरणाशी परिस्थितीशी तुलना करुन कमी जास्त व बरोबर या त्रयीतून निवड करावी लागते, असे साधे सोपे सूत्र सांगितले. पण ही निवड विवेकशील व्हायला पाहिजे. यासाठी त्यांनी विचारमंथनावर भर दिला. लोकांमध्ये एखाद्या धोरणाची / रुढी परंपरेची सार्वत्रिक चिकित्सा झाली पाहिजे व त्यातून न्याय धोरणे ठरविली पाहिजे यावर त्यांनी भर दिला. जनतेच्या रेट्याने धोरणात बदल व्हावा, ही लोकशाहीची कल्पना मांडताना हा रेटा योग्य गोष्टीचा असण्यासाठी त्यांनी चिकित्सेला महत्त्व दिले. त्यांनी अकबराच्या राहीअक्लचा (बुध्दीचा मार्ग) योग्य उल्लेख केला आहे. त्यांच्या मते, भारतीय संविधानात अंतर्भूत अनेक गोष्टी अकबराच्या नीतीतत्त्वामध्ये होत्या.

आपल्या "तटस्थ" प्रेक्षक या संकल्पनेतून सेन यांनी न्यायाच्या निवडीतील प्रादेशिक, संकुचित रुढीच्या मर्यादा घालवून तो वैश्विक करण्याचा प्रयत्न केला आहे. रॉल्स यांची

न्यायतत्त्वे विशेषतः वितरणाचा न्याय देशाच्या पातळीवरच लागू होता. वैश्विक शासन लोकशाहीतील जन आंदोलने व प्रसार माध्यमे, अशासकीय संस्थाचे कार्य यातून शक्य आहे, असा सेन यांना विश्वास वाटतो. पण याचा अर्थ देश पातळीवरील शासन व्यवस्थेला हा पुर्ण पर्याय होईल, असा नाही. रॉल्स यांचा सुघटित समाज देश पातळीवरचाच आहे. सेन यांच्या लोकचिकित्सेतून प्रश्नांची निवड व सोडवणूकीचा प्रयत्न यामुळे मुलकी समाजाच्या परिणामकारकतेवरील मर्यादा कमी होऊ शकतात. जन आंदोलन खरोखर जनतेचा आवाज उठवणे ती कुणा इतरांचे हितसंबंध जपणारी असू नयेत, यासाठीच लोकचिकित्सा आवश्यक आहे. जे सत्य असेल तेच टिकेल.

पण असे असूनही जनआंदोलने यशस्वी होत नाहीत. विशेषतः भ्रष्टाचारविरोधी आंदोलन / लोकपाल विधेयक याबाबतीत भारतीय मुलकी समाजाला यश मिळत नाही. आंदोलनकर्त्यावरच भ्रष्टाचाराचे आरोप लावण्यात येतात. अशा परिस्थितीत एकटे अण्णा पुरेसे नाहीत. स्वतःच्या नैतिक आचरणाचा प्रभाव वाढविणाऱ्यांची संख्या वाढली पाहिजे. समाजात सत्य, अहिंसा यासारखी मूल्ये दृढ करण्यासाठी वेगळ्या आंदोलनाची गरज आहे.

स्वयंसेवी संघटना मुलकी समाजाचा एक घटक आहे. या संघटना समाजातील नैतिक मूल्यांचे संवर्धन करणण्याचे काम करु शकते. अशा प्रकारची काही कामे त्यांनी पर्यावरण संरक्षण व्यसनमुक्ती हुंड्या सारख्या रुढी विरोधात केल्याचे दिसून येते. प्रत्यक्षवादी नीतिशास्त्रात लोकांच्या वर्तनावर धर्म, रुढी, पाश्चात्य परिणाम आणि व्यक्तिगत श्रध्दा यांचा परिणाम होतो, ही स्थिती गृहीत धरलेली आहे. अशा परिस्थितीत स्वयंसेवी संघटनांनी समाजाच्या विकासासाठी सुयोग्य नीति मूल्यांच्या संवर्धनाचे कार्य केल्यास आंदोलनाला बळ मिळेल, भ्रष्टाचार रोखण्यास मदत होईल. लोकपालसारख्या कायद्याची गरज आहे. पण केवळ कायदे करुन भ्रष्टाचार कमी होणार नाही. सेन यांनी सुध्दा कायद्याच्या मर्यादा, विशेषतः कुटुंबातील स्त्री-पुरुष समानतेच्या संदर्भात मान्य केल्या आहेत. रॉल्स यांनी न्याय्य समाज व्यवस्थेसाठी सुघटित समाजाची अपेक्षा केली आहे. पण प्रत्यक्षात असा समाज हे स्वप्नच ठरते. आपल्या स्वातंत्र्यासाठी व्यक्ती इतरांच्या स्वातंत्र्याचा विचार करत नाहीत. तेव्हा शासन, न्यायसंस्था अशा प्रकारच्या नियोजक संस्थांची गरज भासते. पण अमर्याद सत्तेमुळे संसदीय लोकशाहीमध्ये लोकांचा विचार कमी होतो. ती केवळ शाही बनते. तेव्हा जनआंदोलनातून खरी लोकशाही व त्याद्वारे न्यायाची प्रस्थापना करण्याची गरज पडते. संपूर्ण न्याय्य समाज स्थापता येत नसला तरी सेन यांनी म्हटल्याप्रमाणे समाजातील अन्याय कमी करता येतो व त्यासाठी सद्‌सद्‌विवेक बुध्दीच्या कसोटीवर उतरणारे विचार रुजविण्याची गरज आहे. न्यायाची लढाई ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. नवीन प्रश्न येतात. समाजाच्या विकासाबरोबरच वर्तनाच्या अपेक्षात बदल होतो. यादृष्टीने न्यायाची संकल्पना गतिशील असली पाहिजे. सेन यांच्या न्याय संकल्पनेत ही गतिशीलता दिसून येते. एकंदरीत जागतिकीकरणाच्या संदर्भात सेन यांनी तटस्थ प्रेक्षक व लोकसहभागातून लोकशाही या संकल्पना मांडून अखंड जागरुकता व जनआंदोलनाचा पुरस्कार केला आहे. अशा

आंदोलनाला स्वयंसेवी संघटनांच्या नीतिमूल्यांचे संवर्धन करण्याच्या कार्याला हातभार लागल्यास न्याय समाजाकडे वाटचाल सोपी होईल, असे वाटते.

**संदर्भ सूची:**


1. Chandhoke Neera (2012) *Whatever has happened to civil Society?* EPW June - 9

2. Dani Rodrik (2011) *"Globalization Paradox"* Oxford University Press, Oxford

3. Duboi Jean LUC (2009) *"Search for Socially Sustainable Development"* in Gotah et-al

4. Freman (2008) "*Rawls*" Routledge London New-York

5. Gotoh Reiko and Paul Dumounchel (2009) *"Against Injustice"* Introduction - Cambridge university Press

6. Judge Ranjit (2011) *"An Ambiguous Actor"* EPW Nov. 12

7. Moore Mike (2009) *"Saving Globalization"* Wiley John Wiley and Son's

8. Pettit Philip (2009) *"Power to Democratic Public"* in Gotoh Reiko et_al (2009)

9. Rawls John (1999) *"A theory of justice"* Revised edition Harward University Press

10. Sen Amartya (2009) *"Idea of Justice"* Alen Lan and Penguin London.

११. बेलसरे के. वि. (१९६२) *"अध्यात्म दर्शन"* त्रिदल प्रकाशन, मुंबई

१२. अमीरखान यांच्या स्टार प्रवाह या वाहिनीवरील सत्यमेव जयते या कार्यक्रमातील २७/०५/२०१२ रोजीचे प्रसारण

१३. महाराष्ट्र टाईम्स व दैनिक सकाळ या वृत्तपत्रातील जून व जुलै दरम्यानच्या अंकातील बातम्या, वाचकांच्या प्रतिक्रिया.

# किरकोळ किराणा क्षेत्रातील थेट परकीय गुंतवणूक

**दीपक बी. भामरे**, लोणावळा,
प्राचार्य, एन.बी. नवले कॉमर्स कॉलेज,
भ्रमणध्वनी: ९८९०७९०७८१

**प्रियंका दीपक भामरे**, लोणावळा,
सहाय्यक प्राध्यापक, एन.बी. नवले कॉमर्स कॉलेज,
सिंहगड कॅम्पस.

प्रास्ताविक:

आर्थिक सुधारणा होण्यासाठी सन १९९१ नंतर सरकारने प्रथमत:च नागरी विमान वाहतूक, प्रसारक व मल्टीब्रॅन्ड रिटेल या तीन क्षेत्रात परकीय थेट गुंतवणूकीच्या मर्यादा वाढविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. या निर्णया संदर्भात देशात व विदेशात संमिश्र प्रतिक्रीया उमटल्या. विदेशात या निर्णयाचे स्वागत झाले तर देशात मात्र मोठ्या प्रमाणात विरोध झाला, काही घटक पक्षांनी सरकारचा पाठींबा मागे घेतला तर काहींनी राजकीय सोयीसाठी पाठींबा सुरु ठेवला त्यामुळे देशातील राजकीय वातावरण ढवळून निघाले. प्रत्यक्षात किरकोळ विक्री क्षेत्रातील थेट विदेशी गुंतवणूक देशाच्या आर्थिक विकासासाठी व आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाची आर्थिक पत उंचवण्यासाठी कशी फायदेशीर आहे याबद्दल ठोस स्वरुपात माहिती विविध घटकांना माहीत नसल्यामुळे प्रस्तुत लेखात ''किरकोळ किराणा विक्री क्षेत्रातील थेट परकीय गुंतवणूकीमुळे नेमक्या कोणत्या संधी प्राप्त होणार आहे व त्या सोबत संभाव्य धोके कोणते'' या विषयावर चर्चा पुढील विविध पैलुंच्या माध्यमातून स्पष्ट करण्यात आली आहे.

किरकोळ व्यापार क्षेत्रातील थेट परकीय गुंतवणूक निर्णयामागील पार्श्वभूमी - जागतिकीकरणामुळे जागतिक अर्थव्यवस्थेपासून आपल्या देशास अलिप्त राहणे शक्य नाही. कारण देशाच्या सर्वांगीण विकासासाठी आपणास अनेक देशासोबत विविध करारमदार, देवाण घेवाण इ. संदर्भात विविध अटी पाळून निर्णय घ्यावे लागतात. तसेच गेल्या काही वर्षापासून राजकीय हितसंबंध

व प्रादेशिक पक्षीय राजकारणामुळे अर्थकारणा बाबत सरकारचे मोठ्या प्रमाणावर दुर्लक्ष झाले व त्याचाच परिणाम म्हणून आंतरराष्ट्रीय पातळीवर अर्थव्यवस्थेची पत घसरु लागली कारण देशाची आयात निर्यातीपेक्षा अधिक होऊ लागली त्यामुळे परकीय गंगाजळीचे प्रमाण कमी होऊ लागले. या सोबतच ६% पर्यंत असलेली वित्तीय तुट, वाढता महसुली खर्च, औद्योगिक उत्पादन वाढीचा घसरता दर, परकीय गुंतवणूकीत एप्रिल २०१२ अखेर झालेल्या ४१% घटीमुळे परकीय चलनाचा ताण यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर मनमोहनसिंग याच्या धोरणावर होणारी टिका ही वस्तुस्थिती एकीकडे होती.

तर दुसरीकडे कॉंग्रेस अंतर्गत वर्चस्वामुळे आर्थिक सुधारणाच्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत होणारा विलंब या मागील प्रमुख कारण म्हणजे अर्थ खाते पंतप्रधानाकडे नव्हते, तर ते प्रणव मुखर्जी यांनी अट्टाहासाने स्वत:कडे घेतले होते. अर्थमंत्री असलेल्या प्रणव मुखर्जी यांचा कर्मठ व जोखमी न पत्करण्याचा स्वत:चा दृष्टीकोन या सोबत त्यांच्यावर सरकारने टाकलेल्या विविध जबाबदाऱ्या व सरकारसाठी संकटमोचन म्हणून त्यांना पार पाडाव्या लागणाऱ्या भूमिकेमुळे त्यांचे आर्थिक विकासासाठी संबंधीत धोरणाकडे दुर्लक्ष झाले. मात्र दरम्यानच्या काळात ते देशाचे राष्ट्रपती झाले व त्यामुळे चिदंबरम देशाचे अर्थमंत्री झाले. चिदंबरम यांनी वरील पदाची सूत्रे घेतल्यावर अर्थव्यवस्थेची स्थिती सुधारण्यासाठी कठोर निर्णय घेण्याची आवश्यकता परिपूर्ण आकडेवारीसह सरकार व कॉंग्रेस श्रेष्ठी समोर स्पष्ट केली. इतकेच नव्हे तर देशाच्या आर्थिक विकासाचा मंदावलेला वेग वाढण्यासाठी, सामाजिक न्याय व कल्याणकारी योजनांच्या परिपूर्तीसाठी, कृषी क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी, आंतरराष्ट्रीय पातळीवर अर्थव्यवस्थेची पत उंचविण्यासाठी १२ व्या योजनेतील उद्दिष्टांच्या परिपूर्ती सोबत २०१४ च्या सार्वत्रिक निवडणूकीत यश संपादन करण्यासाठी पंतप्रधानाच्या सहकार्याने सर्वसामान्यासाठी / विरोधीपक्षासाठी कटू परंतु देशाच्या आर्थिक विकासासाठी आवश्यक असणारा किरकोळ किराणा विक्री क्षेत्रात थेट ५१% परकीय गुंतवणूकीचा निर्णय घेतला. प्रत्यक्षात वरील निर्णय या अगोदर सरकारने २ वेळा घेतला होता. परंतु अपरिहार्य राजकीय परिस्थितीमुळे तो मागे घेतला. सध्याच्या आर्थिक बाबींचा विचार करता एकूणच विकासाच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी यापेक्षा सक्षम असा पर्याय नसल्यामुळे घटक पक्षासह, विरोधी पक्षाची पर्वा न करता आर्थिक सुधारणा करण्यासाठी उशीरा का होईना परंतु योग्य निर्णय घेतला.

सरकारच्या वरील निर्णयाबरोबर अपेक्षेप्रमाणे घटकपक्षासह भाजपने सुद्धा विरोध केला. प्रत्यक्षात भाजपचे सरकार सत्तेवर असताना त्यांनी "सिंगल ब्रॅन्ड रिटेल मध्ये १००% विदेशी गुंतवणूकीस अनुमती दिली होती. त्यामुळेच मोठमोठ्या आंतरराष्ट्रीय ब्रॅन्ड सोबत, टाटा, रिलायन्स व बिर्ला मॉल्स / महादुकाने मोठ्या शहरात सुरु झाली. त्यांच्या या निर्णयामुळे किराणा दुकानावर परिणाम झाला नाही मात्र परकीय कंपनीच्या मल्टीब्रॅण्ड मॉल्समुळे लहान व्यापारी / किराणा दुकानदार, प्रोव्हीजन स्टोअर्स इ. वर विपरीत परिणाम होईल असे जाहीर करणे अभ्यासपुर्ण व तर्कसंगत नाही.

### थेट विदेशी गुंतवणूकीच्या अटी:

भारतात किरकोळ किराणा मल्टी ब्रॅन्ड व्यापार क्षेत्रात ५१% परकीय थेट गुंतवणूक करण्यास अनुमती देत असतांना सरकारने काही अटी लागु केल्या आहेत त्या अटींचे पालन करणे विदेशी गुंतवणूकदारांना बंधनकारक आहे. याचाच अर्थ असा की, परकीय थेट गुंतवणुकीचा हा निर्णय पुढील विविध तरतुदी / अटी नुसार अंमलात येईल.

१) अशा गुंतवणूकदारांना त्यांच्या मॉल्समधून ब्रॅण्डेड नसलेली ताजीफळे, फुले, भाजीपाला, मटन, कोंबडी, मासे या सोबतच अन्नधान्ये दाळी वगैरेचीच विक्री करता येईल.

२) अशा गुंतवणूकदारांना कमीत कमी १०० मिलीयन डॉलर (१० कोटी रु.) गुंतवणूक आवश्यक असेल.

३) परकीय गुंतवणूक म्हणून जी रक्कम गुंतविण्यात येईल त्यापैकी ५०% रक्कम बॅकएड पायाभूत सुविधा (उदा. शेतकऱ्यांकडून प्रत्यक्षात भात खरेदी करणे, साफ करुन त्याची प्रतवारी करणे, पॅकींग, साठवणूक व इतर पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी बंधनकारक राहणार आहे. विशेष म्हणजे कृषी उत्पादनाचा शेतातून थेट दुकानात येणाच्या मार्ग सुकर व गतिमान होण्यासाठी पुरवठा शृंखला मजबूत करण्यास ही अट महत्त्वपुर्ण आहे.)

४) परकीय गुंतवणूकदाराने उत्पादित वस्तूंच्या एकूण खरेदी पैकी किमान ३०% देशातील मध्यम/ लघु/ ग्रामोद्योग / कुटीर उद्योगाकडून खरेदी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. ज्यामुळे देशातील लघु / मध्यम, ग्रामीण /कुटीर उद्योगाना परदेशी प्रचलित उत्पादन प्रणाली,तंत्रज्ञान व व्यवस्थापन प्रणालीचा लाभ मिळून त्यांच्या प्रगतीला चालना मिळणार आहे.

५) परकीय गुंतवणूकदाराने वरील १ ते ४ अटीचे पालन करुन असा स्वयंघोषित दाखला देणे त्यांचावर बंधनकारक असेल परंतु या सोबत अधिकृत हिशोब तपासनिसाकडून आवश्यक ती कागदपत्रे व हिशोब पत्रे तयार ठेवण्याचे व सरकार त्याची अचानक तपासणी करेल असे बंधपत्र देण्याची अट लागू केलेली आहे.

६) सन २०११ च्या लोकसंख्या जनगणनेनुसार ज्या शहराची लोकसंख्या १० लाखाच्या पुढे आहे अशाच शहरात/त्या शहराच्या १० कि.मी. अंतराच्या परिसरातच असे शॉपींग मॉल सुरु करता येईल.

७) शेतीशी संबंधीत सर्व प्रकारची उत्पादने खरेदी करण्याचा प्रथम अधिकार सरकारचा राहणार आहे.

८) ई-कॉमर्सच्या माध्यमातून कोणत्याही स्वरुपाचा किरकोळ व्यापार करण्यास परकीय गुंतवणूकदारांना अनुमती देण्यात येणार नाही.

९) देशातील राज्यसरकारने व केंद्रशासीत प्रदेशांना वरील नियमांना अनुसरुन परकीय थेट गुंतवणूकदारांना अनुमती देता येणार असली तरी आवश्यकता भासल्यास या व्यतिरिक्त काही अटी त्याच्या धोरणानुसार लादल्यास त्या अटी सुद्धा गुंतवणूकदारांना बंधनकारक असतील.

थोडक्यात वरील अटीनुसार सरकारने मल्टीब्रॅन्ड किरकोळ किराणा व्यापारात थेट परकीय गुंतवणूकीस मान्यता दिली, सदर निर्णयामुळे नेमके कोणते फायदे / तोटे होतील या संदर्भात विशेष

माहिती / अभ्यास नसल्यामुळे विरोधी पक्ष विरोध करीत आहे. प्रत्यक्षात सन १९९१ च्या जागतिकीकरणाच्या वेळी व स्वर्गीय राजीव गांधींनी माहिती तंत्रज्ञान धोरणाचा स्वीकार करतेवेळी रोजगाराच्या संधी नष्ट होतील, देश परकीय कंपनी च्या ताब्यात जाईल वगैरे गंभीर स्वरुपाचे आरोप झाले. प्रत्यक्षात मात्र वरील धोरणामुळे देशाची आर्थिक प्रगती उंचावली, चीन खालोखाल नंबर २ ची उदयोन्मुख अर्थव्यवस्था म्हणून परकीय गुंतवणूकदारांचे लक्ष वेधले गेले, माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील प्रगतीमुळे या क्षेत्रात, इन्फोसिस, विप्रो, टाटा, पटणी या कंपन्या सोबत विदेशी कंपन्यांमुळे या क्षेत्रात रोजगाराच्या संधी वाढून मोठ्या प्रमाणात परकीय चलन प्राप्त झाले ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. परंतु देशात एकपक्षीय सरकार नसल्यामुळे विरोधासाठी विरोध ही चुकीची भुमिका इतर राजकीय पक्ष घेत आहे. प्रत्यक्षात सरकारच्या या निर्णयामुळे पुढील विविध घटकांना लाभ / संधी मिळणार आहे व त्या सोबत काही तोटे / धोके सुद्धा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे या निर्णयामुळे नेमक्या कोणत्या क्षेत्रात संधी (लाभ) व धोके (तोटे) संभवतात या संदर्भातील विवेचन पुढील प्रमाणे करता येईल:

## किरकोळ विक्री क्षेत्रातील थेट विदेशी गुंतवणूकीमुळे प्राप्त होणाऱ्या संधी :

सरकारच्या संबंधीत निर्णयामुळे या किरकोळ व्यापार क्षेत्राचा फायदा विविध घटकांना मिळणार असला तरी या ठिकाणी कृषी, रोजगार व ग्राहक या तीन घटकाच्या संधीबद्दल चर्चा केली आहे.

### अ) कृषी क्षेत्रातील संधी :

भारतीय कृषी क्षेत्राच्या दृष्टीकोनातून किरकोळ किराणा व्यापार क्षेत्रातील थेट विदेशी गुंतवणूक एक ऐतिहासिक व दूरगामी घटना समजली पाहिजे. भारतीय अर्थव्यवस्था कृषी प्रधान असली तरी गेल्या काही वर्षापासून या क्षेत्रातील गुंतवणूक कमी झाल्यामुळे तिची अवस्था कुंठीत स्वरुपाची झाली आहे. या सोबतच शेतमाल बाजार संदर्भात सरकारचे संकुचीत धोरण व कृषी उत्पन्न बाजार समितीची एकाधिकारशाहीमुळे शेतकऱ्यांना योग्य भाव मिळत नाही. इतकेच नव्हे तर शेतीक्षेत्रातील पायाभूत सुविधाच्या अभावामुळे शेतमाल काढणीच्या पश्चात ३७ ते ४०% शेतमालाचे म्हणजेच सुमारे ७० हजार कोटी रुपयांचे नुकसान होते. साहजिकच एकूण उत्पन्नापैकी २/५ भाग सोयी सुविधा उपलब्ध नसल्यामुळे नष्ट होऊन अन्नधान्याच्या किंमती वाढून महागाई वाढीस कारणीभूत ठरतो.

दुसरीकडे भारतीय शेतबाजार व्यवस्था सरकारच्या ताब्यात राहिल्यामुळे शेतकऱ्यांचे विविध मार्गांनी नुकसान होत आहे, या संदर्भात अहमदाबाद येथील भारतीय व्यवस्थापन संस्थेने एक अभ्यास केला त्या आधारे त्यांनी एकूणच कृषी उत्पन्न बाजार समितीच्या एकूणच कार्याबद्दल धक्कादायक असे निष्कर्ष काढले. उदा. कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कृषी माल खरेदीचे अधिकार विशिष्ट व्यापारी, अडते, मध्यस्थ किंवा त्यांच्या समुहाकडे असल्यामुळे ते कमी किंमतीला माल खरेदी करतात, शेतमालाला बाजार समितीत दिला जाणारा बाजारभाव अशास्त्रीय असतो कारण तो भाव निश्चित करतांना उत्पादनखर्च, मागणी व पुरवठा या प्रमुख घटकांचा विचार केला जात नाही, खरेदीदाराच्या खरेदी क्षमतेपेक्षा अधिक माल

कृषी उत्पन्न बाजार समितीत विक्रीस आल्यास माल विक्रीची हमी नसल्यामुळे भाव अचानक कोसळतात काही वेळा माल कवडीमोल किंमतीत विकावा लागतो किंवा शेतकरी विशेषत: फळे, भाजीपाला, टोमॅटो, कांदे, बटाटे रस्त्यावर फेकून देतात त्यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होते, या सोबतच कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतमालाचे वजनमाप, प्रतवारी, साठवणूक व सुरक्षा संबंधीत यंत्रणेचा अभाव असल्यामुळे सध्या शेतकऱ्याचे नुकसान होत आहे.

किरकोळ किराणा व्यापार क्षेत्रातील थेट गुंतवणूकीमुळे कृषी उत्पन्न बाजार समितीची शृंखला नाहीशी होणार असून

शेतकरी →अडते/दलाल → होलसेलर सेमीहोलसेलर → किरकोळ व्यापारी → ग्राहक अशी पूर्वीची वितरण व्यवस्था नष्ट होऊन

शेतकरी →किरकोळ व्यापारी → ग्राहक अशी वितरण प्रणाली निर्माण होऊन शेतकऱ्यांना पुढील संधी प्राप्त होतील.

१) शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादनास योग्य भाव मिळेल.
२) शेतमाल उत्पादनाच्या विक्रीची हमी असल्यामुळे शेतकऱ्यांना शेतमालाच्या दर्जावर लक्ष केंद्रीत करता येईल.
३) शेतमालाच्या पॅकींग, वाहतुक व साठवणुकीच्या सोयीत वाढ होईल या अगोदर शेतमालाचे जे ३० ते ४०% नुकसान होत होते ते होणार नसल्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल.
४) सध्या ग्राहक अन्नधान्यासाठी १०० रु. खर्च करतो असे गृहीत धरल्यास यापैकी शेतकऱ्यास ३० ते ४० रु. शेतमालाची किंमत म्हणून मिळतात. मात्र परकीय थेट गुंतवणूकीमुळे अडते / दलाल ही साखळी नष्ट होऊन शेतकऱ्यांना ५० ते ६०% रक्कम मिळून त्याच्या उत्पन्नात वाढ होईल.
५) थेट परकीय गुंतवणूकीमुळे शेतमाल खरेदीसाठी परकीय कंपन्या शेतकऱ्या सोबत "कॉन्ट्रॅक्ट फार्मींग (शेती) करार" करतील त्यामुळे शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीची व शेतमालदराची चिंता भेडसवणार नाही. इतकेच नव्हेतर अशा परकीय कंपनी कडून शेतमालाचा दर्जा उंचविण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन व सहकार्य शेतकऱ्यांना मिळून त्यांना विकासाची संधी प्राप्त होईल.
६) स्थानिक शेतकऱ्यांशी परकीय कंपनी थेट संपर्कामुळे बाजाराच्या गरजेनुसार व आवश्यक तितकेच उत्पादन घेऊन संभाव्य नुकसान शेतकऱ्यांना टाळता येईल.
७) ग्रामीण भागात अशा कंपनी बॅकएड सुविधासाठी गुंतवणूक केली जाईल यामुळे ग्रामीण भागात प्रतवारी, पॅकींग, साठवणूक इ. सेवा क्षेत्रात रोजगाराच्या संधी वाढून शहरीकरणास काही प्रमाणात प्रतिबंध बसून ग्रामीण विकासाला चालना मिळेल.

**ब) रोजगार क्षेत्रातील संधी:**

किरकोळ व्यापार क्षेत्रातील थेट गुंतवणूकीमुळे रोजगार क्षेत्रासाठी पुढील संधी उपलब्ध होतील.

१) जागतिक किरकोळ व्यापार निर्देशांक २०१२ नुसार जगातल्या उगवत्या ३० बाजारपेठेमध्ये भारताचे स्थान ५ व्या क्रमांकावर असल्यामुळे या निर्णयामुळे येत्या २ वर्षात परकीय रिटेल कंपनी सहभागामुळे मोठ्या

शॉपिंग मॉल्सच्या संख्येत वाढ होऊन शॉपींग मॉल सुपरवायझर, सेल्समन, कॅशिअर, अकांऊन्ट, सुरक्षा रक्षक, लिफ्टमन व इतर प्रकारच्या रोजगार संधी उपलब्ध होतील.

२) इंडियन स्टॉफींग फेडरेशनच्या अभ्यासानुसार वरील गुंतवणूकीमुळे येत्या दहा वर्षात १ कोटी नव्या नोकरीच्या संधींची निर्मिती होईल असा अंदाज आहे.

३) बॅकएड क्षेत्रातील ५०% गुंतवणूकीमुळे मालवाहतुक, शितगृहे, पॅकींग यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढेल त्यामुळे या क्षेत्रासह आरोग्य दृष्टीने दर्जेदार उत्पादन तयार करणाऱ्या प्रक्रीया उद्योगाची संख्या वाढून या व माल हाताळणी क्षेत्रात रोजगाराच्या संधी वाढतील.

४) शेतातून उत्पादीत माल मॉल्समध्ये जाईपर्यंत विविध सेवा व सुविधा पुरविण्याची नवीन वितरण प्रणाली अस्तित्वात येऊन रोजगार संधी वाढतील.

## क) ग्राहकांची संधी :

किरकोळ व्यापार क्षेत्रातील थेट परकीय गुंतवणूकीचा ग्राहकांना पुढील प्रकारे फायदा मिळेल.

१) ग्राहकांना मिळणाऱ्या मालाचा दर्जा व सुरक्षिततेची जबाबदारी रिटेल कंपन्यावर निश्चित करण्यात आल्यामुळे अशा कंपनी कडून उच्च दर्जाच्या वस्तू ग्राहकांना स्पर्धात्मक किंमतीस उपलब्ध होतील.

२) रिटेल कंपनीमुळे स्पर्धा वाढून ग्राहकांना वस्तुचे विविध पर्याय बाजारपेठेत रास्त किंमतीला प्राप्त होतील.

३) देशातील एकूण कृषी, भाजीपाला व फळांच्या उत्पादनापैकी ४०% उत्पादन प्रक्रिया उद्योग व शितगृहाच्या उपलब्धते अभावी नष्ट होऊन अशी उत्पादने अधिक किंमतीला ग्राहकांना घ्यावी लागतात. रिटेल कंपनी मुळे अशा सुविधामध्ये वाढ होऊन वस्तु रास्त किंमतीला ग्राहकांना विकत घेता येतील.

## किरकोळ विक्री क्षेत्रातील परकीय गुंतवणुकीचे धोके:

किरकोळ विक्री क्षेत्रातील गुंतवणूकीमुळे वरील विविध प्रकारच्या संधी उपलब्ध होत असल्यातरी या गुंतवणूकीमुळे पुढील धोके निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन सदर निर्णयाची काळजीपुर्वक अंमलबजावणी करणे जरुरीचे आहे.

१) आज शेतमालाच्या किंमतीवर सरकारचे नियंत्रण असल्यामुळे वेळप्रसंगी शेतकरी सरकारशी भांडण करुन शेत मालासाठी हमीभाव मिळवितो. रिटेल क्षेत्रातील थेट गुंतवणूकीमुळे शेतकऱ्यांना परकीय कंपनी सुरुवातीला योग्य भाव देतील परंतु भविष्यात कोणता भाव देतील या बद्दल खात्री देता येत नाही.

२) स्पर्धेमुळे ग्राहकांना सध्या वस्तु स्वस्त मिळतील, परंतु याच किंमतीला वस्तु भविष्यात मिळतील याची खात्री नाही. त्यामुळे भविष्यात ग्राहकाची पिळवणूक होण्याचा धोका नाकारता येत नाही.

३) लहान / मध्यम आकाराचे दुकानदार, चौकातील प्रोव्हीजन्स स्टोअर्स, व स्ट्रिट सेलर्स पेक्षा मॉल्समधील वस्तुंच्या किंमती अधिक असण्याचा धोका.

४) परकीय रिटेल कंपनीच्या भारतातील

प्रवेशामुळे सध्या प्रस्थापित असलेले छोटे किराणा दुकानदार प्रोव्हीजन स्टोअर्स व त्यांच्याशी संबंधीत घाऊक व्यापारी वर्ग, हमाल व इतर पुरक कार्याशी संबंधीत अशा ३० ते ४० लाख नोकरीची संख्या कमी होण्याची शक्यताच अधिक आहे.

५) भविष्यात परकीय गुंतवणूकीमुळे देशात अनेक मॉल्स सुरु होतील, परंतु अंतर्गत स्पर्धेमुळे नफ्यात घट होऊन बरेचसे मॉल बंद पडून बेकारी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

६) आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्यरत असणाऱ्या शॉपींग मॉल्सच्या तुलनेत, देशांतर्गत संघटीत किरकोळ व्यापारी क्षेत्र कमकुवत असल्यामुळे त्याचा विपरीत परिणाम संघटीत किरकोळ व्यापारी क्षेत्राच्या एकूण उलाढालीवर होईल.

७) किरकोळ व्यापार क्षेत्रातील परकीय गुंतवणुकीमुळे जो व्यवसाय होईल त्यातून प्राप्त नफा मायदेशी पाठविण्यात येणार असल्यामुळे त्याचा नकारात्मक परिणाम अर्थव्यवस्थेवर होण्याचा धोका आहे.

## समारोप :

स्वातंत्र्यप्राप्ती नंतर देशात परमीटराज होते ते जाऊन सबसीडीराज उभे राहिले. सरकारच्या लोकानुनयी व लोकप्रियतेकडे झुकणाऱ्या प्रतिमेमुळे सरकारला केवळ पेट्रोलजन्य पदार्थासाठी इ.स. २०१०-११ अखेर १ लाख ४० हजार कोटी रुपयांचे अनुदान द्यावे लागले या व्यतिरिक्त खते, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, अन्नसुरक्षा योजनेच्या कोट्यावधी रुपयाच्या अनुदानामुळे सरकारची आर्थिक तुट वाढली, सरकारपुढे अनेक आर्थिक संकटासोबत देशातंर्गत अन्नधान्याची होणारी भाववाढ, युरोप व अमेरिकेतील मंदीची वाढती तीव्रता, परकीय गुंतवणूक वातावरणातील शिथीलता दूर करण्यासोबत आंतरराष्ट्रीय पातळीवरील आर्थिक पत उंचवण्या सोबत परकीय गुंतवणूकदाराचा विश्वास संपादन करुन देशाच्या आर्थिक विकास चक्राला गती देण्यासाठी सरकारने किरकोळ व्यापार क्षेत्रात थेट गुंतवणूकीला ५१% पर्यंत अनुमती देऊन आर्थिक सुधारणा करण्यास वचनबद्ध असल्याचे सिद्ध केले.

सरकारच्या या निर्णयामुळे अमेरिका स्थित वॉलमार्ट या महाकाय विक्री शृंखलेने प्रतिसाद देऊन पुढील १२ ते १८ महिन्यात भारतात विक्रीदालन सुरु करण्याचे घोषित केले आहे. विशेष असे की, सध्या भारती एंटर प्राईसच्या सोबतीने वॉलमॉर्ट कंपनीने देशात १७ ठिकाणी सिंगल ब्रॅण्डचे घाऊक विक्री दालन सुरु केले आहेत. त्याचा परिणाम भारतीय घाऊक व्यापार क्षेत्रावर झाला नाही. तसेच रिटेल क्षेत्रातील गुंतवणूक १० लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरातच ज्याची संख्या ५५ ते ७० च्या दरम्यान आहेत. तेथेच सुरु केले जाणार आहे ही वस्तुस्थिती असली तरी भारतात १ लाख लोकसंख्या असलेली ४० हजार शहरे तर ६ लाख वस्तीची पाच हजार शहरे असून एकूण लोकसंख्या ३५ ते ४०% लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली रहात असल्यामुळे भविष्यात मॉल्स विक्रीचे प्रमाण २०% वरुन ३०% वाढेल याचाच अर्थ असा की, भविष्यात ६०% ते ७०% किरकोळ किराणा व्यापार पूर्वपार स्वरुपाच्या छोटे / मोठे किराणा दुकानदार, प्रोव्हीजन स्टोअर्स, स्ट्रीट हॉकर्स मार्फत केला

जाईल, परकीय गुंतवणूकीचा किरकोळ किराणा व्यापार क्षेत्रावर फारसा प्रतिकुल परिणाम होणार नाही. अमेरिकेसारख्या देशात ज्या प्रमाणे अशी लहान, मध्यम आकाराची दुकाने कार्यरत आहे. तशीच भविष्यात कार्यरत राहतील मात्र त्यासाठी अशा दुकानदारांना आपल्या कार्यपद्धतीत, बाह्य स्वरुपात व्यापक बदल करण्यासोबत भेसळी विरुद्धच्या प्रतिबंधात्मक उपाय योजनांचा स्वीकार करावा लागेल, ग्राहकांना उच्च दर्जाच्या वस्तू किफायतशीर किंमतीला उपलब्ध करुन देणे स्पर्धात्मक काळात आवश्यक ठरणार आहे.

### संदर्भ सूची :


1) Sarthak Sarin, (Nov. 23, 2010) *Foreign Direct Investment in Retail Sector www.legalindia.in/Foregin Invest.*
2) Mohan Guruswamy, *Implimentation of FDI in Retail* (Dec.2010) www.scribd. com/doc/36888679)
3) Nabael Mancheri, *India's FDI Policies : Paradiqm* www. eastara forum.org (2010/12/24).
4) Dr. D. S. Leelavathy (Jully-2012) *FDI in post liberalized period, facts for you.*
5) Dr. K. Revathi (June-2012) *FDI in Indian Retail,* Facts for you.
6) Dr. S. Sundaram (Feb. 2012) *FDI Retail Boon or Bane,* Facts for you.
7) Govt. of India press note no.4 (2012) series realized by Ministry of Commerce and Industry Dept. of Industrial policy & promotion.
8) वृत्तपत्रे - सकाळ, लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स, Times of India (२० सप्टें. २०१२ ते १० ऑक्टों. २०१२) या कालावधीत प्रकाशित लेख, बातम्या, प्रतिक्रिया व संपादकीय लेख.

# संत गाडगेबाबांच्या अखेरच्या कीर्तनातील व्यावहारिक आर्थिक विचार

**महेश चं. डाबरे, अकोला,**
श्रीमती एल. आर. टी. कॉलेज ऑफ कॉमर्स.
भ्रमणध्वनी: ९४२३६५८६२१

---

**प्रस्तावना :**

२३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातल्या शेंडगाव या छोट्याशा गावातील एका परीटाच्या घरात गाडगेबाबांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर.

बुधवार दि. १ फेब्रुवारी १९०५ ला पहाटे ३ वाजता बायको पोरांचा संसार सोडून डेबुजी घराबाहेर पडले. तेव्हापासून २० डिसेंबर १९५६ ला देहावसान होईपर्यंत अर्धशतकाहून अधिक काळ नागपूर ते कोल्हापूर दरम्यानच्या खेड्यापाड्यातला महाराष्ट्र त्यांनी समजून घेतला. दिवसा खेड्यातला काडीकचरा, शेण, घाण आपल्या खराट्याने स्वच्छ करायची आणि रात्री कीर्तनातून लोकमानसावरची जळमटं काढायची. असा त्यांचा नित्यक्रम असे. अंगात रंगीबेरंगी चिंध्यांचा अंगरखा, कानात फुटकी कवडी, डोक्यावर मातीच्या फुटक्या भांड्याचे खापर, हातात काठी अशा वेशातले गाडगेबाबा कीर्तनाला उभे राहिले की, बडी-बडी मंडळी जमिनीवर मांडी घालून ऐकायला बसायची. अशा बड्या मंडळीत प्रसिध्द लेखक प्र. के. अत्रे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख अशी थोर माणसं असायची. कर्मयोगी गाडगे बाबा कृतीशिल लोकशिक्षक होते. मुंबईच्या ब्रांद्रा स्टेशनवर रेल्वे पोलीस वसाहतीत दि. ८ सप्टेंबर १९५६ रोजी बाबांचे अखेरचे कीर्तन झाले. अमेरिकेहून आलेल्या एका पारशी व्यक्तीने बाबांचे कीर्तन रेकॉर्ड केले होते. त्यानंतर मुंबईच्या अमरानंद कंपनीने कॅसेटच्या रूपात त्याचा प्रसार केला. मात्र कालांतराने त्या कॅसेटस् संपल्या. परंतु डॉ. एकनाथ ठाकूर आणि गुणवंतबाबा चऱ्हाटे यांच्या माध्यमातून कॅसेट उपलब्ध झाली. महाराष्ट्र शासनाच्या प्रयत्नातून कमलाकर जगताप यांनी बाबांच्या मूळ आवाजातील कीर्तन आज कॅसेट व

सीडीच्या रूपात उपलब्ध करून दिले आहे. त्याची मुद्रित संहिताही तयार करण्यात आली. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या बी. ए. भाग - १ ला नेमलेल्या पुणामाय भाग एक मध्ये अखेरचे कीर्तन अभ्यासले जाते. अखेरच्या कीर्तनातील गाडगेबाबांच्या व्यावहारिक आणि आर्थिक विचारांचा शोध प्रस्तुत निबंधात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्दिष्ट :**

गाडगे बाबांच्या अखेरच्या कीर्तनातील व्यावहारिक आर्थिक विचारांचे अध्ययन करणे.

**पैसा कमवावं का .... ? :**

माणसं आयुष्यभर मर-मर करून पैसे कमवतात. धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरूषार्थापैकी केवळ अर्थ ह्या एकाच पुरूषार्थाला महत्त्व देणं हे माणसाच्या आयुष्याचं सार्थक नव्हे. माणसाला जगण्यासाठी पैसा लागतो. त्यासाठी प्रत्येक माणसाला शारीरिक किंवा बौध्दिक श्रम करावेच लागतात. पण पैसे कमावणं हे एकमेव श्रेष्ठ जीवनमूल्य नाही. संत गाडगेबाबा तुकाराम महाराजांचा संदर्भ देत खडे बोल सुनावतात -

''मानसाच्या जल्मात आल्यावर आपन काय करावं ? पैसा कमवावं का बायको पोरं पोसूनच मरावं, का सग्या-सोयऱ्यांचा गनगोताचा मेळ करून ह्यांच्यातच आयुष्य घालवावं? तरी मानसाच्या जल्मात येऊन जो मनुष्य देवाचं भजन करील-तुकोबाराय म्हनतात, तो देव होईल देव.''

**पैसे की धुलधानी :**

लोक आपल्या जवळच्या असला- नसला सर्व पैसा तीर्थयात्रेवर खर्च करतात. प्रसंगी त्याकरिता कर्ज काढतात. अशा तीर्थयात्रांवर खर्च करणे हा पैशाचा नाश आहे. गाडगेबाबांच्या मते तीर्थात देव बसवले हे खरे देव नाहीत. ते पोट भरण्याचे देव आहेत. तेथे भटजी लोक तीर्थ विकतात. एक चमचा तीर्थाचे दोन आणे. तांब्याभर पाणी विकून ते पंधरा रुपये वसूल करतात. स्वतःचं पोट भरतात. हा देवाचा बाजार आहे. संत गाडगे बाबा देवाच्या अस्तित्वाविषयी म्हणतात,

''पुथ्ई पैदा झाली ताहापासून देव कोनं पाह्याला नाही. देव कोनाले दिसणार नाही - देव पाह्याची वस्तु नाही.....

देव देव करता शिनले माहे मऽन !

देव देव म्हनून तुकोबा म्हनतत, मी खूप फिरलो मले शिन आला, पन देव नाही दिसला. मंग दिसले काय ?

पानी आणि पाषाण जेथे ...... तेऽथे ....

कबीर पुरावा देतत -

जत्रामे फत्रा बिठाया तिरथ बनाया पाऽनी ।

दुनिया भाई दिवानी पैसे की धुलधानी ।।

तीर्थाले जानं देवाचा संबंध नाही. पैशाचा नाश-खाना खराब आहे.''

**पैशाचा अभिमान :**

गाडगेबाबांच्या मतानुसार पुढील तीन पैकी कोणतीही एक गोष्ट माणसाजवळ असली तरी माणूस गर्विष्ठ होतो. त्यातली एक गोष्ट आहे पैसा. गाडगे बाबा म्हणतात.

''पहिलवानीत अभिमान असते-मै पहेलवान हूं ! पैशाचा अभिमान असते. अंमलदारीचा अभिमान असते. हे तऱ्हेतऱ्हेचे अभिमान असते. ज्याच्या अंगात अभिमान नसील, तर तो मनुष्य देव होते पुढे.''

ज्याचा अभिमान ....... गेऽला ।
अन् तुका म्हणे देव ....... झाला ।।

**पन्नास पन्नास कोट रूपयाची आगबोट :**

गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनातून अंध:श्रध्देवर कठोर प्रहार केले. प्रखर टीका केली. म्हसोबा, मरीआई अशा ग्राम दैवतांच्या निर्मुलनावर भर दिला. सत्यनारायणाची असत्यता तर्कशुध्द पध्दतीने पटवून दिली. सत्यनारायण ही देवाची भक्ति नाही. जे लोक लोभी असतात ते सत्यनारायण करतात. कुणाला मुलगा नाही, कुणापाशी गाडी नाही, कुणाच्या हातात पैसा मिळत नाही, कुणाला एखादी जागा मिळत नाही, ते लोक सत्यनारायण करतात. साधु वाण्यानं अडीच रुपयाचा सत्यनारायण केला. प्रसाद घेतला, त्याची करोडो रुपयांची बुडालेली नौका वर आली. संत गाडगे बाबा म्हणतात,

''नाही नाही. हे खरं नाही ! ज्या साली लढाई झाली. त्यासाली, लढाईच्या साली समुद्रात एकेक आगबोट, पन्नास पन्नास कोट रूपयांची पार तळाला गेली. पत्ता नाही. अशा किती आगबोटी बुडाल्या. सत्यनारायन करनाऱ्या महाराजाले म्हनाव् अडीच रूपये घेऊन कशाला एवढी बडबड करता- अडीच लाख रूपये घ्या - अडीच कोट रूपये घ्या- समुद्राच्या किनाऱ्यावर एक सत्यनारायन करा अन् एक आगबोट आना वर. जमेल का ?''

**जेवढे पैसे पडतील तेवढे पडू द्या :**

माणसं देऊळ बांधतात. त्या देवळात देवाची मुर्ती बसवतात. मुर्ती काय फुकट मिळते? ती विकत घ्यावी लागते. प्रश्नोत्तर रूपानं अशा प्रकारची उत्तरं श्रोत्यांकडून काढून घेत गाडगेबाबा म्हणतात,

'मंग मुर्ती इकत की फुकट ?
- इकऽत!

देव इकत भेटत असते ? सांगा ! मंग देव इकत न घेता सुर्यनारायन घ्याव ! जेवढे पैसे पडतील तेवढे पडू द्या. अन् आपल्या घरात आनून बसवून टाका ! देव इकत भेटते का ? मेथीची भाजी होय, का कांदे-बटाटे होयेत ? देव इकत भेटते, हेही समजत नाही ज्या मानसाले, तो मानूसच कसा !''

**इस्टेट आणि धन :**

पंढरपूर, मुर्तिजापूर, नाशिक, आळंदी, देहू, पुणे, त्र्यंबकेश्वर, मुंबई येथे लोकवर्गणीतून गाडगेबाबांनी धर्मशाळा बांधल्या. मुर्तिजापूर, नागरवाडी, राहूरी येथे गोरक्षण सुरू केले. ही सर्व संपत्ती कोट्यावधी रुपयांची आहे.

एकदा वर्ध्याला महात्मा गांधीजींसोबत गाडगे बाबांची भेट झाली. गांधीजींनी बाबांना विचारले, ''तुम्ही इतके रुपये जमविले. तुमची इस्टेट किती ?''

दोन्ही हात गांधीजी पुढे उंचावून बाबा म्हणाले, ''हे हाये माही इस्टेट! ''तेव्हा गाडगेबाबांच्या डाव्या हातात होते मातीचे खापर आणि उजव्या हातात होती लाकडाची काठी. ह्या प्रसंगानंतर काही वर्षांनी महात्माजींचा खून झाला. आपल्या अखेरच्या कीर्तनात महात्माजींबद्दल बाबा म्हणाले,

'दस मिनिट, दस मिनिट में सब पुर्थईभर पसारा- गांधीजीका खून हो गया ! महात्माजी ..... गये ऽऽ ऽ ! महात्माजी ...... गये ऽऽऽ! महात्माजी गये ! दस मिनिट में. हम ऐसे है, इस घर में हम मर गये, तो पीछेके घरवालेकू छे महिने नही मालूम होता. उसके घरकू सगेवाले आते,

रोते. क्या हुवा हो ? वो गनपतसिंग कल रातकू मर गया. अरे, हमकू मालूमही नही. जैसा कुत्ता मर गया साला ! मानसाचं धन तिजोरी नाही, सोनं नाही, हिरे नाही, मोटर नाही ! मानसाचं धन कीर्ती ! कबीर पुरावा देत,

''सूरत से कीरत बडी बिनपंख उड जाऽय ।
सूरती तो जाती रही कीरती कबू ना जाऽय ।।

जबलग सुरज चाँद है पुर्थई पर, तबलग गांधी मरते नही. गांधीजी जिंदे है. मरने-वाले, आनेवाले, जानेवाले हम है. गांधीजीकू मरनच नाही.''

## गरिबीचं कारण आणि शिक्षण खर्चाचे नियोजन:

१९३६-३७ च्या सुमारास नाशिक नगरपालिकेत बाबांचं एक कीर्तन झालं. पूर्वरंगांचा विषय होता ''शिक्षणाचे संस्कार झाल्याखेरीज माणसाला मनुष्यत्व येत नाही.''उत्तर रंगात बाबांनी आख्यान लावलं ते महात्मा जोतिबा फुल्यांचं. शिक्षणाकरता तळमळणारा शेतकरी असं त्यांनी जोतिबांचं वर्णन केलं होत.

शुद्रांच्या खचऱ्याचं कारण विद्या नसणं हे आहे. हे महात्मा जोतिबा फुल्यांचं सूत्र गाडगे बाबांनी आपल्या अखेरच्या कीर्तनात मांडलं. ते म्हणतात,

'' हे लोक का गरिबीत राहिले ? एक तर याहिले नाही विद्या. काय नाही ?
- विऽद्या !
ज्याले विद्या नसेल त्याले खटाऱ्याचा बैल म्हटलं तरी-
- चालेऽल ! ''

डाक्टर आंबेडकर साहेब, यांच्या पिढ्यान् पिढीत झाडू मारायचं काम केलं. यांच्या वडिलाले सुबुध्दी सुचली आणि आंबेडकर साहेबाले शाळेत घातलं. आंबेडकर साहेबांन काही लहानसान कमाई नाही केली. हिन्दुस्थानची घटना केली घटना, अन् तेच शाळेत जाते ना, अन् शिकते ना, तर झाडू मारनंच त्यांच्या कर्मात होतं. विद्या मोठं धन आहे. जेवनाचं ताट मोडा, बायकोला लुगडं कमी भावाचं घ्या. मोडक्या घरात रहा. पन मुलाले शिक्षन दिल्याविने सोडू - नऽ का.

## जमाखर्च :

अवघाचि संसार सुखाचा करण्यासाठी गाडगेबाबांनी बचतीचा महामंत्र दिला. काटकसरीची शिकवण दिली. बचतीचं अर्थशास्त्र समाजशास्त्राच्या अंगानं सांगितलं. बाबा म्हणतात,

''मारवाडी, गुजराथी, ब्राम्हण, भाटे हे का रोज तुपातला शिरा खातात ? त्यांच्या घरी जमाखर्च आहे. काय ? '
- जमा ऽ खर्च !

उत्पन्न किती अन खर्च किती याची लैन मालूम आहे. अन् आमच्या मराठ्याले, तेल्या, माळ्या न्हाव्या, धोब्याले - याले जमाखर्च समजतच नाही. यांचं कसं आहे ? पौनसे रूपये उत्पन्न, आणि ऐंशी रूपये नव्वद रूपये खर्च ! जानेवारीत मजा करा आणि फेपरवारीत बोंबलत बसा. काटकसर पाहिजे. घरी जमाखर्च पाहिजे. लइ जन म्हनतात पगार पुरत नाही. पगार पुरत -
- ना ऽ ही !

पगार सरतच नाही. असं म्हटलं पाहिजे ज्या घरात नवरा बायको बुध्दिमान, अक्कलवान असतील, तिथं पगार सरत नाही. शिल्लक पेटीत टाकली पाहिजे.''

## रूपया गोडून दारू प्याला :

बहुजन समाजाचं दारूनं कसं वाटोळं केलं

हे गाडगे बाबांनी उघड्या डोळ्यांनी समाजात पाहिलं होतं. ह्याच दारूच्या पायी आपल्या वडिलांनी संसाराची केलेली राखरांगोळी बाबांनी लहानपणी अनुभवली होती. त्यामुळे दारू पिणाऱ्यांविषयी बाबांच्या मनात प्रचंड चीड होती. बाप दारू पिऊन येत असेल तर बाप-लेकाचं नातं विसरून लेकानं बापाला जोड्यानं मारल पाहिजे. असं सांगून बाबा म्हणतात -

"ज्या दारूनं करोडपतीचा खानाखराब केला, राजपुत्र मारले, राजवाडे ओसाड पाडले, त्या दारूच्या सावलीत उभं राहू नका .... दारू पिईल तो बाप नाही. लख्खो धन्यानं आपल्या आजाच्या, बापाच्या हातच्या जमिनी पार गमावल्या आन हमाली करून राहिले हमाली !

दिडकी दे ना धर्मा ऽ ला ।।

रूपया मोडून दारू प्याला ।।

......... जे जे दारू पितील त्यांचा खाना खराब झाल्याविना कधी राहनार -- ना ऽ ही !"

**सारांश :**

भारतीय समाजाला वर्षानुवर्षे लागलेली कीड म्हणजे विविध प्रकारची व्यसने, देवपूजा परिणामी अंधश्रध्देत वाढ. मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष झाल्यास त्याचे दूरगामी परिणाम समाजव्यवस्थेवर होतात हे आपल्या बोली भाषेतून उभ्या महाराष्ट्राला गाडगे बाबांनी पटवून दिले. आपला व्यवसाय, नोकरी करीत आपले व्यावसायिक, सामाजिक आणि आर्थिक व्यवहार काटकसरीने केले पाहिजेत हे विविध दाखले देवून त्यांनी पटवून दिले. समाजमनावरील जळमटे दूर केलीत. म्हणूनच त्यांना चालते - बोलते विद्यापीठ संबोधले जाते. आपल्या कृतीव्दारे त्यांनी लहान - थोरांना आपलेसे करून घेतले होते. समाजाचे प्रत्यक्ष अध्ययन करूनच त्यांनी जनमाणसाला शिक्षित करण्याचे महान कार्य विविध पातळ्यांवर केले आहे.

**संदर्भ सूची:**

१. संपादक डॉ.भाऊ मांडवकर, जागर भाग-१, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती, नागपूर, १९८६.

२. प्रा.हरिभाऊ हिवरे, गाडगेबाबांचे विचारधन, कमला प्रकाशन, अकोला, २००५.

# स्वराज्यातील आर्थिक नि:सारण


अविनाश कुलकर्णी, पुणे,
कृष्णा रेसिडेन्सी, सुस रोड, पाषाण.
भ्रमणध्वनी: ९८२२२०३१८७


प्रस्तावना:

ब्रिटिश राजवटीत राज्यकर्त्यांनी भारतातील बरीच संपत्ती दरवर्षी इंग्लंडला रवाना केली. भारताच्या दारिद्र्याचे हेही एक प्रमुख कारण होते. या सिद्धांताला 'आर्थिक नि:सारणाचा सिद्धांत' असे म्हटले जाते. या विचारांचे मूळ राजाराममोहन रॉय यांच्या १८३१ मधील, 'हाऊस ऑफ कॉमन्स'च्या सिलेक्ट कमिटीपुढील साक्षीत सापडते. परंतु सिद्धांताची शास्त्रशुद्ध स्वरुपात प्रथम मांडणी इ.स. १८६७ मध्ये दादाभाई नौरोजी यांनी केली. हा आर्थिक नि:सारणाचा सिद्धांत पुढीलप्रमाणे:

''इ.स. १८५१ पासून १८७१ पर्यंतच्या म्हणजे सुमारे वीस वर्षांच्या काळात दादाभाईंनी हिंदुस्थानच्या द्रव्याचे (संपत्तीचे) शोषण कोणकोणत्या प्रकारे चालू आहे आणि त्यामुळे हिंदी जनता किती दरिद्री झालेली आहे, याचा बरोबर अंदाज केला आणि हे द्रव्यशोषण थांबविल्याखेरीज हिंदी जनतेचा कोणत्याही प्रकारचा उद्धार होणार नाही असा ठाम सिद्धांत बसविला.''

भारतातून दरवर्षी किती पैसा इंग्लंडमध्ये जातो? कोणकोणत्या कारणांनी वा मार्गांनी ही संपत्ती इंग्लंडला जाते? हे संपत्तीचे नि:सारण होण्याचे कारण काय? त्याचे भारतावर होणारे परिणाम कोणते? आणि नि:सारणातून उद्भवणाऱ्या दारिद्र्यासारख्या आर्थिक समस्यांवर उपाय कोणते? याबाबींचा मागोवा व विश्लेषण भारतीय अर्थतज्ज्ञांनी व नेत्यांनी केले यालाच आर्थिक नि:सारणाचा सिद्धांत असे म्हटले जाते.

''ब्रिटिशकाळात व्यापार, रेल्वे बांधणी, लष्कर, विविध कर, गुंतवणूकीवरील व्याज इ. अनेक मार्गांनी एकंदर १६ कोटी रुपये परदेशस्थ लोकांचे राज्य हिंदुस्थानात (भारतात) असल्याकारणाने दरवर्षी परदेशात पाठविले जात होते.

हिंदी संपत्तीला ही जी मोठी गळती लागलेली आहे, तिचे मूळ स्वरूप दोन प्रकारचे आहे: एक राजकीय आणि दुसरे व्यापारी किंवा औद्योगिक.''

दादाभाई नौरोजींनी वरील राजकीय कारणाने होणाऱ्या नि:सारणाशिवाय आणखीही एका कारणाचा विचार केला. ही बाब म्हणजे ब्रिटिश भांडवलाची भारतातील गुंतवणूक. इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीच्या प्रगत टप्प्यावर अतिरिक्त भांडवलाची समस्या निर्माण झाली. हे अतिरिक्त वा जादा भांडवल इंग्लंडमध्येच गुंतविणे फारसे फायदेशीर राहिले नव्हते. या अतिरिक्त भांडवलाच्या गुंतवणुकीसाठी ब्रिटिशांनी भारतासारख्या वसाहतीचा वापर केला. या भांडवलाच्या साहाय्याने भारतातील कच्चा माल, खनिजे व श्रमशक्ती यांच्या वापरामुळे जो नफा मिळत असे, तो मात्र भारतात न राहता इंग्लंडमध्ये जात असे.

या आर्थिक नि:सारणाचे वर्णन राष्ट्रसभेचे एक अध्यक्ष पी. आनंद चार्लू यांनी 'कुंपणाने शेत खाल्ले' या शब्दात केले.

आर्थिक नि:सारणाने जगातील सर्वांत समृद्ध देशास दरिद्री बनविले आणि भारतास पूर्वीपेक्षा, अधिक व्यापक, वाईट व नेहमी येणाऱ्या दुष्काळाची भूमी बनविले.

दादाभाई म्हणत की, *जोपर्यंत या द्रव्याच्या पाझराचे परिणाम कोणास बरोबर समजले नव्हते, तोपर्यंत ते एक दुर्दैव म्हणता येईल; पण ते परिणाम समजल्यानंतर हे द्रव्यहरण चालू ठेवणे म्हणजे ती हिंदुस्थानच्या धनाची बुद्धिपूर्वक केलेली एक लूटच होय असे म्हणणे भाग आहे.*

## स्वराज्यातील आर्थिक नि:सारण:

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश राजवटीमुळे होणारे आर्थिक नि:सारण हे परकीय राजकीय व्यवस्थेचा परिणामामुळे होते. परंतु स्वातंत्र्योत्तर भारतात आजही अनेक मार्गांने अधिकृत व अनधिकृत मार्गांने प्रचंड प्रमाणात संपत्तीचा ओघ परदेशांमध्ये जात आहे. आता इंग्लंड ऐवजी इतर (स्वित्झर्लंड) देशांमध्ये भारतातील संपत्ती जात आहे. त्यामुळे भारताच्या आर्थिक विकासासाठी सतत भांडवली गुंतवणुकीचा तुटवडा जाणवत आहे. परिणामी परदेशातून भांडवली गुंतवणुकीचा ओघ भारतात वाढत आहे. यातून होणारा फायदा अर्थातच परदेशात जातो. परिणामी स्वतंत्र भारतात म्हणजेच स्वराज्यातही भारताचे आर्थिक नि:सारण होते आहे. परिणामी रुपयाचे अवमूल्यनही होते. अशा तऱ्हेने या आर्थिक नि:सारणाचे वेगवेगळे परिणाम होत असल्याचे आढळून येत आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळाप्रमाणेच स्वराज्यातही हे आर्थिक नि:सारण नियमितपणे होत असल्याचे पुढील काही संदर्भातून स्पष्ट हाते.

काळा पैसा धारकांसाठी नंदनवन मानल्या जाणाऱ्या स्वित्झर्लंडमधील स्विस बँकेत भारतीयांचे तब्बल २.१८ अब्ज स्विस फ्रँक्स (जवळपास १२ हजार ७४० कोटी रुपये) अधिकृतपणे जमा आहेत. स्विस बँकेनेच ही माहिती १४ जून २०१२ रोजी उघड केली. ही सर्व रक्कम अधिकृत असून यामध्ये भारतीयांसाठी जमा असलेल्या काळ्या पैशाचा समावेश नाही असे बँकेने स्पष्ट केले.

बँकेच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार २०१० पेक्षा २०११ साली भारतीयांच्या अधिकृत खात्यातील रकमेत ३ हजार ५०० कोटींची वाढ

झाली आहे. यापूर्वी २००६ मध्ये भारतीयांच्या खात्यातील रकमेत ४० हजार कोटींची वाढ झाली होती असा आरोप केला जातो. (दै. लोकसत्ता १५-६-२०१२)

भारतीयांनी स्विस बँकेमध्ये ठेवलेल्या पैशांप्रमाणेच भारताच्या संपत्तीचा खूप मोठा हिस्सा हा कच्चे तेल आणि सोने चांदी आयातीपोटी परदेशात जातो त्यामुळेसुद्धा भारताचे आर्थिक नि:सारण होत आहे.

"निर्यातीच्या माध्यमातून भारत देश जेवढा विदेशी निधी जमवितो त्याच्या अर्ध्याहून अधिक निधी हा कच्चे तेल आयात करण्यासाठी देशाला मोजावा लागतो, असे गणित *'असोचेम'* या उद्योजकांच्या संघटनेने मांडले आहे. सन २०११-१२ या आर्थिक वर्षात भारताने ३०३ अब्ज डॉलरची निर्यात तर ४८५ अब्ज डॉलरची आयात राखली आहे. पैकी १६० अब्ज डॉलर हे कच्च्या तेलाच्या, तर ६० अब्ज डॉलर हे सोने व चांदीसारख्या मौल्यवान धातूच्या आयातीवर खर्च झाले आहे." (दै.लोकसत्ता २७-६-२०१२)

अशा प्रकारे व्यापारातील असमतोलामुळे भारताच्या संपत्तीचा बहुसंख्य भाग हा परदेशी जातो. त्यातूनसुद्धा भारताचे आर्थिक नि:सारण होते आहे. त्याचबरोबर दादाभाई नौरोजींनी म्हटल्याप्रमाणे बुद्धिपूर्वकही भारताच्या संपत्तीची ही लूट चालूच आहे. ब्रिटीश गेले तरी स्वकीयांमध्ये असणाऱ्या त्यांच्या वृत्तीने या देशाची लूट करुन स्वातंत्र्यपूर्वकाळाप्रमाणे आर्थिक नि:सारण आजही बुद्धिपूर्वक केले जात आहे. त्याचे आणखी एक महत्त्वपूर्ण उदाहारण पुढीलप्रमाणे.

"बेल्लारीतील खाणींवर रेड्डींनी असा डल्ला मारला की ३० वर्षांत खणावयाचं लोखंड त्यांनी ७ वर्षातच फस्त करून टाकलं. सुमारे १ अब्ज टन कच्च लोखंड या प्रचंड साठ्यावर रेड्डी यांनी कवडीमोल भावानं मिळविलेले हे लोखंड विकून अब्जावधी रुपये कमविले आणि ज्या राज्याचं मंत्रीपद भूषवलं त्या कर्नाटक राज्याचं १६० अब्ज रुपयांचे नुकसान केले असा आरोप केला जातो." (दै. महाराष्ट्र टाइम्स ११-९-२०११)

तसेच देशातील टू जी स्पेक्ट्रम, कॉमनवेल्थ, कोळसा खाण वाटप घोटाळा यांमध्ये लाखो करोडो रुपयांचे घोटाळे झाल्यामुळे देशाच्या अर्थकरणाची दिशा आणि अडचणी अधिकच वाढत असल्याचे दिसून येते. अशा कोट्यावधी रुपयांच्या घोटाळ्यांमुळे देशातील महागाईने होरपळलेल्या जनतेला दिलासा देण्याऐवजी सप्टेंबर २०१२ मध्ये डिझेल व घरगुती गॅसच्या दरांमध्ये वाढ केल्याने जनतेमध्ये आर्थिक असुरक्षिततेची भावना निर्माण होते व जनतेचा सरकारवरील विश्वास कमी होतो. परिणामी राजकीय अस्थिरतासुद्धा निर्माण होते आहे.

### आर्थिक नि:सारणाची कारणे:

ब्रिटिश राजवटीप्रमाणेच स्वकीय राजवटीतसुद्धा स्वकीयांनीच आपल्या देशाचे आर्थिक नि:सारण केले असल्याचे वरील संदर्भातून स्पष्ट होते. हाच पैसा भारतातील भांडवली गुंतवणुकीसाठी वापरला गेला असता तर भारतातील विकासास त्याची निश्चितच खूपमोठी मदत झाली असती. शिवाय परकीय गुंतवणुकीपेक्षा स्वकीय गुंतवणूक अधिक फायदेशीर ठरली असती.

या आर्थिक नि:सारणास आता परकीय

राजवट हे प्रमुख कारण नसून स्वतंत्र भारताच्या नागरिकांमध्ये राष्ट्रभक्ती, निष्ठा आणि राष्ट्रवादी विचारसरणीचा अभाव असल्याचेच प्रथमदर्शनी दिसून येते. त्याचबरोबर पुढील पिढ्यांसाठी आर्थिक तरतूद किंवा सुरक्षितता हेही एक कारण अशा संचयीवृत्तीसाठी कारणीभूत असल्याचे दिसून येते. देशातील राजकीय अनास्था आणि देशाअंर्तगत गुंतवणुकीसाठी प्रोत्साहनाचा अभाव हेही एक कारण असल्याचे दिसते.

या विविध कारणांमुळेच स्वराज्यातही आर्थिक नि:सारणाचा सिद्धात लागू पडत असल्याचे दिसून येते आहे. याविविध कारणांबरोबरच देशाच्या आयात-निर्यात व्यापारातील तूट अर्थात व्यापार असमतोल हेही एक कारण या आर्थिक नि:सारणात महत्त्वपूर्ण आहे.

"परकीय चलनाचा तुटवडा म्हणून भारताला १९९१ मध्ये अतिशय अपमानास्पद अटींवर आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून कर्जे घ्यावी लागली. याचे एक कारण म्हणजे भारताबाबत केलेल्या अंदाजानुसार गेल्या ६० वर्षांत भारतातून एकूण २१३ अब्ज डॉलर्स देशाबाहेर बेकायदेशीररित्या नेण्यात आले असा आरोप केला जातो. भारताच्या बाहेर गेलेल्या या मालमत्तेचे आजचे मूल्य सुमारे ४६२ अब्ज डॉलर्स (१८ हजार ४८० अब्ज रुपये) इतके आहे." अशा रितीने काळ्या पैशाची समस्या देशाच्या अर्थव्यवस्थेला अधिकच घातक ठरत असल्याचे दिसून येते आहे. (दै. महाराष्ट्र टाइम्स १२-६-२०११)"

याच आर्थिक नि:सारणातील पैसा जर देशासाठी खर्च झाला तर देशात मोफत आरोग्य, शिक्षण, उत्तम पायाभूत सुविधा, स्वस्त वीज यांची उभारणी करणे शक्य होईल. तसेच कोट्यावधी रुपयांच्या घोट्याळ्यातील पैशातून गरीब जनतेला घरगुती वापरावयाच्या गॅसच्या दरामध्ये कायमस्वरुपी सवलती देता येतील.

उपाययोजना:

या आर्थिक नि:सारणातही अगदी ब्रिटिश काळात ज्या उपाययोजना मांडल्या गेल्या होत्या त्यापैकी काही उपाययोजना आजही उपयुक्त असल्याचे दिसून येते.

राष्ट्रप्रेमाने प्रेरित होऊन भारतीय जनतेने काय केले पाहिजे, याबाबतच्या आपल्या विचारांचा प्रचार नेत्यांनी केला. आजच्या काळातही ही उपाययोजना अत्यंत आवश्यक आहे.

काटकसर हा प्राथमिक परंतु प्रभावी उपाय सुचविण्यात आला होता. तोच आजही महत्त्वाचा आहे. भारताच्या आयातीमध्ये सर्वात जास्त आयात खनिज तेल, वायू इ. ची आहे. खनिज तेल कमीत कमी आयात करावे लागावे यासाठी भारतीयांनी स्वयंचलित विशेषत: कमी मायलेज देणाऱ्या वाहनांचा कमीत कमी वापर करुन काटकसर हा उपाय राष्ट्रहितासाठी तसेच स्वयंहितासाठी घेणे आवश्यक असल्याचे दिसून येते.

भारतीयांनी दागदागिने, चैनविलास यांसारखे अनुत्पादक खर्च कमी करावेत त्यामुळे किमान बचत वाढेल. या बचतीचा उपयोग स्वदेशी उद्योगांना भांडवल म्हणून होईल, असा फायदा स्वातंत्र्यपूर्व काळातील नेत्यांनी दाखवून दिला होता. तो आजही महत्त्वपूर्ण आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळातील ह्या महत्त्वपूर्ण

उपाययोजना आजच्या काळातही तितक्याच महत्त्वपूर्ण असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रवादी भावना ही भारतीयांच्या मनामध्ये सतत निर्माण होणे महत्त्वपूर्ण आहे. त्यादृष्टीने राष्ट्रीय नेत्यांनी, देशातील माध्यमांनी आणि सामाजिक संस्थांनी व संघटनांनी प्रयत्नशील राहणे महत्त्वपूर्ण आहे.

**समानता व विषमता** (Similarities & Dissimilarities):

स्वातंत्र्यपूर्वकाळातील व स्वराज्यातील आर्थिक नि:सारणाच्या ह्या सिद्धांतातील बाबींची समानता व विषमता पुढीलप्रमाणे आहे.

• आर्थिक नि:सारणाच्या कारणांमध्ये प्रामुख्याने समानता दिसून येते. राजकीय व औद्योगिक किंवा व्यापार ह्या कारणामुळे स्वराज्यातही स्वातंत्र्यपूर्व काळाप्रमाणेच आर्थिक नि:सारण होते आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात परकीय राज्यव्यवस्थेद्वारे संपत्तीचे आर्थिक नि:सारण होत होते तर स्वराज्यातही राजकीय अनास्थेमुळे संपत्तीचे आर्थिक नि:सारण होत असल्याचे दिसून येते.

तसेच व्यापार असमतोल या स्वातंत्र्यपूर्व काळातील कारणामुळे जसे आर्थिक नि:सारण होत होते, ते आजही होत आहे.

बुद्धिपूर्वक संपत्तीचे आर्थिक नि:सारण हेसुद्धा स्वराज्यातील आर्थिक नि:सारणाचे प्रमुख कारण असल्याचे स्पष्ट होते.

परकीयांच्या ऐवजी आता स्वकीयांच्याद्वारेच संपत्तीचे आर्थिक नि:सारण होत आहे ही विषमता यातून स्पष्ट होते.

वरील कारणांप्रमाणेच उपाययोजनांमध्येसुद्धा समानता मांडता येते, ती म्हणजे काटकसर, तसेच राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रवाद, जनतेमध्ये जागृत करणे या उपययोजना स्वातंत्र्यपूर्वकाळात आवश्यक होत्या, त्या स्वराज्यातही आवश्यक आहेत. त्यामुळेच स्वातंत्र्यपूर्व काळाप्रमाणेच स्वराज्यातही ह्या आर्थिक नि:सारणाच्या विरोधात चळवळी व आंदोलने होत आहेत. आर्थिक राष्ट्रवादी चळवळी होत आहेत.

**संदर्भ सूची:**

१. दै. लोकसत्ता

२. दै. महाराष्ट्र टाइम्स

३. आधुनिक भारत, प्रकाशन - टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

४. आधुनिक भारत, लेखक - शं.द. जावडेकर, १९५३

# नव्या आर्थिक धोरणाचा कामगार जगतावरील परिणाम

राजन तुंगारे, मुंबई,
संचालक,
पी.एम.कडुकर, मुंबई,
अधिव्याख्याता,
कै.नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था,
(महाराष्ट्र शासन), परेल.

---

प्रस्तावना :

तत्कालीन अर्थमंत्री आणि सध्या देशाच्या पंतप्रधानपदावर कार्यरत असलेले डॉ.मनमोहन सिंग यांनी २४ जुलै १९९१ रोजी आपला पहिला अर्थसंकल्प सादर केला. हा अर्थसंकल्प म्हणजे नव्या मुक्त आर्थिक धोरणाचे द्योतकच होय. या घटनेला २० वर्षे पूर्ण होऊन गेली. काय घडले या २० वर्षात? भारतीय अर्थकारण आणि त्या निमित्ताने शेती, उद्योग, व्यापार, सेवा रोजगार आणि विशेष म्हणजे संपूर्ण कामगार जगतात काय परिणाम घडून आले? बंदिस्त शासन नियंत्रित अर्थव्यवस्थेकडून खुल्या अर्थव्यवस्थेकडे जाणारे नवे आर्थिक धोरण ज्यात परकिय गुंतवणुकीस परवानगी, जागतिक वित्त संस्थांकडून कर्ज घेण्यास परवानगी, रुपयाचे अवमूल्यन, रुपयाची परिवर्तनियता, व्यापार व उद्योगावरील निर्बंध हटविणे, खासगीकरणास प्रोत्साहन, मक्तेदारी नियंत्रण दूर करणे आणि एकूणच जागतिकीकरण, खासगीकरण आणि उदारीकरण यांचा पुरस्कार करणारे हे धोरण.

कामगार हा कोणत्याही देशाच्या विकासातील आधारभूत घटक मानला जातो. तेव्हा कामगार जगतामध्ये या नव्या धोरणाचे काय परिणाम झाले आहेत याचे विश्लेषण होणे आवश्यक ठरते. गेल्या २० वर्षांत रोजगार, स्वयंरोजगार तसेच बेरोजगारीची स्थिती काय आहे? या नव्या आर्थिक धोरणामुळे कौशल्य व तंत्रज्ञानाचा कामगार जगतावर काय परिणाम झाला आहे? तसेच औद्योगिक संबंध, कामगार चळवळ यावर काय परिणाम होत आहे? यासारख्या प्रश्नांचा उहापोह

प्रस्तुत शोधनिबंधात करण्याचा प्रयत्न केला आहे.

## का स्वीकारले नवे आर्थिक धोरण?

स्वातंत्र्यानंतर भारताने भांडवलशाही आणि समाजवाद या दोघांचा समन्वय साधत मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली. त्यामुळे अर्थव्यवस्थेत शासनाचा मोठ्या प्रमाणात सहभाग राहिला. नियोजनाच्या माध्यमातून विकास हे सुत्र स्वीकारले. सुरुवातीपासूनच देशातील उद्योगांना संरक्षण मिळावे व साधनसामग्रीचा योग्य वापर व्हावा म्हणून स्पर्धा कमी ठेवण्याचा प्रयत्न केला गेला. निर्यातीवर बंधने व आयातीला पर्याय देण्यावर भर होता. मक्तेदारी संदर्भातील *एमआरटीपी* सारख्या कायद्यांमुळे उद्योगांवर विस्ताराच्या मर्यादा होत्या. सार्वजनिक क्षेत्रातील बरेचसे उद्योग तोट्यात जाऊ लागले, कर्जाचे प्रमाण वाढत गेले, त्यामुळे देशाची आर्थिक स्थिती खालावत जाऊ लागली. १९९१ मध्ये कर्जबाजारीपणात भारताचा जगात तिसरा क्रमांक होता. जागतिक मानव संसाधन विकासाच्या (Human Resource Development) १९९१ च्या अहवालानुसार भारताचा १२३ वा क्रमांक होता.

विदेशी गंगाजळी केवळ ४.४ अब्ज डॉलर्स शिल्लक राहिली. तसेच देशाला ६७ टन सोने आंतरराष्ट्रीय नाणे निधीला (IMF) विकावे लागले आणि त्यानुसारच देशाची आर्थिक पुनर्रचना करण्यास संमती द्यावी लागली. थोडक्यात जागतिक वित्तीय संस्था (IMF, IBRD) आणि इतर विकसित राष्ट्रांची आर्थिक पुनर्रचना करण्यासाठी दबाव वाढत गेला म्हणूनच भारताला नवे आर्थिक धोरण स्वीकारण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. थोडक्यात आर्थिक धोरणात बदल करणे ही एक अपरिहार्यता होती त्याचे काही सकारात्मक परिणाम आज दिसून येत आहेत. तथापि, काही प्रतिकुल परिणामही होत आहेत हे वास्तव नाकारता येणार नाही. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये या नव्या आर्थिक धोरणाचा कामगार जगतावरील परिणाम अभ्यासण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## शोधनिबंधाची अभ्यास पद्धती:

कामगार हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्वाचा आधारभूत घटक मानला जातो. देशातील अर्थव्यवस्थेमध्ये होणाऱ्या धोरणांचा परिणाम हा प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे कामगारांवर होत असतो. १९९१ च्या नव्या आर्थिक धोरणानंतर कामगार जगतामध्ये मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. श्रम बाजारामध्ये (Labour Market) प्रामुख्याने श्रमाची मागणी व त्यासाठी होणारा श्रमाचा पुरवठा हा अनेक बाबींवर अवलंबून असतो. श्रमाची मागणी व श्रमाचा पुरवठा या दोन्ही घटकामध्ये समतोल साधणे हे अर्थव्यवस्थेसमोरील एक आव्हान असते.

प्रस्तुत शोधनिबंध हा प्रामुख्याने दुय्यम साधनसामग्रीवर आधारीत असून या शोधनिबंधाची प्रमुख उद्दिष्टे ही खालीलप्रमाणे आहेत.

१) नव्या आर्थिक धोरणाच्या अनुषंगाने भारतातील रोजगार व बेरोजगारीच्या स्थितीवर काय परिणाम झाला आहे याचा आढावा घेणे.

२) नव्या आर्थिक धोरणामुळे कौशल्य व तंत्रज्ञानाचा कामगार जगतावर काय परिणाम झाला आहे याचा अभ्यास करणे.

३) जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर औद्योगिक संबंध आणि कामगार चळवळीवरील परिणामांचा थोडक्यात आढावा घेणे.

४) नव्या अर्थरचनेतील भारतीय

कामगारांसाठीच्या नव्या संधी व नवी आव्हाने तपासण्याचा प्रयत्न करणे.

वरील उद्दिष्टांच्या अनुषंगाने प्रस्तुत शोधनिबंध अधिक शास्त्रीय पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## नवीन आर्थिक धोरणाचा रोजगार व बेरोजगारीवरील परिणाम:

नव्या आर्थिक धोरणाच्या अनुषंगाने भारतातील रोजगाराच्या स्थितीचा आढावा घेताना आपल्याला प्रामुख्याने दोन टप्पे दिसून येतात. १९९१ ते १९९९-२००० हा कालावधी विचारात घेऊन राष्ट्रीय नमुना पाहणी सर्वेक्षण अहवालाचा आधार घेतला तर रोजगारात घट झाल्याचे दिसून येते. परंतु राष्ट्रीय उत्पन्नात मात्र वाढ झाली. त्यामुळे काही तज्ज्ञांनी या अवस्थेचा उल्लेख रोजगार विरहीत विकास (Jobless Growth) असा केला आहे. तथापि १९९९-२००० ते २००४-२००५ या टप्प्यामध्ये रोजगारात वाढ झाल्याचे स्पष्ट होते. डॉ.अर्जुन सेनगुप्ता अहवालामध्ये रोजगाराचे स्वरुप स्पष्ट करताना प्रमुख्याने दोन प्रकार केले आहेत. १) औपचारिक क्षेत्र (संघटित क्षेत्र) २) अनौपचारिक क्षेत्र (असंघटित क्षेत्र). १९९९-२००० आणि २००४-२००५ या कालावधीत भारतातील रोजगाराचे स्वरुप नक्की काय आहे हे खालील तक्त्यावरुन स्पष्ट होईल.

तक्ता क्र.१
क्षेत्रनिहाय रोजगाराचे स्वरुप (दशलक्षमध्ये)

| क्षेत्र | अनौपचारिक रोजगार | औपचारिक रोजगार | एकुण रोजगार |
|---|---|---|---|
| १९९९-२००० | | | |
| अनौपचारिक क्षेत्र | ३४१.३ | १.४ | ३४२.७ |
| औपचारिक क्षेत्र | २०.५ | ३३.७ | ५४.२ |
| एकुण | ३६१.८(९१%) | ३५.१ (०९%) | ३९६.९(१००%) |
| २००४-२००५ | | | |
| अनौपचारिक क्षेत्र | ३९३.५ | १.४ | ३९४.९ |
| औपचारिक क्षेत्र | २९.१ | ३३.४ | ६२.६ |
| एकुण | ४२२.६(९३%) | ३४.८ (०७%) | ४५७.४ (१००%) |

स्त्रोत- National Commission for Enterprises in the Unorganised Sector (NCEUS) 2007.

**भारतातील बेरोजगारीची स्थिती:**

राष्ट्रीय नमुना पाहणी सर्वेक्षण अहवालानुसार ग्रामीण भागात पुरुष व स्त्रिया या दोन्हींच्या बाबतीत बेरोजगारीच्या चारही स्थिती लक्षात घेता, बेरोजगारीचा दर वाढल्याचे खालील तक्त्यावरुन दिसुन येते.

**तक्ता क्र.२: बेरोजगारीचा दर (स्थितीनिहाय)**

| NSS फेरी | सर्वसाधारण स्थिती (US) | साधारण + दुय्यम स्थिती (US + SS) | चालु साप्ताहिक स्थिती (CWS) | चालू दैनिक स्थिती (CDS) |
|---|---|---|---|---|
| ग्रामीण पुरुष | | | | |
| ५० वी (१९९३-९४) | २.० | १.४ | ३.१ | ५.६ |
| ५५ वी (१९९९-००) | २.१ | १.७ | ३.९ | ७.२ |
| ६१ वी (२००४-०५) | २.१ | १.६ | ३.८ | ८.० |
| ग्रामीण स्त्रिया | | | | |
| ५० वी (१९९३-९४) | १.३ | ०.९ | २.९ | ५.६ |
| ५५ वी (१९९९-००) | १.५ | १.० | ३.७ | ७.० |
| ६१ वी (२००४-०५) | ३.१ | १.८ | ४.२ | ८.७ |
| शहरी पुरुष | | | | |
| ५० वी (१९९३-९४) | ५.४ | ४.१ | ५.२ | ६.७ |
| ५५ वी (१९९९-००) | ४.८ | ४.५ | ५.६ | ७.३ |
| शहरी स्त्रिया | | | | |
| ५० वी (१९९३-९४) | ८.३ | ६.१ | ७.९ | १०.४ |
| ५५ वी (१९९९-००) | ७.१ | ५.७ | ७.३ | ९.४ |

US: Usual Status; US+SS: Usual Status + Subsidiary Status;

CWS : Current Weekly Status; CDS : Current Daily Status.

Source : NSS Report No.515 Employment and Uneemployment Situation in India.

तक्ता क्र. १ वरून असे दिसून येते की, भारतीय अर्थव्यवस्थेतील एकूण रोजगार १९९९-२००० मध्ये ३९६.९ दशलक्ष इतका होता. तो २००४-०५ मध्ये ४५७.४ दशलक्ष इतका झाला म्हणजेच एकुण रोजगारात ६०.५ दशलक्ष इतकी वाढ झाली. अनौपचारिक क्षेत्रातील अनौपचारिक रोजगारात लक्षणीय वाढ म्हणजेच एकूण ५२.२ दशलक्ष इतकी झाली आहे. ही वाढ १९९९-२००० ते २००४-२००५ या कालावधीत एकूण रोजगाराच्या ८६ टक्के इतकी आहे.

औपचारिक क्षेत्रातील औपचारिक रोजगार मात्र १९९९-२००० ते २००४-२००५ या कालावधीत अंशतः घटलेला आहे. ही घट ३३.७ दशलक्षवरुन ३३.४ दशलक्ष इतकी झाली आहे. तर याच कालावधीत औपचारिक क्षेत्रातील अनौपचारिक रोजगार मात्र २०.५ दशलक्षवरुन २९.१ दशलक्ष झाला म्हणजेच ८.५ दशलक्षने वाढला.

थोडक्यात अनौपचारिक क्षेत्रातील अनौपचारिक रोजगार ५२.२ दशलक्षाने वाढला तेव्हा एकूण अनौपचारिक रोजगारातील वाढ ६०.५ दशलक्ष झाली. यावरुन आपण या निष्कर्षाला यायला हरकत नाही की, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये औपचारिक क्षेत्रामध्ये अनौपचारिक रोजगाराची संख्या वाढत आहे. (किरकोळ, हंगामी, कंत्राटी, नोकरीच्या शाश्वतीशिवाय रोजगार)

अर्जुन सेनगुप्ता अहवालावरून हे देखील स्पष्ट होते की, देशातील एकूण कार्यशक्तीच्या (Work Force) ५६% कार्यशक्ती ही स्वयंरोजगारीत कार्यशक्तीमध्ये मोडते. (त्यामध्ये ६४% कृषी क्षेत्रातील स्वयंरोजगारित व ४६% गैरकृषी क्षेत्रातील स्वयंरोजगारितांचा समावेश होतो.) एकंदरीत देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये रोजगाराचे अनौपचारिकीकरण जागतिकीकरणाच्या प्रवाहात वाढत आहे. किंबहुना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून काही प्रमाणात बेरोजगारीचे विस्थापन होण्यास मदत होत आहे असे म्हटले तर वावगे ठरु नये.

तक्ता क्र. २ वरुन आपल्याला प्रकर्षाने असे दिसून येते की, भारतातील ग्रामीण विभागामध्ये पुरुष व स्त्रिया या दोन्हींमध्ये बेरोजगारीचा दर वाढला आहे. विशेष म्हणजे बेरोजगारीच्या चारही स्थितीमध्ये (सर्वसाधारण स्थिती, सर्वसाधारण + दुय्यम स्थिती, चालू साप्ताहिक स्थिती, चालू दैनिक स्थिती) बेरोजगारीचे दर वाढले आहेत. चालू दैनिक स्थितीनुसार (CDS) बेरोजगारीचा दर ग्रामीण पुरुष या वर्गात १९९३-९४ मध्ये ५.६ होता. तो २००४-२००५ च्या एन.एस.एस. फेरीनुसार ८.० इतका झाला आहे. तर ग्रामीण स्त्रिया या वर्गात हा दर याच कालावधीत ५.६ वरुन ८.७ इतका झाला आहे. शहरी पुरुष व स्त्रिया या दोन्ही वर्गात हा दर मात्र बेरोजगारीच्या चारही स्थितीत घटल्याचे चित्र स्पष्ट होते. हा नव्या आर्थिक धोरणाचा शहरी बेरोजगारीच्या संदर्भात झालेला एक सकारात्मक परिणाम म्हणावा लागेल.

राष्ट्रीय नमुना पाहणी सर्वेक्षण अहवालानुसार (६१ वी फेरी) श्रम बाजारातील स्वयंरोजगारीत कामगारांचे प्रमाण वाढत आहे. त्याचवेळी कार्यशक्तीच्या किरकोळ, दैनिक मजुरीवर काम करणाऱ्या (Casualisation of Workforce) कामगारांचे प्रमाण मात्र घटत आहे. १९९९-२००० ते २००४-०५ या कालावधीत अर्थव्यवस्थेच्या प्राथमिक क्षेत्रामध्ये स्वयंरोजगारीत पुरुषांचे प्रमाण ५८ टक्क्यांवरुन ६३ टक्के झाले आहे. तर स्वयंरोजगारीत स्त्रियांचे प्रमाण ४९ टक्क्यांवरुन ५७ टक्के झाले. परंतु याचे स्वरुप हे अनिश्चित आहे असे म्हणावे लागेल. कारण कृषी क्षेत्रात बहुतांश शेती कामगार हे सिमांत शेतकरी या वर्गात मोडतात. उत्पादन व सेवा क्षेत्रात मात्र अनौपचारिक रोजगाराचे प्रमाण वाढत असल्याचे स्पष्ट होते.

भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशामध्ये एकीकडे वाढ होणाऱ्या

श्रमशक्तीला रोजगार मिळवून देताना भूतकाळातील साठत गेलेल्या श्रमशक्तीला (बेरोजगारीत) रोजगाराच्या संधी निर्माण करुन बेरोजगारीचे प्रमाण कमी करणे हे प्रचंड मोठे आव्हान आज देशासमोर आ वासून उभे आहे.

**नव्या आर्थिक धोरणामुळे कौशल्य व तंत्रज्ञानाचा कामगार जगतावरील परिणाम:**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत कौशल्य व तंत्रज्ञानाचा कामगार क्षेत्रावर काय परिणाम झाला हे तपासणे देखील महत्त्वाचे आहे. आधुनिक तांत्रिक बदलांमुळे कामगारांची मागणी ही कौशल्यावर आधारित उत्पादकता वाढीस मदत होईल या दृष्टीने वाढू लागली आहे. त्यामुळे साहजिकच उच्चशिक्षीत व अनुभवी कुशल कामगारांना प्राधान्य देण्यात येऊ लागले आहे. त्याचा परिणाम कुशल व अकुशल कामगारांमधील वेतनात मोठी विषमता निर्माण होत आहे. स्थानिक पातळीवर देखील स्पर्धात्मक दृष्टीकोन तयार होऊन उत्पादकता वाढीवर भर देण्यात येत आहे. एकूणच उत्पादनाची प्रक्रिया ही जागतिक होऊ लागली आहे. निर्यातक्षम उद्योगांमध्ये तर कुशल कामगार हा महत्वाचा घटक ठरला आहे. अलिकडे कौशल्य व तंत्रज्ञानाचा वापर हा लघु उद्योगांपासून मोठ्या उद्योगांपर्यंत सर्वच ठिकाणी होत आहे. वाढत्या तंत्रज्ञानामुळे व कच्च्या मालाच्या वाढत्या किंमतीच्या तुलनेत अंतिम वस्तूंची किंमत मोठ्या प्रमाणात न वाढवता ती समायोजित करता यावी म्हणून कमी वेतनात कंत्राटी कामगार व हंगामी कामगारांकडून उत्पादन प्रक्रिया करवून घेण्याकडे जवळ-जवळ सर्वच उत्पादकांचा, मालकांचा कल दिसून येतो. यामुळे कामगार वर्गाची कामाची, सेवेची योग्य स्थिती (Decent Work), सामाजिक सुरक्षितता त्यांच्या समाधानाची पातळी या बाबी जागतिकीकरणाच्या २० वर्षानंतर वाढत आहेत का? या प्रश्नाचे उत्तर निश्चित सकारात्मक असेल असे सद्यातरी चित्र दिसत नाही.

नव्या आर्थिक धोरणामुळे आपली अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडली गेली. कौशल्यावर आधारीत उत्पादन व सेवा क्षेत्र जोडले गेले. त्यामुळे साहजिकच कामगारांचे कौशल्य व ज्ञान याला अधिक महत्त्व येऊ लागले आहे. त्याचा रोजगार प्रकियेशी अधिक जवळचा संबंध आहे. सध्याच्या व्यावसायीक व व्यावहारिक जगतामध्ये औद्योगिक व सेवा विषयक उपक्रमांमध्ये नवीन तंत्रज्ञान, त्यामध्ये माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान (ICT) नाविन्यता, उत्पादकता या बाबी साध्य करणे हे कामगारांमध्ये असणारे कौशल्य व ज्ञान यावरच आधारित आहे. आपल्या देशातील कामगारांमध्ये असणारे कौशल्य व ज्ञान यांचा विचार करता विरोधाभास जाणवतो. देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये एका बाजुला बेरोजगारीत युवकांचा मोठा वर्ग तयार होत आहे. तर दुसऱ्या बाजुला अनेक क्षेत्रामध्ये ज्ञानाधिष्ठित कुशल मनुष्यबळाचा तुटवडा जाणवतो. राष्ट्रीय नमुना पाहणी सर्वेक्षण अहवाल २००४-०५ नुसार आपल्या देशातील २०-२४ या वयोगटातील श्रमशक्तीच्या फक्त ५% श्रमशक्तीला व्यावसायिक प्रशिक्षण मिळाल्याचे निदर्शनास आले आहे. हेच प्रमाण औद्योगिक दृष्ट्या विकसीत राष्ट्रांमध्ये ६०% पेक्षा अधिक असल्याचे दिसुन येते. तसेच आपल्या देशामध्ये शिक्षित आहेत, परंतु त्यांच्याकडे रोजगारक्षम व्यावसायिक कौशल्ये नाहीत अशा बेरोजगारांची संख्या एकूण बेरोजगारीच्या ६१% इतके आहे. तेव्हा

देशासमोरील हे एक आव्हान आहे, अधिकाधिक कुशल कामगार तयार करण्यासाठी व जगातील एक कुशल मानवी भांडवलाचा देश बनवण्यासाठी व्यूहरचना (Strategy) आखण्याची गरज आहे.

**नवे आर्थिक धोरण आणि औद्योगिक संबंध:**

जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर अर्थरचनेमध्ये, औद्योगिक संरचनेमध्ये मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. औद्योगिक संबंधामध्ये नवीन प्रवाह निर्माण होत आहेत. मालक व कामगार यांच्या संबंधाला एक वेगळे वळण मिळत आहे. १९८० च्या दशकात भारतामध्ये औद्योगिक संबंध अधिकच तणावपूर्ण होत गेले. या दशकात (१९८१-९०) औद्योगिक संप, टाळेबंदी यामुळे एकूण ४०२.१ दशलक्ष दिवस कामाचा तोटा झाला, परंतु नव्या आर्थिक धोरणानंतर म्हणजेच १९९१-२००० या दशकाचा विचार केला तर हे प्रमाण कमी होऊन २१० दशलक्ष दिवसांपर्यंत आले. हे चित्र औद्योगिक संबंध सुधारल्याचा निदर्शक मानावा लागेल. अलिकडच्या काळात संप, टाळेबंदी यांचा वापर करण्याऐवजी सामुहीक सौदाशक्ती (Collective Bargaining) चा वापर करुन वाटाघाटी करण्यावर भर देऊन दोघांचाही फायदा (Win-Win Situation) कसा होईल यावर भर दिला जातो.

१९९१ नंतर देशामध्ये हळूहळू कामगार कपातीचे धोरण राबविण्यास मालकांकडून सुरुवात झाली. त्यात भर म्हणजे शासनाची स्वेच्छानिवृत्ती योजना [Voluntary Retirement Scheme (VRS)]. खाजगी व सार्वजनिक या दोन्ही क्षेत्रात या योजनेच्या माध्यमातून अप्रत्यक्षपणे कामगारांवर स्वेच्छा निवृत्तीसाठी दबाव वाढत गेला. त्यासाठी वेगवेगळ्या मार्गांचा वापर करुन कामगारांना स्वेच्छा निवृत्तीसाठी भाग पाडण्यात येऊ लागले. तसेच नवीन कामगारांना कायमस्वरूपी न करण्याचे धोरण राबविण्यात येऊ लागले. याचा परिणाम म्हणून कायमस्वरुपी संघटित कामगार वर्गाचे प्रमाण नव्या आर्थिक व्यवस्थेमध्ये सातत्याने घटत गेल्याचे आपणास दिसून येते. हा कामगार क्षेत्राच्या अनुषंगाने होत असलेला एक प्रतिकुल परिणाम असून, त्यामुळे अनौपचारिक क्षेत्रात कामगारांचे प्रमाण वाढत आहे.

**कामगार चळवळीवरील परिणाम:**

जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर कामगारांचे कंत्राटीकरण, नोकरीची असुरक्षितता, सामाजिक सुरक्षिततेचा अभाव, कामगार कायद्यांची अत्यल्प होणारी अंमलबजावणी यामुळे कायमस्वरुपी कामगार वर्ग सातत्याने घटत असल्याचे स्पष्ट होते. अत्याधुनिकीकरणाने संपूर्ण उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणात रचनात्मक बदल होत आहेत. त्याचा परिणाम म्हणून संघटित कामगार संख्येमध्ये घट होत आहे आणि कामगार संघटना कमकुवत बनत आहेत, तसेच विघटन देखील होत असल्याचे चित्र दिसत आहे. तेव्हा आज कामगारांचे हित जपण्यासाठी, कामगारांना संघटित करण्याची मोठी भूमिका सर्व कामगार संघटनांना पार पाडावी लागणार आहे. कामगार वर्गाला सुदृढ करुन त्यांचा राहणीमानाचा दर्जा वाढविण्यासाठी सशक्त, लोकशाहीवादी कृतीनिश्चयी कामगार संघटनांची गरज आहे. अलिकडे कामगार चळवळीचे विघटीकरण ही देशातील कामगार चळवळीसमोरील मोठी समस्या असून कामगार संघटनांच्या संयुक्त कृतीला तो मोठा अडसर आहे. त्यामुळे कामगारांच्या हितसंबंधाकडे दुर्लक्ष करण्यास व्यवस्थेला मोठी मदत होते. देशातील

कामगार वर्गाचे हितसंबंध जपण्यासाठी हिंद मजदूर सभा आणि हिंद मजदूर किसान पंचायत यांचे अलिकडेच विलिनीकरण झाले आहे. हे देशातील कामगार चळवळीच्या सशक्तीकरण व एकत्रीकरणाच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल आहे. या पद्धतीने सर्व कामगार संघटना एकाच छत्राखाली आल्यास संपूर्ण कामगार विश्वात नवचैतन्य निर्माण होऊन कामगार हित साध्य होण्यास मदतच होईल.

चालू दशकातल्या आर्थिक नियोजनामध्ये मनुष्यबळ विकास हा सर्वात महत्त्वाचा अजेंडा असला पाहिजे. भारताला मोठ्या प्रमाणात तरुणाईचे वरदान लाभले आहे. देशातील सध्याचे सरासरी वय २४ वर्षे आहे आणि २०२० मध्ये सरासरी वय असेल २९ वर्षे! जर इतर राष्ट्रांच्या सरासरी वयाचा विचार केला तर त्या राष्ट्रांचे सरासरी वय ४० वर्षापेक्षा अधिक असणार आहे. काही देशांच्या सरासरी वयाचा विचार केला तर आपणास असे दिसून येते की, पश्चिम युरोपीय देशांचे सरासरी वय असेल ४३ वर्षे, जपानचे वय असेल ४८ वर्षे, अमेरिका व चीन यांचे वय असेल ३७ वर्षे. याचा अर्थ भविष्यकाळात जगातील अनेक देशांमध्ये मनुष्यबळाची कमतरता असेल तेव्हा आपले मनुष्यबळ जर कुशल आणि ज्ञानाधिष्ठित असेल तर संपूर्ण जगात आपल्या मनुष्यबळाला मागणी निर्माण होईल. तसे झाल्यास वाढती लोकसंख्या हे एक वरदानच ठरेल.

अकराव्या पंचवार्षिक योजनेचे सर्वसमावेशक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय संघटनेचे योग्य काम (Decent Work) हे उद्दिष्ट सफल होण्यासाठी त्या पद्धतीने व्यूहरचना बांधण्याची आपल्या देशामध्ये गरज आहे. आर्थिक व सामाजिक विकासासाठी कौशल्य आणि ज्ञान हे दोन मूलभूत घटक मानले जातात. कुशल मनुष्यबळासाठी ज्ञानाधिष्ठीत, व्यावहारिक, व्यावसायिक, संकल्पनात्मक, व्यवस्थापकीय, वर्तणुकीय, आंतरव्यक्ती, परस्परसंबंध या सर्व कौशल्यांचा समुच्चय (Skill Set) विकसित होणे आवश्यक आहे. जेणेकरुन श्रमबाजारातील श्रमाची मागणी व श्रमाचा पुरवठा यामध्ये संतुलन साधण्यास मदत होईल.

## नव्या अर्थरचनेमध्ये भारतीय कामगारांसाठी नव्या संधी आणि नवी आव्हाने:

नव्या व्यवस्थेमध्ये रोजगाराचे स्वरुप आणि संधी या जागतिक श्रम बाजारात मोठ्या प्रमाणात बदलत आहेत. उदा. उत्पादन क्षेत्रातून सेवा क्षेत्रामध्ये रोजगाराच्या संधीचे संक्रमण होत आहे. माहितीचे, ज्ञानाचे तसेच कौशल्याचे संदर्भ बदलत आहेत. संपूर्ण जगाची ज्ञानप्रधान अर्थव्यवस्थेकडे (Knowledge Intensive Economy) वाटचाल सुरु आहे. या नव्या व्यवस्थेमध्ये ज्ञान हा उत्पादन प्रक्रियेतील एक निर्णायक घटक बनत आहे. बौद्धिक संपदा अधिकार (Intellectual Property Rights - IPRs) हा त्यातीलच एक भाग होय. एकुणच ज्ञानाधिष्ठीत कामगार (Knowledge Worker) ही काळाची गरज बनली आहे.

## सॉफ्टवेअर आणि आय.टी.संबंधीत क्षेत्र (Software and ITES):

भारताची अर्थव्यवस्था ज्या दराने वाढते त्यापेक्षा तिप्पट दराने देशातील सॉफ्टवेअर उद्योग वाढत आहे. तसेच १९९७-९८ ते २००४-०५ या सात वर्षाच्या कालावधीत या क्षेत्रातून देशाला मिळणारा महसूल हा ४६४ टक्क्यांनी वाढला आहे तर या क्षेत्रातील निर्यात २०००-०१ ते २००४-

०५ या पाच वर्षाच्या कालावधीत ६.२ बिलियन डॉलर्सवरुन १७.९ बिलियन डॉलर्स इतकी वाढली. बहुराष्ट्रीय कंपन्या आऊटसोर्सींग (Outsourcing) च्या माध्यमातून जी कामे करवून घेतात त्यामध्ये भारताचा क्रमांक प्रथम आहे. भारतातून आऊटसोर्सींग करवून घेण्याचे प्रमाण एकूण जगाच्या तुलनेत सध्या ६० टक्क्यांपेक्षा अधिक आहे. त्यामुळे तुलनेने या क्षेत्रात कौशल्यपूर्ण रोजगार संधींना प्रचंड वाव आहे. भविष्यातही हे प्रमाण वाढतच जाणार असे चित्र सध्यातरी पहावयास मिळते.

भारतातील सॉफ्टवेअर व सर्व्हिस कंपनीच्या नॅशनल असोसिएशनमार्फत (NASSCOM - National Association of Software and Service Companies) केलेल्या अंदाजानुसार २००१ ते २००५ या कालावधीत ७ लाख ७० हजार रोजगार निर्मिती झाली. शिवाय तुलनात्मकदृष्ट्या या क्षेत्रातील वेतन ही अधिक आहे.

### ज्ञानप्रधान उद्योगधंदे आणि उद्योजकता (Knowledge- intensive Industries and Entrepreneurship):

ज्ञानप्रधान उद्योगधंदे निर्माण करण्यासाठी भारत हे जगातील एक महत्त्वाचे केंद्र बनत आहे. त्यामुळेच ग्लोबल टेक्नॉलॉजी कंपन्या उदा. आयबीएम (IBM), मोटोरोला, हेल्लेट-पॅकार्ड, सिस्को सिस्टम्स आणि गुगल यासारख्या अनेक कंपन्यांनी देशामध्ये विशेषत: बेंगलोर, गुरगाव, पुणे अशा शहरांमधुन संशोधन व विकास केंद्रे सुरु करुन नवीन रोजगाराचे दालन तयार केले आहे. भविष्यात अशा केंद्रामध्ये रोजगाराचे दालन तयार केले आहे. भविष्यात अशा केंद्रामध्ये रोजगाराच्या संधी वाढतच जाणार आहेत.

### आव्हान कौशल्यनिर्मितीचे:

तरुणाईचे वरदान लाभलेल्या आपल्या देशामध्ये खरे आव्हान हे कौशल्य निर्मितीचे आहे. रोजगारक्षम कौशल्य (Employable Skills) तयार करुन श्रमशक्ती सक्षम होण्यासाठीची (Strategies) व्यूहरचना आखण्याची गरज आहे. त्यासाठी कौशल्य निर्मितीचे कार्यक्रम राबविण्याची मोठी मोहीम हाती घेतली पाहिजे. शासनाने उद्योजकांची तसेच इतर स्वयंसेवी संस्थांची मदत घेऊन भागीदारी स्वरुपात मुलभूत कौशल्ये व प्रशिक्षण विषयक कार्यक्रम मोठ्या प्रमाणात राबविल्यास त्याचा परिणाम अधिक चांगला होऊ शकेल. बाजारधिष्ठीत व्यवस्थेमध्ये असलेली कौशल्यांची मागणी व निर्माण होत असलेली कौशल्ये यामधील तफावत कमी करून दोन्हींमध्ये संतुलन साधणे शक्य होईल.

### आव्हान कामगार चळवळीच्या एकत्रीकरणाचे:

कामगार संघटनांचे विघटीकरण कामगार चळवळीच्या सशक्तीकरणातील एक महत्वाचा अडथळा ठरत आहे. आज देशातील जवळ-जवळ ४० दशलक्ष कामगार सभासद एकूण ६६,००० कामगार संघटनांमध्ये विभागली आहे. त्यामुळे कामगार शक्ती विभागली जाऊन कामगार चळवळ कमकुवत बनत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विदेशी कंपन्या मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. त्यामध्ये कामगार संघटना निर्माणच होणार नाहीत. अशा प्रकारचे वातावरण निर्माण केले जात आहे. थोडक्यात कामगार चळवळीचा प्रभाव दिवसेंदिवस कमी होत आहे. तथापि कामगार संघटनांनी एकत्र येऊन चळवळीची ताकद वाढविणे

ही काळाची गरज बनली आहे. कामगारांचे हितसंबंध जपण्यासाठी स्थानिक पातळीपासून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील कामगार संघटनांनी एकत्र यायला हवे. तरच कामगार हक्कांचे व त्यांच्या हितसंबंधांचे संरक्षण करणे शक्य होईल.

**समारोप:**

एकूणच जागतिकीकरणाच्या प्रवाहात कामगार जगतामध्ये अत्यंत वेगाने बदल होत आहेत. श्रमिक वर्ग हा संघटित क्षेत्रातून असंघटित क्षेत्रात वेगाने ओढला जातोय. भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशामध्ये एकीकडे वाढत्या श्रमशक्तीला रोजगारक्षम बनविणे तर दुसरीकडे भूतकाळातील साठत गेलेल्या श्रमशक्तीला रोजगाराच्या संधी निर्माण करुन बेरोजगारीचे प्रमाण कमी करणे हे आपल्यासमोरील एक मोठे आव्हान आहे. याच कालावधीत कुशल व अकुशल कामगारांमधील अंतर मोठ्या प्रमाणात वाढत गेले. तसेच दोन्हींमधील वेतनातही मोठी विषमता निर्माण होत आहे. वाढत्या आधुनिक, तांत्रिक बदलांमुळे कामगारांची मागणी ही कौशल्यावर आधारित उत्पादकता वाढीस मदत होईल, या दृष्टीने वाढत आहे. यामुळे साहजिकच कुशल व अतिकुशल कामगारांची मागणी वाढत आहे. त्यामुळे ज्ञानाधिष्ठीत कुशल मनुष्यबळ निर्माण करणे हे देशासमोरील महत्त्वाचे आव्हान आहे. म्हणूनच चालू दशकातल्या आर्थिक नियोजनामध्ये कुशल मनुष्यबळ विकास हा महत्त्वाचा अजेंडा असला पाहिजे.

अलिकडे कामगार जगतात सर्वत्रच कामगारांचे कंत्राटीकरण, नोकरीची असुरक्षितता पुरेशा सामाजिक सुरक्षिततेचा अभाव, कमी व अपुरे वेतन यासारख्या अनेक समस्या निर्माण होत आहेत. कामगार चळवळ देखील पुरेशी सक्षम नसल्यामुळे या समस्या उग्र रूप धारण करीत आहेत. त्यामुळेच असंघटित कामगार वर्ग मोठ्या प्रमाणात वाढत आहे. परंतु आता खरी गरज आहे ती कामगार चळवळीच्या सशक्तीकरण व एकत्रीकरणाची. केंद्रीय पातळीवर काम करणाऱ्या तसेच इतर सर्व छोट्या-मोठ्या कामगार संघटनांनी एक वर्ग म्हणून कामगार वर्गाचे हितसंबंध जपण्यासाठी त्यांच्या संरक्षणासाठी एकाच छत्राखाली येण्याची नितांत गरज आहे. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीबरोबरच कामगार जगताच्या राहणीमानात व त्यांच्या कल्याणात वाढ होणे आवश्यक आहे. सर्वसमावेशक विकासाच्या (Inclusive Growth) संकल्पनेत ते अपेक्षित असुन, भारतासारख्या कल्याणकारी प्रारुप स्विकारलेल्या देशात कामगार कल्याण केंद्रीत (Labour Welfare Centric) विकास झाला पाहिजे हे लक्षात घेणे गरजेचे आहे. महात्मा गांधीजींच्या शब्दात सांगायचे तर कामगारांच्या घामाचा सन्मान आणि प्रतिष्ठा राखली गेली पाहिजे. जागतिक महासत्ता होऊ पाहणाऱ्या भारताच्या अस्तित्वासाठी आणि विकासासाठी हे आवश्यकच आहे.

**संदर्भ सूची:**

1. *Reports of the Employment and Unemployment Survey*, GOI, Ministry of Labour & Employment.

2. *Report of the National Sample Survey Organisation* (NSSO)

3. *Report of the National Commission for Enterprises in the Unorganised Sector* (NCEUS) 2007.

4. *Report of the Second National Commission on Labour* - 2002 pp 152-290.

5. Kalyan Sanyal, Rajesh Bhattacharyya (2009) *"Beyond the Factory: Globalisation, Informalisation of production and the New locations of labour"*, Economic & Political Weekly, Vol.XLIV No.22, May 30-June 5, 2009 pp 35-44.

6. Ritu Dewan (2009) *"Manufacturing Fragmentation and Flexibility"*, Economic and Political Weekly, Vol.XLIV No.7, Feb.14-20, 2009, pp 31-33.

7. Thoms Jayan Jose (2005) *"Labour in the New Economy : An Indian Perspective"*, The Indian Journal of Labour Economics, Volume 48, No.4, Oct.-Dec.2005, pp 821-835.

8. Vinoj Abraham (2009) *Employment Growth in Rural India : Distress Driven?* Economic and Political Weekly. Vol.XLIV No.16, April 18-24, 2009. pp 97-104.

९. डॉ.राजन तुंगारे, डॉ.पी.एम.कडुकर, *'भारतातील असंघटित क्षेत्र आणि सामाजिक सुरक्षितता-एक व्यष्टी अध्ययन'* अर्थमंथन, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३४ वे राष्ट्रीय अधिवेशन पृ. ४५-५४.

१०. डॉ.नरेंद्र जाधव, *'महासत्ता होण्याच्या मार्गावर'* दैनिक महाराष्ट्र टाईम्स, मुंबई २४ जुलै, २०११ पृ. १५.

११. सुहास बोरकर, *'कामगार आहे मी...!'* दैनिक सकाळ सप्तरंग, रविवार दि.१ मे, २०११, पृ. २.

१२. डॉ.विनायक गोविलकर *'जागतिकीकरणाची २० वर्षे'*, मंथन दैनिक लोकमत, मुंबई दि.२४ जुलै, २०११ पृ.१.

१३. शरद राव, 'कामगार चळवळीचे एकत्रीकरण व सशक्तीकरण काळाची गरज', शिवनेर विशेषांक ९ फेब्रुवारी, २०११ पृ. ४-७.

## 'अर्थसंवाद' : आधुनिक शेती विशेषांक

***अर्थसंवाद: जानेवारी-मार्च २०१३*** हा ***आधुनिक शेती विशेषांक*** प्रकाशित करावयाचा आहे. या विशेषांकासाठी आजीव सदस्यांनी सामान्यपणे ४/५ पृष्ठांचा लेख प्रमुख संपादकाकडे त्वरित पाठवावा. लेख स्वीकारण्याची अंतिम मुदत १५ फेब्रुवारी २०१३ पर्यंत आहे. या विश्लेषणात्मक लेखांमध्ये शक्यतो तक्ता घेऊ नये. अगदीच आवश्यक असेल तर लहान आकाराचा तक्ता घ्यावा. या विशेषांकात जास्तीत जास्त संशोधनपर लेख प्रकाशित करता यावेत यासाठीच हे सूचित करण्यात आले आहे.

विशेषांकासाठी लेखांचे विषय याप्रमाणे आहेत-

१) शेतमाल बाजाराचे जागतिकीकरण, २) शेतीआधारित उद्योगांपुढील बदलती आव्हाने, ३) जगातील साखर/कापड उद्योगाची सद्यस्थिती, ४) करार शेती, ५) शेतमालाची आधुनिक बाजारपेठ, ६) विकसित देशातील शेती, ७) इस्त्राईलची शेती क्रांती, ८) भारताचे जलधोरण, ९) आशिया खंडातील शेती, १०) शेती आधारित उद्योगाचा अभ्यास, ११) आधुनिक तंत्रज्ञान शेतीला वरदान, १२) आधुनिक कीटकनाशकांचा आर्थिक-सामाजिक व आरोग्यावरील परिणाम १३) भारताचा शेती-निर्यात व्यापार १४) प्रादेशिक शेती

**विशेषांकासाठी शोधनिबंध पाठविताना लेखकांनी घ्यावयाची काळजी:**

- लेखकांनी आपला शोधनिबंध Shree-Dev7-2336 या फॉन्टमध्ये PageMaker 6.5 या सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ 14 असावी. गरज असल्यास एखादा लहान आकाराचा टेबल घ्यावा. एकापेक्षा अधिक टेबल असू नयेत.
- PageMaker 6.5 या सॉफ्टवेअरमध्येच टाईप करावा. MS-Word **मध्ये टाईप करून लेख पाठवू नयेत.**
- दोन हार्ड कॉपीज् व एक सॉफ्ट कॉपी (सीडी) प्रमुख संपादकाकडे त्वरित पाठवावी.
- शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सदस्य क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक लिहिणे आवश्यक आहे.
- शोध निबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिध्दीसाठी निवड केली जाईल.
- भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा शक्यतो उपयोग करावा. लेखनाची एक प्रत स्वत:जवळ अवश्य ठेवावी.
- लेखकांनी कृपया शोधनिबंध टाईप केल्यानंतर प्रूफ शुध्दलेखन आणि व्याकरण अचुक तपासून नंतरच अंतिम प्रिन्ट काढून पाठवावी.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# रूपयाच्या विदेशी विनिमय दरातील घट: अनिश्चितता आणि आव्हाने

**प्रशांत हरमकर**, अमरावती,
सहाय्यक प्राध्यापक, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय.
भ्रमणध्वनी : ९४२०६३३१२८

---

प्रस्तावना :

रूपयाचा विदेशी विनिमय दर जून ते जुलै २०१२ च्या दरम्यान ५६ ते ५७ रू. प्रति डॉलर झालेला होता. आतापर्यंतच्या अनुभवानुसार रूपयाच्या विदेशी विनिमय दराने अत्यंत खालची पातळी गाठलेली होती. रूपयाची सातत्याने होणारी विदेशी मूल्य घट यावर राज्यसभेमध्ये चर्चा झाली. यावेळी तत्कालीन वित्तमंत्री म्हणाले की, *रूपयाचे विदेशी मूल्य घसरणे ही भारतीय अर्थव्यवस्थेची दुर्बलता नाही. जागतिक पातळीवर अनिश्चितता आणि जोखमी वाढलेल्या आहे. युरोपातील अरिष्टामुळे ही अडचणीची स्थिती निर्माण झालेली आहे. ग्रीस अरिष्टाचा हा परिणाम आहे.* ग्रीस अरिष्टाची समस्या तेथील सत्ताधारी पक्ष सोडवू शकला नाही. त्यामुळे सत्ताधारी पक्षाला सार्वजनिक निवडणुकामध्ये पराभूत व्हावे लागले. सत्ताधारी पक्षाने अरिष्ट सोडवणुकीकरिता आर्थिक पॅकेज देऊन सुद्धा अरिष्टाबाबतची अनिश्चितता कमी करू शकला नाही. याचा प्रभाव जागतिक अर्थव्यवस्थेवर दिसत होता. पर्यायानेच अरिष्टाचा ठोसा भारताला बसत होता. यातूनच रूपयाचा विदेशी विनिमय दर अस्थिर झालेला होता.

## युरोझोन अरिष्टाचा प्रभाव:

युरोझोन अरिष्टाच्या प्रभावाचे भारताच्या संदर्भात विवेचन करीत असताना अधिकोषण क्षेत्र युरोझोनशी लढा देण्यास असमर्थ ठरत आहे. बँकांवर निधीचा दबाव निर्माण होऊन बँका प्रभावित झालेल्या आहेत. भारतीय बँकांना अपेक्षा नव्हती की, त्यांचे खाते प्रत्यक्ष प्रभावित होईल. युरोपात अरिष्टाकडे फारसे लक्ष न दिल्यामुळे हे घडून आल्याचे दिसून येते. २००४ च्या अमेरिकन

वित्तीय अरिष्टामध्ये लेहमन ब्रदर्स वित्त संस्था दिवाळखोर झाली. अरिष्टामुळेच तिची ही अवस्था घडून आली. ह्यावेळी भारत हा अरिष्टापासून सुरक्षित आहे असे म्हटले जाऊ लागले. कारण भारताच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने दूरदर्शीपणे वागून नियंत्रित धोरणाचा स्वीकार केला होता. मात्र युरोझोन अरिष्टामुळे रूपया प्रभावित झाला. रूपयाचे विदेशी विनिमय मूल्य कोसळले. अर्थव्यवस्थेच्या मुलभूत बाजूलाच धक्का बसला.

अरिष्टाचा प्रसार होऊन बाह्य धक्के अर्थव्यवस्थेच्या मूलभूत बाबींना बसत आहे. जागतिकीकरणामध्ये परस्पर देशामध्ये आंतरअवलंबित्व वाढलेले आहे. त्यामुळे एखाद्या देशात काही घडले की त्याचा परिणाम लगेच इतर देशांवर जाणवतो. विशेषत: ग्रीसने जी धोरणे राबवली यामधूनच युरोझोन अरिष्ट निर्माण झाले व त्याचे धक्के भारताला बसत आहेत. सध्या ग्रीस, स्पेन आणि इटाली इत्यादी देश उग्र अशा राजकोषीय आणि वित्तीय स्थितीचा सामना करीत आहेत. पश्चिमी वर्तमानपत्रांमध्ये तज्ज्ञ आणि विश्लेषक आर्थिक धोरणबाबत प्रचंड विरोध करीत आहेत. वित्तीय अरिष्टाचा सामना युरोपियन युनियनला अतिशय चिवटपणे करावा लागत आहे. भारतावर युरोझोन अरिष्टाचा परिणाम झाल्यामुळे भारतालाही या परिस्थितीवर मात करायची आहे.

भारत आणि चीनला नव्वदच्या दशकातील एशियन वित्तीय अरिष्टाचा अनुभव मुळीच नव्हता. २००८ मधील अमेरिकन वित्तीय अरिष्टापासून या दोन्ही अर्थव्यवस्था दूर होत्या. अमेरिकन वित्तीय अरिष्टामध्ये समृद्ध अशा विकसित देशाचे वृद्धिदर शून्यावर जाऊन पोहोचले होते. ज्या देशाचा वृद्धिदर ६ प्रतिशत होता त्याचा वृद्धिदर ३ प्रतिशतवर येऊन पोहोचला. युरोझोन अरिष्टानंतर भारताने दुसऱ्या किंवा तिसऱ्या क्रमांकाचा जलद गतीने विकास करणारा देश ही ओळख गमावलेली आहे. याच काळात सरासरी वृद्धी दराचे वितरण वेगवेगळ्या उत्पन्न गटामध्ये कशा प्रकारे झाले आहे याकडे पाहिले तर उत्पन्नाचे विषम वितरण झालेले आहे.

### वित्तीय वर्ष २०११-१२:

अनेक बाबतीत निरूत्साहजनक असे २०११-१२ हे वित्तीय वर्ष मानले जाते या वर्षामध्येच चिवट स्फिती निर्माण झाली. चलनामध्ये दुर्बलता निर्माण झाली आणि वृद्धी दर घटलेला पहायला मिळाला. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मौद्रिक धोरणाचा आढावा घेतला तर भारतामध्ये ३६ प्रतिशतपर्यंत विदेशी गुंतवणूक होणार होती. विदेशी गुंतवणूकदार संस्थांनी ९ अब्ज अमेरिकन डॉलरपर्यंत गुंतवणूक २०११ मध्ये केली. येणाऱ्या पुढील दोन वर्षात गुंतवणूक क्रमशः २४.३ अब्ज डॉलर आणि २३.२ अब्ज डॉलर होणार आहे. विदेशी संस्थांच्या गुंतवणुकीमध्ये अनियमितता आणि अनिश्चितता असल्यामुळे गुंतवणुकीमध्ये दुर्बलता निर्माण झालेली आहे. कराची अंमलबजावणी करताना रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या भांडवली प्रवाहामध्ये तफावत निर्माण झालेली आहे. हा परिणाम गुंतवणूकदारांना नाउमेद करणारा आहे. याचाच प्रभाव भारतीय बँकांच्या रोख्यांवर होऊन ऋण आणि स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचा (जी.डी.पी) अनुपात प्रतिकूल झालेला आहे. याचाच आधार घेऊन स्टॅन्डर्ड ॲन्ड पुअर्स या संस्थेने भारताची पत घसरल्याचे दर्शविले होते. विशेषत: सार्वजनिक क्षेत्रातील बँकांवर शासकीय रोख्यांचे ओझे वाढलेले होते.

अधिकोषण व्यवस्थेच्या संदर्भात काळजी घेण्याची आवश्यकता आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने वित्तीय स्थिरतेबद्दल अहवाल सादर केलेला आहे. या अहवालामध्ये वित्तीय व्यवस्थेचे मूल्यांकन केलेले आहे. दीर्घकालीन स्थैर्याबाबत चिंता व्यक्त केलेली आहे. याचा संबंध ऋण स्रोताशी असून किरकोळ आणि गृह कर्जाशी आहे. परत न मिळणाऱ्या कर्जाचे प्रमाण वाढलेले आहे. जर अतिशय कडकपणा, तरलता ही चलन दर, बँक दर याबाबत केल्या गेली नाही तर कर्ज बुडविण्याचे प्रमाण वाढू शकते. त्यामुळे अधिकोषण क्षेत्रातील जोखमी वाढल्या असून त्याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

सध्या उच्च स्फितीचा अनुभव आपण घेत आहोत. वृद्धी दरामध्ये घसरण व रुपयाचे विदेशी मूल्य मोठ्या प्रमाणावर घटलेले आहे. त्याला समजावून घेणे फार कठीण नाही. मात्र बुद्धिमान धोरणकर्ते राजकारणाला सहजपणे चिकटून असतात. त्यामुळे धोरण तयार करताना केवळ अर्थशास्त्र वापरले न जाता अर्थशास्त्राच्या तत्त्वांपासून जवळ जाणारे धोरण तयार केले जाते. मात्र प्रत्यक्षात या प्रकारच्या धोरण अंमलबजावणीमधून आपण यश संपादन करू शकलो नाही. ग्रीस, स्पेन, इटली संकेत देत आहे की, दुर्लक्ष आणि टाळणे याचा परिणाम म्हणजे धोरणाचे अपयश आहे. त्याचाच परिणाम म्हणून चलनाचा विदेशी विनिमय दर घटण्याची आपत्ती निर्माण झाली. याप्रकारचे धक्के अर्थव्यवस्थेला दुर्बल करण्यास अनुकूल असतात. यामधूनच वित्तीय नितीभ्रष्टतेच्या (Fiscal profilgacy) आजाराची लागण होऊ शकते.

ब्रीक्स (BRICS) गटाचा अहवाल २०१२ मध्ये प्रसिद्ध झाला. या गटामध्ये ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका हे देश आहेत. ब्रीक्स अहवालामध्ये भारताबाबत विवेचन करीत असताना म्हटले आहे की, भारताची स्थिती फारच निराशाजनक आहे. भारताचे सार्वजनिक ऋण जीडीपीच्या ६६ प्रतिशत आहे. भारत हा दुसऱ्या क्रमांकाची उदयोन्मुख होणारी अर्थव्यवस्था ही ओळख गमावणार आहे. भारताच्या तुलनेत चीन, ब्राझील आणि रशिया यांच्या अर्थव्यवस्थाची बांधणी अधिक चांगल्या प्रकारे केलेली आहे. भारत ब्रीक्स गटाच्या सभासदांमध्ये मागे पडत आहे. विविध दृष्टिकोनातून २०११-२०१२ या वित्तीय वर्षाचा विचार केला तर या वर्षात अनेक प्रकारच्या अनिश्चितता व असंतुलन असल्याचे दिसून येते. या असंतुलनाचा परिणाम रुपयाच्या विदेशी विनिमय मूल्याच्या घसरणीवर झालेला आहे.

**रोख्यांवरील दबाव :**

भारताच्या विदेशी विनिमय रोख्यांमध्ये ऱ्हास घडून येत आहे. रोख्यांचे निरीक्षण केले तर बाह्य ऋणाचे प्रमाण वाढून रोखे आंकुचन पावलेले आहे. रोख्यांचा वापर करून कर्ज प्राप्त करण्यावर बंधने निर्माण झालेली आहे. रोख्यांच्या आधारावर बाह्य ऋण डिसेंबर २०११ मध्ये एकूण कर्जाच्या ८८.५ प्रतिशत होते. यामध्ये रोख्यांचा ऱ्हास होऊन मार्च ते डिसेंबर २०११ पर्यंत रोखे ३ प्रतिशत पर्यंत जाऊन पोहोचले. तर ऋण ९.४ प्रतिशतने वाढले. राखीव ऋण अनुपात २००३ पेक्षा सर्वात कमी होता. मार्च २००८ मध्ये रोखे ऋण अनुपात १३८ प्रतिशत होता. रोख्याच्या संपत्तीमध्ये घट होऊन हा अनुपात डिसेंबर २०११ ते एप्रिल २०१२ च्या दरम्यान १.३ प्रतिशतवर जाऊन पोहोचला.

आंतरराष्ट्रीय बँकांना सांख्यिकीय आकडेवारीवरून भारताला आंतरराष्ट्रीय ऋण पुढील वर्षापर्यंत १३७ अब्ज डॉलर द्यावे लागणार आहेत. त्यामुळे अर्ध्यापेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय रोखे संपण्याची शक्यता आहे. शिवाय भारताच्या तुलनेत एशियाई रोखे बाजार (Asian stock market) स्वस्त आहे. त्यांच्या चलनामध्ये अनिश्चितता फार कमी आहे. त्यामुळे जोखमी कमी करण्यासाठी गुंतवणूकदार एशियाई रोखे बाजारात गुंतवणूक करण्यास पसंती देतात.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या वित्तीय स्थैर्यता अहवाल (Financial Stability Report) २०११ नुसार समग्र देशीय उत्पादनाच्या (जी.डी.पी) ८.६ प्रतिशत ऋणाचे प्रमाण आहे. अधिक काळजी करण्याची गोष्ट म्हणजे ऋणाची वैशिष्टय पाहिली तर एकूण ऋणामध्ये अल्पकालीन ऋणाचा मोठा वाटा आहे. येणाऱ्या काळात अल्पकालीन ऋणामध्ये मोठ्या प्रमाणात घसरण होण्याची शक्यता आहे. यामध्ये रोख्यांचा ऱ्हास होऊ शकतो. अल्पकालीन ऋण देण्याची निर्मिती रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने केलेली होती. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची धोरणे रुपयाच्या विनिमय दराचे व्यवस्थापन करीत होती. या काळात रुपयाचा प्रवाह (inflow) घटला. याकरिता रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने नवीन मार्ग निवडला. निगम क्षेत्रासाठी (Corporate Sector) विदेशी चलनाचे ऋण घेतले. त्यामुळे कर्ज उच्चतम पातळीवर जाऊन पोहोचले. विदेशी संस्था गुंतवणूकदारानी (FII) देशीय रोख्यामध्ये गुंतवणूक केली होती याचा उच्च व्याजदर होता. रिझर्व्ह बँकेला अपेक्षा होती की यामधून आधिक्याने गुंतवणूक निर्माण होईल. रुपयाला जोरदार धक्का बसेल व रुपया मजबूत होईल. रुपयाचा विनिमय दर स्थिरपणे टिकून राहील. मात्र ही अपेक्षा फोल ठरली. त्यामुळे धोरणातच कडकपणा किंवा शिस्त आणावी लागणार आहे. अल्पकालीन ऋणामध्ये घसरण होऊ शकते याचा प्रतिकूल परिणाम रुपयाचे विनिमय मूल्य घसरू शकते. म्हणून रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला विरूद्ध चक्रीय दृष्टिकोनाचा (anti-cyclical approach) स्वीकार करून रुपयाचे व्यवस्थापन भविष्यात करावे लागणार आहे.

**शोधन शेष आणि रुपयाची परिवर्तनीयता :**

रुपयाचा विनिमय दर घटण्याचा मुख्य संबंध शोधन शेषाशी (Balance of payment) आहे. चालू खात्यामध्ये (current account) तूट अनिश्चित आणि मोठ्या प्रमाणावर आहे. २०११-२०१२ या वित्तीय वर्षामध्ये वित्तीय तुटीचे प्रमाण समग्र देशीय उत्पादनाच्या ४३ प्रतिशत आहे. असे असून देखील निर्यातीचे प्रमाण समाधानकारक आहे. काळजी करण्यासाखी बाब म्हणजे कच्च्या तेलाच्या वाढत्या किंमती होय. यामुळे चालू खात्यामधील तूट वाढत आहे. त्याचबरोबर सोन्याची वाढती आयात हा वित्तीय तुटीचा आणखी एक पैलू आहे. भारत हा आधिक्याने युरोपला केल्या जाणाऱ्या निर्यातीवर अवलंबून आहे. युरोझोन अरिष्टामुळे या निर्याती आणखी घटू शकण्याची शक्यता आहे. प्रत्यक्षात भांडवली प्रवाहावरच चालू खात्याची तूट अवलंबून आहे. भांडवली प्रवाह हा खरोखरपणे जुगार असून तो अनिश्चित आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या २०११ च्या अहवालामध्ये भांडवली प्रवाहाबाबत तीव्र भिती व्यक्त केलेली आहे. प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीचा (FDI) प्रवाह

हा अतिशय मंद आहे. याशिवाय चालू खात्यातील तूट निर्माण होण्यास बऱ्याच उणिवा आहेत. त्यामुळे तुटीचे प्रमाण ३ प्रतिशतपर्यंत खाली आणणे फार कठीण असल्याचे अहवालामध्ये म्हटले आहे.

भांडवली प्रवाहामध्ये लहरी प्रवृत्ती आणि जोखमी असल्यामुळे भांडवली प्रवाह अचानकपणे थांबूही शकतो या संदर्भात सैद्धान्तिक विवेचन केनेथ रोगोफ, कारमेन, रिनहार्ट, ईश्वर प्रसाद या अर्थशास्त्रज्ञानी केलेले आहे. आंतरराष्ट्रीय मुद्रानिधीचे अर्थशास्त्रज्ञ संपूर्ण भांडवलाचे प्रत्यार्पण (convertibility) होण्यावर भर देत आहे. आपण भांडवली प्रवाहाच्या आधीन होत आहोत. अनेक एशियाई आणि लॅटिन अमेरिकन देश करावर भर देऊन भांडवली प्रवाहाला नियंत्रित करण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र आपण भांडवली प्रवाहाबाबत अनिश्चित मापके स्वीकारलेली आहेत.

चालू खात्यामधील तूट ही मुख्य समस्या असून व्यापार तूट हा त्यामधील एक भाग आहे. शोधन शेषातील तुटीमुळे आधिक्याने २०११-१२ या वित्तीय वर्षात समस्या निर्माण झालेल्या आहे. वित्तीय तूट भरून काढण्याकरिता काही येणाऱ्या रकमांचा विस्तार केला जातो. मात्र प्रत्यक्षात रोखतेचा प्रवाह स्थिर आहे. विदेश भांडवल अनिश्चित आहे म्हणून विदेशी भांडवल प्रवाहाची काळजी घेणे आवश्यक आहे. डॉलरसाठी असणारी मागणी लक्षात घेता रुपयाचे विदेशी विनिमय मूल्य स्थिर ठेवणे आवश्यक आहे. व्यापारी तूट अतिशय तीव्रतेने वाढत आहे. भांडवली प्रवाह आंकुचित पावला आहे. यामुळे रुपयाचे मूल्य आणखी घसरू शकते. रुपयाचे मूल्य घसरण्याचा लढा युरोझोन अरिष्टामुळे आणखी तीव्र झालेला आहे. रुपयाचे विदेशी विनिमय मुल्य घसरणे ही गंभीर आणि मूलभूत स्वरूपाची समस्या आहे.

चालू खात्याच्या संतुलनासंदर्भात भिन्न दृष्टिकोन वापरले जातात. देशीय उत्पादन आणि व्यय (Domestic Production and Cost) याच्या मुल्यामध्ये भिन्नता आहे. एकूण व्ययाचा (Total cost) संबंध उत्पादनाच्या आधिक्याशी आहे. याकडूनच एकूण मागणी होऊन चालू खात्यामध्ये आधिक्य निर्माण होते. जर आपणास प्रत्येक वस्तू आणि सेवाचा उपभोग घ्यायचा असेल तर मागणीमध्ये आधिक्य निर्माण होऊन चालू खात्यामध्ये तूट निर्माण होईल. त्यामुळे देशी व्यय (Domestic Cost) हा घटक अत्यंत चिंताजनक स्थितीत असतो. गुंतवणूक खर्च वाढविला तर समग्र देशीय उत्पादनामध्ये (जी.डी.पी) भविष्यात वृद्धी घडून येते. ज्याचा सकारात्मक परिणाम चालू खात्यावर घडून येतो. रोखतेच्या प्रवाहाची समस्या सध्याच्या कालावधीत आहे. याकरिता पुरेसा डॉलरचा पुरवठा होणे आवश्यक आहे. मात्र आधिक्याने खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रामध्ये उपभोग खर्च वाढत आहे. यामध्ये विदेशी दौरे, मताचा गठ्ठा लक्षात घेऊन देण्यात येणारी अनुदाने यांचाही समावेश आहे. यासारख्या अनुत्पादकीय खर्चाचा विचार होणे आवश्यक आहे. चालू खात्याचे सामर्थ्य वाढवायचे असेल तर खर्चाचा प्रभाव आर्थिक वृद्धीवर दिसून आला का याचे अध्ययन होणे आवश्यक आहे. केवळ आर्थिक वृद्धी दर्शविली जाते मात्र आर्थिक वृद्धीमधील गळत्या, उणिवा दर्शविल्या जात नाही. शासनाद्वारे समग्र देशीय

उत्पादनाचा (जी.डी.पी) मोठा भाग अनुदानावर खर्च होतो. हा खर्च केवळ खते आणि कच्च्या तेलावर होत नाही तर अन्न सुरक्षिततेच्या व्यवस्थापनावर मोठा खर्च करावा लागतो. सामाजिक उत्पादकता वाढविणाऱ्या योजनाची सखोलता फार कमी आहे. या योजनामधून निश्चित केलेली उद्दिष्टे साध्य केले जातात का याचीही तपासणी होणे आवश्यक आहे. अन्यथा शासनाची राजकीय दुर्बलता अशा प्रकारचा खर्च करण्यास भाग पाडते असेच म्हणावे लागेल.

शासनाला आयातीवर प्रत्यक्ष खर्च करण्याची आवश्यकता नाही. समग्र देशीय उत्पादनाच्या (जी.डी.पी.) प्रमाणात आयातीवरील खर्च हा फार जास्त आहे. मात्र असे असून सुद्धा भारतामध्ये भुकेले, उपाशी राहणाऱ्यांचे प्रमाण फार जास्त आहे. आयातीची वाढती मागणी आणि स्फिती या दोन्ही बाबी अर्थव्यवस्थेत एकाच वेळी दिसून येतात. आयातीची मागणी घटवायची असेल तर निर्यातीचा पुरवठा वाढविणे आवश्यक आहे. रुपयाचा विदेशी विनिमय दर घटणे यापेक्षाही स्फितीचा वादप्रश्न गंभीर झालेला आहे. रुपयाचा विदेशी विनिमय दर घटत असताना व्याजाचे दर शासन स्थिर ठेवू शकले नाही. स्फिती निर्माण होण्याचे स्रोत मागणीचे आधिक्य आहे.धान्य उत्पादनाची अनियमितता आणि उत्पादनामधील अपयशामुळे स्फितीमध्ये भर पडली. विदेशी वस्तू आणि सेवावरील वाढत्या खर्चामध्ये कपात होण्याची आवश्यकता आहे. मात्र सध्या तरी कपात होण्याची शक्यता दिसत नाही. भांडवली प्रवाह आकुंचित झाल्यामुळे असंतुलन घडून आले परिणामत: रुपयाचे विदेशी विनिमय मूल्य आधिक्याने घसरले आहे.

## आर्थिक धोरणे आणि समस्या:

गेल्या वित्तीय वर्षामध्ये भारतीय रुपयाचा प्रतिसाद एशियाई चलनामध्ये अतिशय वाईट दिसून आला. जपान वगळला तर सर्व एशियाई चलनावर ताण निर्माण झालेला आहे. यामध्ये भारतीय रुपयाला जोरदार धक्का बसलेला आहे. ऑगस्ट ते डिसेंबर २०११ च्या दरम्यान रुपयाचा विदेशी विनिमय दर डॉलरच्या तुलनेत २२ प्रतिशतने घटलेला आहे. याला फेब्रुवारी २०१२ मध्ये स्थिर ठेवण्याचा प्रयत्न केला मात्र रुपयाचा विदेशी विनिमय दर स्थिर राहू शकला नाही. रुपयाचा विदेशी विनिमय दर स्थिर ठेवण्याचे प्रयत्न अपयशी ठरले. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया रुपयाचे मूल्य स्थिर ठेवण्यात सक्षम ठरू शकली नाही. फायनान्शियल टाइम्सच्या अहवालामध्ये ईश्वर प्रसाद यांनी याबद्दल मत स्पष्ट केले की, भारतीय रुपयाचे विदेशी विनिमय दर घटत असताना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होत आहे. रुपयाच्या बाबत अतिशय कडक भूमिका (aggressive) धोरणामार्फत घेण्याची शिफारस अनेक विश्लेषणामध्ये केलेली आहे. मात्र धोरणाकरिता सुचविल्या गेलेल्या शिफारशीमध्ये अनिश्चितता मोठ्या प्रमाणावर होत्या. रिझर्व्ह बँकेचे उपाय पुरेसे मानले गेले नाही तर विदेशी रोखे अनुकूल पातळीपेक्षा कमी झालेले होते.

उदय पावणाऱ्या अर्थव्यवस्थांच्या वित्तीय कार्यक्षमतेचा आलेख दि इकॉनोमिस्टच्या जानेवारी २०१२ च्या अंकामध्ये प्रसिद्ध झाला. या अंकामध्ये म्हटल्या गेलेले आहे की, उदय पावणाऱ्या अर्थव्यवस्थांचे मौद्रिक आणि राजकोषीय धोरण प्रभावी शस्त्र (Fire power)

म्हणून उपयोग करीत आहे. या संदर्भात २७ देशांचे अध्ययन झाले. याकरिता पाच निर्देशांक वापरण्यात आले. स्फिती, ऋण आधिक्य, वास्तविक व्याजदर, चलनाचे चलनवलन (Currency Movement) आणि चालू खात्याचे संतुलन या निर्देशांकावरून चीन, इंडोनेशिया आणि दक्षिण अरेबिया यांना फार मोठी कार्यक्षमता असणाऱ्या अर्थव्यवस्था म्हटले आहे. या निर्देशांकांनुसार भारत हा इजिप्त नंतर २७ व्या क्रमांकावर आहे. यावरून स्पष्ट होते की, भारताचे मौद्रिक आणि राजकोषीय धोरण शक्तीहीन आहे. याकरिता भारताला मजबूत मौद्रिक आणि राजकोषीय धोरणाचा कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता आहे. वाढता उपभोग खर्च आणि राजकोषीय तूट यांच्या एकत्रितपणामुळे राजकोषीय नीतिभ्रष्टता (Fiscal profilgacy) निर्माण होऊ लागते. रुपयाच्या मूल्यामधील परिवर्तनाचे बाह्य धक्के बसून असंतुलन निर्माण होते म्हणून रुपयाचे विदेशी विनिमय मूल्य स्थिर ठेवणे आवश्यक ठरते.

### विदेशी विनिमय दर :

देशातील मुद्रेला दोन दर असतात. एक अंतर्गत मूल्य (Intrinsic) आणि दुसरे विदेशी मूल्य (Foreign Exchange Value) अंतर्गत मूल्य म्हणजे रुपयाची क्रयशक्ती होय. देशामध्ये किंमती वाढत असतील तर रूपयाची क्रयशक्ती किंवा अंतर्गत मूल्य घटले असा त्याचा अर्थ होतो. समजा क्ष वस्तूची किंमत प्रति नग १० रु. आहे. म्हणून १ रु. चे अंतर्गत मूल्य १ रुपया = १/१० क्ष वस्तू होईल जर क्ष वस्तूची किंमत वाढून प्रति नग १५ रु. झाली तर १ रु.चे अंतर्गत मूल्य १ रुपया = १/१५ क्ष वस्तू होईल. चलनाचे बाह्य मूल्य किंवा विदेशी विनिमय मूल्य म्हणजे १ रुपयाद्वारे प्राप्त होणारे विविध देशाचे चलन किंवा विदेशातील चलनाच्या एका मात्रेसाठी द्यावे लागणारे रूपये होय. समजा १ डॉलर = ४५ रुपये. हा विनिमय दर आहे. म्हणजेच १ डॉलर प्राप्त करण्याकरिता ४५ रुपये द्यावे लागतात. जर हा दर १ डॉलर =५२ रुपये झाला तर त्याचा अर्थ असा होतो की तोच डॉलर प्राप्त करण्याकरिता ४५ रुपयाऐवजी ५२ रु. द्यावे लागतात. म्हणजेच ७ रु. जास्तीचे द्यावे लागतात. यालाच रुपयाची डॉलर मधील घसरण असे म्हणतात. रुपयाची विदेशी विनिमयाच्या संदर्भात विविध देशाच्या चलनात घसरण होते मात्र आपण प्रामुख्याने अमेरिकेत डॉलरच्या संदर्भात विवेचन करणार आहोत.

भारताने नविन आर्थिक धोरणाचा स्वीकार केल्यानंतर स्थिर विदेशी विनिमय दराऐवजी तरंगता विनिमय दराचा (Floating exchange rate) स्विकार केला. त्यामुळे विदेशी चलनाची मागणी आणि पुरवठ्याच्या साह्याने विदेशी विनिमय दर ठरतो. विदेशी विनिमय चलनातील सतत बदलत जाणाऱ्या मागणी आणि पुरवठ्यामुळे विनिमय दरही बदलत जातो म्हणजेच सध्याचे विदेशी विनिमय दर बाजाराशी जोडलेले आहे. म्हणून त्यास बदलते किंवा तरंगते विनिमय दर असे म्हटले जाते.

### डॉलरबरोबर रुपयाचे विदेशी विनिमय मूल्य:

विदेशी विनिमय रोखे सुरुवातीला वाढणे व नंतर घटणे या प्रकारची स्थिती २०११-२०१२ या वित्तीय वर्षात दिसून आली. ऑगस्ट २०११ मध्ये विदेशी विनिमय रोखे ३२२ अब्ज डॉलर होते. यामध्ये घट होऊन सप्टेंबर २०११ मध्ये ३११.५ अब्ज डॉलर झाले यामध्ये क्रमशः घट

होऊन डिसेंबर २०११ मध्ये २९६.८ अब्ज डॉलर तर जानेवारी २०१२ मध्ये २९२.८ अब्ज डॉलर एवढ्या खालच्या पातळीवर येऊन पोहोचले. विदेशी विनिमय रोख्याचा ऱ्हास झाल्यामुळे डॉलरच्या तुलनेत रुपयाचा विदेशी विनिमय दर घटत गेलेला दिसून येतो.

वित्तीय वर्ष २०११-१२ मध्ये रुपयाचे मूल्य घटायला सुरुवात झाले. या वर्षात प्रत्येक महिन्याला रुपयाच्या विदेशी विनिमय मूल्यामध्ये घट होत असल्याचे दिसून येते. मार्च २०११ मध्ये १ डॉलरला रुपयाचे मूल्य ४४.९७ रु. होते हे मूल्य घटून जानेवारी २०१२ मध्ये १ डॉलरला रुपयाचे मूल्य ५१.३४ रुपये झाले होते. साधारणपणे १५ डिसेंबर २०११ मध्ये रुपयाचे मूल्य ५४.२३ रु. होते. २०११ या वर्षामध्ये रुपयाचे सर्वात कमी मूल्य नोंदविल्या गेले होते. मार्च ते डिसेंबर २०११ पर्यंत रुपयाच्या विदेशी विनिमय मूल्यामध्ये १९ प्रतिशत घट झालेली होती तर सरासरीने प्रतिमाह रुपयाचा घसरणीचा दर ११.५ प्रतिशत होता.

विनिमय दर धोरणाचे मार्गदर्शन आणि व्यवस्थापन काळजीपूर्वक नियंत्रणाच्या विस्तृत तत्त्वानुसार केल्या जाते. विनिमय दर लवचीक आहे. चलनाच्या मागणी आणि पुरवठ्याच्या अटीनुसार विनिमय दर ठरतो. उद्दिष्टाचा प्रभाव विनिमय दरावर असतो. उद्दिष्टांच्या अनुषंगाने रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया विदेशी विनिमय बाजाराला मार्गदर्शन करीत असते. रुपयाच्या विदेशी विनिमय मूल्यवृद्धी किंवा ऱ्हासामध्ये अनिश्चितता आहे. विदेशी विनिमय दरातील सट्टेबाजीच्या अस्थिर प्रवृत्तीमुळे विदेशी विनिमय दरामध्ये अडथळे निर्माण होतात. रुपयाचे विदेशी विनिमय मूल्य स्थिर ठेवण्याकरिता रोख्याच्या पुरेशा पातळीचे समायोजन करावे लागेल तसेच विदेशी विनिमय बाजार विकसित करावा लागेल.

वित्तीय वर्ष २०१०-२०११ याचा विचार केला तर या वर्षामध्ये रुपयाचा सरासरीने मासिक विदेशी विनिमय दर १.२ प्रतिशतने वाढून रुपया ४५.५० रु वरून मार्च २०१० मध्ये ४४.९७ रु पर्यंत वाढलेला होता. रुपयाच्या विदेशी विनिमय मूल्यामध्ये वाढ होण्याचे कारण आंतरराष्ट्रीय बाजारामध्ये डॉलर या चलनामध्ये दुर्बलता निर्माण झालेली होती. वित्तीय वर्ष २०१०-२०११ आणि २०११-२०१२ मध्ये रुपयाच्या विदेशी विनिमय दराबाबत दोन प्रवृत्ती स्पष्टपणे दिसून येतात. मार्च २०१० पर्यंत रुपयाच्या विदेशी विनिमय मूल्यामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. मात्र सप्टेंबर २०११ नंतर रुपयाचे विदेशी विनिमय मूल्य घटत गेल्याचे दिसून येते. रुपयाचे विदेशी विनिमय मूल्य केवळ घटलेले नसून घटण्याची तीव्रता अधिक असल्याचे दिसून येते. रुपयाच्या विदेशी विनिमय मूल्य घटण्याला प्रभावित करणारा मुख्य घटक म्हणजे जागतिक अर्थव्यवस्थेमधील अनिश्चितता होय. रुपयाचा विदेशी विनिमय दर मार्च २०११ मध्ये ४४.९७ प्रति डॉलर होता, यामध्ये १४.६ प्रतिशतने घट होऊन डिसेंबर २०११ मध्ये ५२.६८ रुपये प्रति डॉलर झाला तर मार्च २०११ मध्ये ५३.२६ रु प्रति अमेरिकन डॉलर झाला. मार्च २०११ पर्यंत रुपयाच्या विदेशी विनिमय मूल्यामध्ये १६.२ प्रतिशत घट झाली. सरासरीने रुपयाचे विदेशी विनिमय मूल्य घटण्याचा मासिक दर ११.५ प्रतिशत होता.

रुपयाचा विदेशी विनिमय दर १५ डिसेंबर २०११ ला ५४.२३ रु. होता यामध्ये सुधारणा

करून ३१ जानेवारी २०१२ रोजी रुपयाचा विदेशी विनिमय दर ४९.६७ रु प्रति डॉलर होता. रुपयाचा विदेशी विनिमय दर २४ एप्रिल २०१२ रोजी ५२.५६ रु प्रति डॉलर झाला. रुपयाच्या विदेशी विनिमय मूल्यामध्ये परत घट व्हायला सुरुवात झाली. रुपयाच्या विदेशी विनिमय मूल्यामध्ये २७ प्रतिशतने घट होऊन ३ मे २०१२ रोजी रुपयाचे विदेशी विनिमय मूल्य ५६.३८ रु प्रति डॉलर झाले. रुपयाचा विदेशी विनिमय दर आणखी घटून २७ जून २०१२ ला ५७.२१ रु प्रति डॉलर झाला. आजपर्यंतचा रुपयाच्या विदेशी विनिमय मूल्याचा हा सर्वात कमी दर होता. रुपयाची सातत्याने होणारी घसरण लक्षात घेऊन रुपयाचे विदेशी विनिमय मूल्य आणखी घटू नये म्हणून प्रयत्न करण्यात आले. त्यामुळे रुपयाचा दर २८ जून २०१२ रोजी ५६.३० रू प्रति डॉलर झाला. १३ जुलै रोजी रुपयाचा विदेशी विनिमय दर ५५.६३ रु प्रति डॉलर झाला २६ सप्टेंबर २०१२ रोजी रुपयाचे मूल्य आणखी सुधारून ५३.५७ रु प्रति डॉलर झाले तर २५ ऑक्टोबर २०१२ रोजी रुपयाचे विदेशी विनिमय मूल्य ५३.६३ रुपये प्रति डॉलर होते.

रुपयाचे विदेशी विनिमय मूल्य तीव्र गतीने घटण्याचे कारण म्हणजे रुपयाच्या मागणी पुरवठ्यातील असंतुलन, देशीय विदेशी विनिमय बाजाराच्या (Domestic foreign exchange market) खात्यामध्ये घसरण, विदेशी संस्थांच्या गुंतवणुकीच्या प्रवाहामध्ये झालेली घट होय. आंतरराष्ट्रीय बाजारातील डॉलरचे मूल्य सुरक्षित राहण्यावर अमेरिकन कोषागाराने भर दिलेला आहे. उच्चतम जोखमी आणि युरोझोन अरिष्ट याचा प्रभाव वित्तीय बाजारावर पडून याचा परिणाम जागतिक पटलावर उदय पावणाऱ्या अर्थव्यवस्थावर झालेला आहे. जागतिक घटकापासून देशीय घटकापर्यंत दुर्बलता निर्माण होऊन दुर्बलतेची प्रवृत्ती रुपयामध्ये पसरलेली आहे. चालू खात्यामधील तुटीमध्ये वाढ झाली त्याचबरोबर उच्चतम स्फिती तेवढीच जबाबदार आहे. जुलै २०११ मध्ये रूपयावर चालू खात्यातील तूट आणि उच्चतम स्फिती याचा दबाव निर्माण झाला. यामुळे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने विदेशी विनिमय दर आणि सट्टेबाजीवर नियंत्रणे आणली. परिणामः रुपयाचा विदेशी विनिमय दर सुधारण्याऐवजी तो आणखी घसरायला लागला.

**उदय पावणाऱ्या अर्थव्यवस्थांचा विनिमय दर :**

केवळ भारताच्याच चलनाचे अवमूल्यन झाले नाही तर २०११-१२ या वर्षामध्ये उदय पावणाऱ्या अर्थव्यवस्थेचेही चलन अवमूल्यन घडून आल्याचे दिसून येते. ब्राझीलचा रियल, मेक्सिकोचा पेसो, रशियाचा रूबल, दक्षिण कोरीयाचा वॉन, दक्षिण अफ्रिकेचा रॅन्ड याची सुद्धा अमेरिकन डॉलरच्या तुलनेत विनिमय दरामध्ये घसरण झाली. युरोझोन अरिष्टापासून ऋणाच्या स्वरूपातील संपत्ती सुरक्षित राहण्याकरिता डॉलरची मागणी वाढली. पर्यायाने उदय पावणाऱ्या अर्थव्यवस्थांमधील विदेशी विनिमयदर घटला. जुलै २०११ ते नोव्हेंबर २०११ च्या दरम्यान ब्राझीलचा रियल ११.९ प्रतिशत, रशियाचा रूबल ९.३ प्रतिशत, दक्षिण कोरीयाचा वॉन ६.२ प्रतिशत तर दक्षिण आफ्रिकेच्या रॅण्डने विदेशी विनिमय मूल्य १७.६३ प्रतिशतने घटल्याचे दिसून येते.

**नामित आणि वास्तव प्रभावी विनिमय दर:**

नामित प्रभावी विनिमय दर (Nominal effective exchange rate) आणि वास्तव प्रभावी विनिमय दर (Real effective

exchange rate) यांचा संपूर्ण कालावधीचा बाह्य स्पर्धात्मकता निदेशांक दर्शविण्याकरिता (Indicatars of external competitiveness) उपयोग होतो. नामित प्रभावी विनिमय दर हा सरासरी भारांक आहे जो की देशीय चलनाच्या द्विपार्श्व नामित विनिमय दर (Bilateral nominal exchange rate) विदेशी चलनाच्या अटीमध्ये व्यक्त होतो. वास्तव प्रभावी विनिमय दर स्पष्ट करतो की नामित विनिमय दराचा भारांक हा सरासरी देशीय आणि परकीय देशाशी संबंधित तफावतीमध्ये समायोजन घडवून आणतो. वास्तव प्रभावी विनिमय दर हा रेखांकित चलन विनिमय दरा (Cross currency exchange rate) मधील बदल दर्शवितो. त्याचबरोबर भारत आणि भारतासोबत व्यापार करणारे देश यांच्यामधील स्फिती बाबत तफावत दर्शवितो. रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडियाने रुपयाची बांधणी अमेरिकन डॉलर, युरोझोनचा युरो, इंग्लंडचा पाउण्ड-स्टर्लिंग, जपानी येन, चायनीज रेमिनवी आणि हॉंगकॉंग डॉलर या सहा चलनाशी केलेली आहे. तर नामित प्रभावी विनिमय दर आणि वास्तव प्रभावी विनिमय दर याद्वारे ३६ देशाचे चलन निर्देशांक दर्शविले जातात. भारतीय रूपयाच्या घसरणीस वित्तीय घटक जबाबदार आहे. असे असले तरी सध्याची किंमत वाढ समायोजित केली तर रुपयाचे अंतर्गत मूल्य आपण काढले तर वास्तव प्रभावी विनिमय दर आपण मोजू शकतो. तज्ज्ञांच्या मते सध्याचा दर वास्तविक विनिमय दराच्या जवळचा आहे. थोडक्यात रूपया हा त्याच्या वास्तविक दराजवळ आलेला आहे. जगामध्ये वास्तविक रूपयाची स्पर्धाक्षमता ही वास्तव प्रभावी विनिमय दरावर अवलंबून असते.

आधार वर्ष २००४-२००५ नुसार सहा चलनाचा व्यापार आधारीत नामित प्रभावी विनिमय दर २.१ प्रतिशतने मार्च २०१० ते मार्च २०११ च्या दरम्यान घटलेला होता. तर मार्च २०११ ते डिसेंबर २०११ च्या दरम्यान १३.५ प्रतिशतने घटलेला होता. मार्च २०११ मध्ये रुपयाचे मूल्य मासिक सरासरी विनिमय दरानुसार १.२ प्रतिशतने घटलेले होते. मार्च २०११ मध्ये रुपयाचे मूल्य ४४.९७ रु प्रति डॉलर होते ते डिसेंबर २०११ मध्ये ५२.६६ रु. प्रति डॉलर झाले. सहा देशांच्या व्यापार आधारीत वास्तव प्रभावी विनिमय दरानुसार रुपयाचे मूल्य मार्च २०१० ते मार्च २०११ च्या दरम्यान ४.१ प्रतिशतने घटले. २०११-२०१२ या वित्तीय वर्षाच्या दरम्यान सहा देशाचा चलन निर्देशांक दर्शवितो की मार्च २०११ मध्ये रुपयाचे मूल्य १०.८ प्रतिशतने घटलेले होते. सामान्य अटीनुसार रुपयाच्या मूल्यामध्ये मोठ्या प्रमाणावर घट झालेली होती.

### बाह्यदृष्टीक्षेप आणि आव्हाने:

भारताच्या संदर्भात विचार करताना २०११-२०१२ या वित्तीय वर्षामध्ये व्यापारी तूट समग्र देशीय उत्पादना (जी.डी.पी) च्या ८ प्रतिशत आहे. चालू खात्यामधील तूट ३ प्रतिशत आहे. हे लक्षण शोधनशेषातील असंतुलनामध्ये वृद्धी होण्याचे आहे. असंतुलन निर्माण होण्याचे कारण अनुत्पादक अशा सोने आणि उपभोग्य वस्तूची आयात वाढलेली आहे. तर क्रूडच्या तेलाच्या किंमती वाढत आहे. यामुळेच रुपयाची घसरण झालेली आहे. व्यापार शेषामध्ये सुधारणा घडवून आणायच्या असतील तर दीर्घकालीन दृष्टिकोनातून निर्याती वाढवून स्पर्धा करावी लागेल आणि आयाती घटवाव्या लागतील. व्यापार शेष आणि

चालू खात्यामध्ये तूट उच्च पातळीची आहे. याचा एकत्रित परिणाम म्हणजे विदेशी संस्थांची गुंतवणूक घटलेली आहे. विदेशी गुंतवणुकीचा प्रवाह मुळातच अनिश्चित असतो. या परिस्थितीमुळे तो अधिक अनिश्चित झालेला आहे. शोधनशेषामध्ये तफावत निर्माण झाल्यामुळे अर्थव्यवस्थेला बाह्य धक्के बसत आहेत.

गेल्या काही वर्षात रुपयामध्ये उच्च प्रतीची अनिश्चितता दिसून आली. ही अनिश्चितता गुंतवणूकदाराचा विश्वास दुर्बल करते. याचा संबंध निगम क्षेत्राच्या ताळेबंदपत्रक आणि नफ्याशी आहे. चलनाचे विदेशी विनिमय मुल्य घटल्यामुळे बाह्य वाणिज्यक कर्ज (External commercial borrowings) संकटात सापडले आहे. त्यामुळे रुपयाची अनिश्चितता तपासण्याची गरज आहे. भांडवलाची पश्चगामीयता आणि रुपयाची घसरण यामुळे बाह्य धक्के बसत आहे. हे घटक एकमेकास बांधील असून विदेशी विनिमय रोखे बांधणीमध्ये महत्त्वाचे ठरतात. जेव्हा चलनावर दबाव निर्माण होतो तेव्हा त्याचे मूल्य लक्षात घेऊन रोख्याची बांधणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे भांडवलाचा प्रवाह वाढू शकतो.

समारोप:

आज सर्व देश जागतिकीकरणामध्ये समाविष्ट झालेले आहे. त्यांना एकमेकांपासून वेगळे करणे शक्य नाही. जागतिक अर्थव्यवस्था आणि भारत या दरम्यान काय घडू शकेल याची अपेक्षा करू शकत नाही. युरोझोन अरिष्ट आणि जागतिक अर्थव्यवस्थेमधील अनिश्चितता याचा परिणाम भारताच्या आर्थिक वृद्धीवर झाला. आर्थिक वृद्धी दर घटला. चालू खात्यामध्ये उच्च प्रमाणात तूट निर्माण झाली आणि भांडवली प्रवाह आटला. शोधन शेषामध्ये तूट निर्माण झालेली आहे. विदेशी संस्थांनी गुंतवणूक घटवलेली आहे. या सर्वांचा परिणाम म्हणजे रुपयाचा विदेशी विनिमय दर घटलेल्या आहे. म्हणून सावध अशा धोरणाचा उपयोग होऊन संतुलन निर्माण होण्याची नितांत आवश्यकता आहे.

## संदर्भ सूची :


1) Stiglitz Joseph (2002) : *Globalization and it's Discontents*, Pengium Book India, New Delhi.

2) Stiglitz Joseph (2010) : *The Stiglitz Report - Reforming the International Monetary and Financial sytem in wake of the Global crisis*, New Press, New York.

3) Reddy Y. V. (2011) : *Global crisis - Recession and uneven recovery*, Orient Blakswan, New Delhi.

4) Marjit Sugatu (2012) : *The fall of the Rupee : The Hidden lesson*, Economic and Political Weekly, Vol. XIVII No. 26 & 27, June 30 - July 7

5) Subramanium K (2012) : *Rupee's Travails : Blame it on Greece*, Economic & Political Weekly, Vol-XLVII No. 23, June 9

6) Rajwade A.V. (2012) : *The fall of the Rupee Background, Remedy and policy*, Economic & Political Weekly, January 14 Vol. XLVII, No.2.

7) Economic Survey (2012) : *Economic Survey 2011-2012*, Oxford University Press, Government of India.

8) Economic Survey (2011) : *Economic Survey 2010-2011*, Oxford University Press, Government of India

१) जहागिरदार दि.व्यं. (२०११) : *रूपयाच्या विदेशी विनिमय मूल्यात घसरण : स्वरूप व परिणाम* ; आर्थिक जगत २८ नोव्हेंबर, दै. हिंदुस्थान अमरावती.

# सहकारी साखर कारखान्यांना सहवीज निर्मिती प्रकल्पाने आर्थिक बळकटी

**सुरेखा अ. फाकडे, पेठ वडगांव,**
सु.म. देसाई कन्या महाविद्यालय,
ता. हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर.
भ्रमणध्वनी ८००७२७९७४१

भारनियमनातून बाहेर पडण्यासाठी आणि शेतकऱ्यांना ऊसाला प्रतिटन जादा दर देण्यासाठी प्रत्येक कारखान्याने सहवीज निर्मिती प्रकल्प हाती घेणे महत्त्वाचे आहे. आजच्या घटकेस सर्वच क्षेत्रात उदा. शेती, उद्योग, शैक्षणिक, आय.टी.आय. इत्यादींना भारनियमनाचा फटका बसत असून त्याचे दूरगामी परिणाम आर्थिक विकासावर होत आहेत. देशामध्ये महाराष्ट्र राज्यात सर्वात जास्त वीज-निर्मिती होते. तसेच विजेचा खपही जास्त आहे. आज महाराष्ट्राची एकूण वीज निर्मिती क्षमता १५,५५९ मेगावॅट इतकी आहे. तथापि, यापेक्षा विजेची मागणी ५,००० ते ६,००० मेगावॅटने जादा आहे. त्यामुळे भारनियमन होत असून त्याचे अनेक क्षेत्रावर दुष्परिणाम होत आहेत. विशेष करून शेतकऱ्यांना त्याचा फटका जास्त बसत आहे. कारण ऊस पाण्याअभावी वाळून जाण्याची शक्यता असते.

साखर कारखान्यांनाही आज मितीस केवळ साखर निर्मिती करून चालणार नाही. तर उपफलावरही लक्ष केंद्रित केले पाहिजे. सहकारी साखर कारखान्यांना सहवीज निर्मिती इथेनॉल निर्मिती, मद्यार्क निर्मिती, कागदनिर्मिती यापासूनही उत्पादन मिळते. सहवीज निर्मिती प्रकल्पामध्ये १० ते १५% पर्यंत बगॅस बचत व त्याचबरोबर अतिरिक्त वीज निर्माण केली जाते. कारखान्यांची वीजेची गरज भागवून उर्वरित वीज विकण्याची संधी प्राप्त झाली आहे. साधारण २५०० TCD क्षमतेचा प्लॅन्ट १२ ते १५ मे. वॅट स्वत:साठी वापरून ८ ते १० मेगावॅट वीज हंगामात विकू शकतो. त्यामुळे उत्पादकांना प्रतिटन १५० ते २५० रु. जादा मिळू शकतात. शिवाय ऊसात साखर फक्त १४% इतकीच असते. याबरोबर ३०% बगॅस, ५०% पाणी, २% प्रेसमड, व ४% मळी हे इतर घटक

ऊसापासून मिळतात. यातील प्रत्येक घटकाचा उपफल उत्पादनांसाठी कार्यक्षमतेने वापर केल्यास साखरेपेक्षा चांगले उत्पादन मिळू शकते. सध्या ऊसाचा भाव २३०० रु. प्रतिटन आहे. तर बगॅसचा भाव ३००० रु. प्रतिटन आहे. बाय प्रोजक्टस्च्या माध्यमातून वर्षभर कारखाने चालविण्यास साखर कारखान्यातील कर्मचारी वर्गाच्या पगाराचा बोजा कारखान्यांवर पडणार नाही व कारखान्यांना आर्थिक बळकटी मिळेल.

राज्यातील सर्व साखर कारखान्यांची सहवीजनिर्मिती क्षमता साधारणपणे १२०० ते १५०० मेगावॅट असून आजमितीस ३० कारखाने सहविजनिर्मिती करीत आहेत आणि आणखी ३० कारखान्यांचे काम प्रगतीपथावर आहे. ते यावर्षी चालू होतील. वरील सर्व कारखान्यांमध्ये एकूण ७०० मे. वॅट वीज तयार होण्याची क्षमता आहे. राज्यात सन २०११-१२ अखेर एकूण १७४ साखर कारखाने कार्यरत आहेत. सर्व साखर कारखान्यांनी सहविज निर्मिती प्रकल्प राबविल्यास राज्यात मोठ्या प्रमाणात वीज निर्माण होईल.

कोल्हापूर जिल्हयामध्ये जे २० साखर कारखाने आहेत, त्यांची एकूण गाळप क्षमता प्रतिदिन ७२,२०० मे. टन अशी असून, या सर्व साखर कारखान्यांना क्षमतेप्रमाणे १६० दिवसांची साधारणतः ११५ ते १२० लाख मे. टन ऊसाची गरज भासते. इतका ऊस कोल्हापूर जिल्ह्यामध्ये उपलब्ध होऊ शकतो. परंतु रोगराई, अवर्षण, महापूर इ. सारख्या नैसर्गिक कारणांमुळे ऊसाला किफायतशीर भाव मिळत नाही. त्यामुळे शेतकरी ऊसाखालील जमीन अन्य पिकांकडे वळवितात. अपुऱ्या गाळपामुळे कारखानदारींपुढे विविध प्रश्न उभे राहतात. यासाठी शेतकऱ्यांना दर एकरी उत्पादन वाढविण्यासाठी सरकारकडून उत्तेजन दिले पाहिजे. शेतीत जास्तात जास्त भांडवल गुंतवले पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे आणि ऊसाला रास्त भाव मिळू देण्याचे धोरण सरकारला ठेवावे लागेल. यासाठी काही वेळा धोका पत्करूनही शेतीमालाची किंमत किफायतशीर पातळीवर ठेवण्यासाठी शेतीमालाच्या निर्यातीच्या धोरणाचा वापर योग्य पध्दतीने करणे आवश्यक आहे. साखर उत्पादनाचे दुष्टचक्र मोडायचे असेल तर साखरेच्या निर्यातीत आत्मविश्वासाने उतरले पाहिजे. प्रत्येकवर्षी किमान १५% साखर निर्यात केली पाहिजे. जर गाळपासाठी ऊस कमी पडला तर त्याचे दूरगामी परिणाम उत्पादन खर्चावर तसेच सहवीज निर्मिती प्रकल्पावरही होऊ शकतो. कारण गाळप कमी झाल्यास बगॅसचे उत्पादन कमी होऊन परिणामी बगॅस कमी उपलब्ध झाल्याने सहवीजनिर्मिती प्रकल्प हा पूर्ण क्षमतेने न चालून विजेचा तुटवडा भासेल. यासाठी ऊस उत्पादन प्रति एकरी वाढविणे गरजेचे आहे आणि त्या दृष्टिकोनातून माती परिक्षण, बेनेमळा, बेने व्यवसाय, सुधारीत ऊस जातीची लावगड, ऊस लागवड पध्दतीत बदल, पाणीपुरवठा योजनांचा विकास व ऊस पिकासाठी पाणी वापराचे नियोजन, खोडवा व्यवस्थापन, तोडणी प्रोग्रॅम आदी बाबींकडे जास्तीत जास्त लक्ष देणे गरजेचे आहे.

एक मेगावॅट वीजनिर्मितीसाठी साधारण २.४ ते २.७ मे.टन बगॅस सरासरी १०० लाख मे.टन ऊसाचे गाळप गृहित धरल्यास त्यातून ५ ते ७% बगॅस सेव्हिंग झाल्यास साधारणपणे ७ लाख मे. टन बगॅस उपलब्ध होईल आणि त्यापासून २०० मेगावॅट वीजनिर्मिती होईल. ही बगॅसची उपलब्धता १००% गाळप क्षमतेचा वापर करून

गृहित धरलेली आहे. सर्वसाधारणपणे बरेच कारखाने १२५ ते १४०% गाळप क्षमतेने चालतात. त्यामुळे ऊस विकास कार्यक्रम घेऊन ऊसाची उपलब्धता वाढविल्यास आणखीन जादा ५० मेगावॅट वीजनिर्मिती होऊ शकते. याशिवाय नवीन तंत्रज्ञानावर आधारित बॉयलर्सचा वापर केल्यास कोळशाचा वापर करता येतो. त्यामुळे ऑफ सिझनमध्ये सुध्दा विजनिर्मिती होऊ शकते.

भांडवलाचा विचार केल्यास १ मेगावॅट विजनिर्मिती करण्यासाठी ५ कोटी भांडवली गुंतवणूक करावी लागते. त्याचप्रमाणे बॉयलिंग हाऊसमधील मशीनरींचे आधुनिकीकरण करावे लागते. साखर कारखान्यांची आर्थिक परिस्थिती पाहिल्यास हे अडचणीचे आहे. परंतु सहनिर्मिती प्रकल्पामध्ये राज्य शासन सुरुवातीस ५% भागभांडवल देणार आहे. हे भांडवल १०% पर्यंत वाढविण्याची तरतूद आहे. तसेच शुगर डेव्हलपमेंट फंडातून ३०% व इतर वित्तीय संस्थामधून ६०% अशी कर्ज उभारणी करून निधी उपलब्ध होणार आहे. शुगर डेव्हलपमेंट फंडावरील कर्जास ४% दराने व्याज आकारणी होणार आहे. केन्द्रशासनही जे कारखाने वीजनिर्मिती करतील त्यांना बॉयलरच्या दाबाचे प्रमाणात अनुदान देत आहे. ४० बार त्यावरील बॉयलर वापर असणाऱ्या वीज निर्मिती प्रकल्पांना रू. ४० लाख प्रति मे. वॅट ६० बार व त्यावरील बॉयलरचा वापर करणाऱ्या वीज निर्मिती प्रकल्पांना रू. ५० लाख प्रति मे. वॅट व ८० बार व त्यावरील बॉयलरचा वापर करणाऱ्या वीज निर्मिती प्रकल्पांना रू. ६० लाख प्रति मे. वॅट अनुदान जाहिर केले आहे तथापि देशभरातील वीज टंचाईचा प्रश्न लक्षात घेतल्यास हे अनुदान कमी वाटते. केंद्रशासनाने अनुदान वाढविण्यास साखर उद्योग व तसेच सहविज निर्मिती प्रकल्प आर्थिक दृष्टीकोनातून चांगले चालतील.

पुनर्उत्पादित (रिन्युएबल) इंधनापासून वीजनिर्मिती केल्यास त्यापासूनही साखर कारखान्यांना आर्थिक फायदा होणार आहे. क्योही प्रोटोकॉल नुसार जागतिक पर्यावरण राखण्याची जबाबदारी सर्व देशांची आहे. सन १९९० ची प्रदुषण पातळी सन २०१२ पर्यंत खाली आणण्याची तरतूद असून, त्याचा कालावधी सन २००८ ते २०१२ असा राहणार आहे. यासाठी पुर्नउत्पादित इंधनापासून वीजनिर्मिती केल्यास जागतिक पातळीवरून त्याला क्रेडिट मिळणार आहे. यासाठी प्रत्येक युनिट वीज विक्रीवर त्याचा फायदा मिळणार आहे. अशा सहवीजनिर्मिती प्रकल्पातून किती टन कार्बनडाय ऑक्साईड उत्सर्जित झाला. त्या प्रमात त्या-त्या साखर कारखान्यांना त्याचा फायदा मिळणार आहे. सर्वसाधारणपणे १ युनिट वीज निर्माण केल्यास ०.८ किलोग्रॅम कार्बन डायऑक्साईड कमी तयार होतो. यानुसार जर हवेतील १ टन कार्बन डायऑक्साईड कमी केला तर सध्या १२ ते १४ युरो म्हणजे ८३८ ते ९७७ रु. मिळू शकतात. या दरानुसार सहवीजनिर्मिती करणाऱ्या प्रत्येक साखर कारखान्यास Clean Development Mechanism (CDM) च्या माध्यमातून प्रत्येक कारखान्यास वीजनिर्मितीच्या प्रमाणात उत्पन्न मिळेल व त्याचा फायदा ऊस उत्पादकांना त्या-त्या प्रमाणात मिळेल.

साखर कारखानदारी टिकवायची असेल तर इतर उत्पादन कारखान्यांनी घेणे गरजेचे आहे. प्रामुख्याने आसवनी व सहबीज निर्मिती या

बाबतीत फायदेशीर प्रकल्प राहणार आहेत. महाराष्ट्रात कोल्हापूर जिल्ह्यात सर्वात जास्त कारखाने आहेत. सर्व कारखान्यांनी सहवीज निर्मिती केली तर कोल्हापूर जिल्ह्यात एक मोठा औद्योगिक प्रकल्प उभारला जाईल आणि त्यातून रोजगार निर्मिती होईल.

संदर्भ सूची :


१) जुगळे व्ही.बी., *शुगरकेन प्रायसिंग पॉलीसी*, अॅटलांटीक पब्लिशर्स, न्यू दिल्ली, २०००.

२) मंगल सिंह, *ट्रेनिंग मॅन्यूल फॉर शूगर मिल्स*, सोमिया पब्लिशर्स, न्यू दिल्ली, १९९८.

३) जे. मॉरिस पटूराव, *बाय प्रोडक्टस् ऑफ द केन शुगर इंडस्ट्री*, इलिव्हायजर पब्लिशिंग कंपनी, अॅमस्टरडॅम, १९६९.

४) अजित नरदे, *साखर डायरी*, अनेकांत प्रकाशन, जयसिंगपूर, सन २०१०-११, पृ.१९९.

५) पी.जी. मेढे, कार्यकारी संचालक, छ. राजाराम साखर कारखाना, कोल्हापूर यांचा २० ऑगस्ट २००९ चा दैनिक लोकमत मधील लेख.

६) रवींद्र पाटील, पंचगंगाच्या भरारीस सहवीज प्रकल्पाची साथ, हा लेख. दै. सकाळ, दि.३० एप्रिल २०१०.

७) *बंडोपंत पाटील सहवीज प्रकल्पामुळे ऊस दरात वाढ अपेक्षित* हा लेख, दै. सकाळ दि. १० मे २०१०.

८) इंडियन शुगर इयर बुक, २०११, P.P. 312

९) शुगर इंडिया बुक, २०१०-११, P.P. 411

# भाववाढ- मापनासंबंधी एक प्रयत्न

**सुनिता माळी**, मिरज,
कन्या महाविद्यालय, जिल्हा सांगली.
भ्रमणध्वनी: ९७६६६७२०६४

प्रस्तावना:

'भाववाढ -मापनासंबंधी एक प्रयत्न' या निबंधामध्ये भाववाढ मापनाच्या सरकारी पध्दतीची तुलना सामान्य ग्राहकाला त्याचा अर्थ व प्रमाण समजण्याच्या दृष्टिने केलेल्या एका प्रयत्नाशी केलेली आहे. या संदर्भातील मांडलेल्या आकडेवारीचे निष्कर्ष निबंधाच्या शेवटी दिलेले आहेत.

भाववाढी संदर्भातील व्याख्या :

कोलबर्नच्या मते, "ज्यावेळी अत्याधिक मुद्रा (चलन) अत्यंत कमी वस्तूंचा पाठलाग करते तेव्हा भाववाढ असते."

भाववाढीचा तांत्रिक अर्थ :

"किंमत निर्देशांकामध्ये एका वर्षभरात झालेली शेकडा वाढ म्हणजे भाववाढ होय".

$$\text{किंमत निर्देशांकात झालेली वाढ} = \frac{\text{प्रारंभीचा किंमत निर्देशांक}}{\text{वर्षाअखेरचा किंमत निर्देशांक}} \times १००$$

संशोधकाने सामान्य ग्राहक वापरत असणारे धान्य, कडधान्ये, फळे, भाजीपाला, साखर, दुध, तेल व सुतीकापड यांच्या बाजारातील सन २००१ व सन २०११ साली असलेल्या किंमती मांडलेल्या आहेत. धान्य व कडधान्याची आकडेवारी सांगली कृषी उत्पन्न समिती सांगलीच्या सांख्यिकीय विभागातून घेतली आहे. तर पालेभाज्या व कोशिंबीरसाठी आवश्यक असणारे टोमॅटो, बीट, मुळा, काकडीच्या किंमती शिवाजी मंडई सांगलीच्या चंद्रकांत पाटील या विक्रेत्याकडून घेतल्या आहेत. फळांच्या किंमती पुराणिक या फळविक्रेत्याकडून

घेतल्या आहेत. शेंगतेलाच्या किंमती राजेंद्र ट्रेडिंग कंपनी सांगलीतून घेतल्या आहेत. तृणधान्य व कडधान्याच्या एका किलोची किंमत, भाजी एका पेंडीची किंमत, मुळा व बीटची एका नगाची किंमत घेतली आहे.

सामान्यतः किरकोळ ग्राहकांच्या किंवा उपभोक्त्याच्या दृष्टीने म्हणजेच कुटुंबाच्या पातळीला भाववाढीचा प्रभाव कसा जाणवतो याची तुलना सरकारी यंत्रणेने तयार केलेल्या शास्त्रशुध्द किंमत निर्देशांकाशी केली असता अधिक स्पष्ट होईल अशी आमची भावना आहे. या संबंधात उपभोक्ता किंमत निर्देशांक हा माझ्या दृष्टिने तुलनेचा अधिक वास्तव मार्ग ठरतो. संशोधिकेने या ठिकाणी सन २००१ या वर्षातील किंमती लक्षात घेतल्यात्त तसेच सन २०११ या दुसऱ्या वर्षातील किंमती लक्षात घेतल्या. पायाभूत वर्ष म्हणून सन २००३ चा निर्देशांक ग्रामीण भागासाठी तसेच शहरी भागासाठी १०० मानला व त्याला अनुलक्षून बाजारपेठेतील प्रत्यक्ष किंमती लक्षात घेतल्या तर पुढील चित्र निर्माण होते.

या ठिकाणी सन २००१ च्या किंमती सन २००३ ला गृहीत धरल्या आहेत. याचा अर्थ ग्रामीण व शहरी अशा दोन्ही निकषावर पायाभूत वर्षाचा निर्देशांक हा १०० होतो. त्यानंतर सन २०१०-११ अखेर ग्रामीण उपभोक्ता किंमत निर्देशांक १८१ होता व शहरी किंमत निर्देशांक १७५ होता. त्यांची सरासरी काढली तर १७८ हा तुलनेसाठी निर्देशांक म्हणून वापरता येईल.

### गट-अ- तृणधान्य

(प्रतिकिलो)

| अ.क्र. | नाव | सन २००१ (रू. पै.) | सन २०११ (रू. पै.) | एकूण वाढ (%) | वार्षिक वाढ (%) | निर्देशांक वाढीचा वार्षिक दर (%) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | गहू | ९.२५ | १८.८५ | २०३.७८ | २०.३७ | १७.८ |
| २. | तांदूळ | २०.०० | ३२.९४ | १६४.७ | १६.४७ | १७.८ |
| ३. | ज्वारी (शाळू) | ८.८० | १८.१७ | २०६.४७ | २०.६४ | १७.८ |
| ४. | मका | ५.५० | १०.०७ | १८३.०९ | १८.३० | १७.८ |

### गट-ब- कडधान्ये

(प्रतिकिलो)

| अ.क्र. | नाव | सन २००१ (रू. पै.) | सन २०११ (रू. पै.) | एकूण वाढ (%) | वार्षिक वाढ (%) | निर्देशांक वाढीचा वार्षिक दर (%) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | तूर | १३.७० | ३०.९८ | २२६.१३ | २२.६१ | १७.८ |
| २. | मूग | १९.०० | ४८.१६ | २५३.४७ | २५.३४ | १७.८ |
| ३. | उडीद | १४.०० | ३५.२१ | २५१.५ | २५.१५ | १७.८ |
| ४. | मटकी | १९.०० | ५९.१७ | ३११.४२ | ३१.१४ | १७.८ |

### गट-क- पालेभाज्या (प्रतिपेंडीस)

| अ.क्र. | नाव | सन २००१ (रू. पै.) | सन २०११ (रू. पै.) | एकूण वाढ (%) | वार्षिक वाढ (%) | निर्देशांक वाढीचा वार्षिक दर (%) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मेथी | ५.०० | ८.०० | १६० | १६ | १७.८ |
| २. | तांदळी | २.०० | ५.०० | २५० | २५ | १७.८ |
| ३. | लालमाठ | २.०० | ५.०० | २५० | २५ | १७.८ |
| ४. | पालक | २.०० | ५.०० | २५० | २५ | १७.८ |
| ५. | कोथिंबीर | १.५० | ५.०० | ३३३.३३ | ३३.३३ | १७.८ |

### गट-ड-फळे (प्रतिकिलो)

| अ.क्र. | नाव | सन २००१ (रू. पै.) | सन २०११ (रू. पै.) | एकूण वाढ (%) | वार्षिक वाढ (%) | निर्देशांक वाढीचा वार्षिक दर (%) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | सफरचंद | ७०.०० | १२५.०० | १७८.५७ | १७.८५ | १७.८ |
| २. | मोसंबी | ५०.०० | ७०.०० | १४०.०० | १४.०० | १७.८ |
| ३. | संत्री | ६५.०० | ११०.०० | १६९.२३ | १६.९२ | १७.८ |
| ४. | केळी | १०.०० | १८.०० | १८०.०० | १८.०० | १७.८ |

### गट-इ-कोशिंबीर (प्रतिकिलो/प्रतिनग)

| अ.क्र. | नाव | सन २००१ (रू. पै.) | सन २०११ (रू. पै.) | एकूण वाढ (%) | वार्षिक वाढ (%) | निर्देशांक वाढीचा वार्षिक दर (%) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | काकडी | २०.०० | ५०.०० | २५० | २५ | १७.८ |
| २. | टोमॅटो | १२.०० | २०.०० | १६६.६७ | १६.६७ | १७.८ |
| ३. | बीट | १.०० | ५.०० | ५०० | ५० | १७.८ |
| ४. | मुळा | १.५० | ५.०० | ३३३.३३ | ३३.३३ | १७.८ |

### गट-ई- उपभोग्य वस्तू

| अ.क्र. | नाव | सन २००१ (रू. पै.) | सन २०११ (रू. पै.) | एकूण वाढ (%) | वार्षिक वाढ (%) | निर्देशांक वाढीचा वार्षिक दर (%) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | शेंगतेल | ७५.०० | १००.०० | १३३.३३ | १३.३३ | १७.८ |
| २. | साखर | १८.०० | ३०.०० | १६६.६७ | १६.६७ | १७.८ |
| ३. | दुध | २३.०० | ३२.०० | १३९.१३ | १३.९१ | १७.८ |
| ४. | सुतीकापड | २५.०० | ३०.०० | १२०.०० | १२ | १७.८ |

ग्राहकांच्या वापरातील वस्तूंचे आपण सहा गट केलेत. वस्तूंच्या बाजारातील किंमतीत झालेल्या वार्षिक दरवाढीचे आकडे स्तंभ ६ मध्ये दिलेले आहेत व स्तंभ ७ मध्ये निर्देशांकाच्या वाढीतील वार्षिक शेकडा प्रमाण दाखविलेले आहे. अर्थात ही वार्षिक वाढ सर्वच ठिकाणी एकच आहे. कारण ती ग्रामीण व शहरी ग्राहक किंमत निर्देशांकाच्या वाढीच्या संदर्भात मोजलेली आहे. यावरून पुढील निष्कर्ष मिळतात.

१. तृणधान्याच्या बाबतीत विचार केला तर गहू, ज्वारी व मका यांच्या बाजारातील किंमतीमधील वार्षिक वाढ ही निर्देशांक वाढीपेक्षा अधिक आहे. सर्व तृणधान्यांचा एकत्रित विचार केल्यास सरासरी किंमत वाढ १८.९४% ही वार्षिक दिसते. जी निर्देशांकाच्या वाढीच्या दरापेक्षा जास्त आहे.

२. कडधान्यांच्या बाबतीत विचार केला तर तूर, मूग, उडीद, मटकी या सर्वच कडधान्यांच्या बाबतीत किंमतीतील वार्षिक वाढ निर्देशांकातील वार्षिक वाढीपेक्षा कितीतरी जास्त आहे. निर्देशांकातील वार्षिक वाढ सरासरी १७.८% आहे तर कडधान्याची किंमतवाढ सरासरी वार्षिक वाढ २६.०६% आहे.

३. पालेभाज्याच्या बाबतीत मेथी या महत्त्वाच्या पालेभाजीचा अपवाद वगळता इतर पालेभाज्याच्या किंमतीतील वार्षिक वाढ निर्देशांकाच्या वार्षिक वाढीपेक्षा जास्त आहे. सर्व भाज्यांचा एकत्रित विचार केल्यास भाज्यांच्या किंमतीतील वार्षिक वाढ २४.८६% आहे जी निर्देशांकाच्या वाढीच्या दरापेक्षा लक्षणीय जास्त आहे.

४. विशेष लक्षणीय गोष्ट अशी दिसते की, फळांच्या बाबतीत किंमतीतील वार्षिक वाढ केळी (वसई) सोडता इतरांच्या बाबतीत निर्देशांकाच्या वार्षिक वाढीपेक्षा किंचित कमी आहे.

   निदेशांकाची वार्षिक वाढ १७.८% आहे तर फळांच्या बाबतीतील सरासरी वार्षिक किंमत वाढ १६.६९%आहे जी निर्देशांकाच्या वाढीपेक्षा कमी आहे. ही बाब उपभोक्त्याच्या उपभोग-रचनेच्या सुधारणेच्या दृष्टीने अधिक श्रेयस्कर वाटते.

५. कोशिंबिरीसाठी लागणाऱ्या काकडी, बीट, मुळा यांच्या बाबतीत बाजारातील किंमतीतील वार्षिक सरासरी वाढ ही निर्देशांकाच्या वार्षिक सरासरी वाढीपेक्षा लक्षणीय जास्त आहे. याठिकाणी टोमॅटो व काकडीची किंमत किलोमध्ये घेतलेली आहे तर बीट व मुळा यांची किंमत एका नगसंख्येस घेतलेली आहे. टोमॅटोच्या बाबतीत ही वाढ थोडीशी कमी दराने झालेली दिसते. पण या सर्वांचा एकत्रित विचार केल्यास ३१.२५% इतकी वार्षिक दिसते म्हणजेच ती जास्त आहे.

६. खाद्यतेल, साखर, दूध, सुतीकापड (पॉपलीन) यांच्या बाबतीत बाजारातील किंमतीतील वार्षिक वाढ सुदैवाने किंमत निर्देशांकाच्या वार्षिक वाढीपेक्षा लक्षणीय कमी आहे. याठिकाणी तेलाच्या व दुधाच्या किंमती लिटरमध्ये तर साखरेची किंमत किलोमध्ये व कापडाची किंमत मीटरमध्ये घेतली आहे. सर्वांचा एकत्रित विचार केल्यास या वस्तूंच्या बाबतीत बाजारातील किंमतीची सरासरी वार्षिक वाढ १३.९७% आहे.

एकंदरीत पाहता या सर्व प्रयोगाचा पुढीलप्रमाणे अर्थ मांडता येईल.

सर्व वस्तू गटांचा एकत्रित विचार केल्यास असे दिसते की, सर्वसामान्य ग्राहकाला लागणाऱ्या आवश्यक वस्तूंच्या बाबतीत बाजारातील किंमती वार्षिक सरासरी २१.९५% या दराने वाढलेल्या आहेत. किंमत निर्देशांकाची वार्षिक सरासरी वाढ मात्र १७.८% आहे. म्हणजेच सरकारी निर्देशांकात व्यक्त होणारी किंमतवाढ ग्राहकाला प्रत्यक्षात बाजारात जाणवणाऱ्या किंमतवाढीपेक्षा कमी आहे. म्हणजेच किंमत निर्देशांकाच्या आधाराने भाववाढीचा प्रभाव नष्ट करण्यासाठी संघटित कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात जी वाढ दिली जाते ती गरजेपेक्षा कमी असते.

ग्राहकांना बाजारात जाणवणारी भाववाढ उपभोक्ता किंमत निर्देशांकात व्यक्त होणाऱ्या भाववाढीपेक्षा जास्त असते असा या प्रयोगाचा अर्थ लागतो. याबाबतीत अधिक वस्तू व सेवा लक्षात घेऊन एकाच आधारवर्षाच्या संदर्भात अधिक काळासाठी वेगवेगळ्या ठिकाणी अभ्यास करण्याची गरज आहे.

**संदर्भ सूची:**


१. प्रा. एस. एन. कोलते, *मुद्रा आणि वित्तीय प्रणाली*, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, पहिली आवृत्ती, ऑक्टो-२०११, पृ.९२.

२. प्रा. जी. एन. झामरे, *स्थूल अर्थशास्त्र*, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, आवृत्ती, जुलै-१९९९.

३. प्रा.डॉ.राजेंद्र रसाळ, *समग्रलक्षी अर्थशास्त्र*, सक्सेस पब्लिकेशन्स, आवृत्ती, ऑगस्ट-२००६.

# भारतातील दारिद्र्याचा एक अभ्यास

**संदीप भगवान करंडे**, बोरीवली (पश्चिम),
अर्थशास्त्र विभाग, गोखले शिक्षण संस्थेचे
श्री. भाऊसाहेब वतर्क महाविद्यालय, मुंबई.
भ्रमणध्वनी: ९४२१०८७९८२

---

**प्रस्तावना :**

भारतीय अर्थव्यवस्था वेगाने विकसित होणारी जगातील एकमेव विकसनशील अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. भारताने जागतिक स्तरावर अनेक क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. भारतीय अर्थव्यवस्था लोकसंख्येच्या दृष्टीने जगातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. भारताचा आर्थिक विकास दर सुद्धा नोंद करण्यायोग्य आहे, असे असले तरी गरीबी किंवा दारिद्र्य हे भारतीय अर्थव्यवस्थेला लागलेला एक शाप म्हणून ओळखले जाते, कारण जगातील एकूण दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्या लोकसंख्येच्या एक-तृतीयांश लोकसंख्या भारतातील आहे. जागतिक बँकेच्या २००५ च्या अहवालानुसार ४१.६% भारतीय लोक दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत होते. (World Bank Report - २००५) तर अर्जुन सेन गुप्ता यांच्या मते एकूण लोकसंख्येच्या ५०% लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत होती. (The National Commission for Enterprises in the Undersigned Sector CNC EVS) यावरुन भारतात दारिद्र्याचे स्वरुप किती व्यापक आहे याची कल्पना येते.

प्रस्तुत लेखातून भारतातील दारिद्र्याचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. स्वातंत्र्य प्राप्तीपासून ते आजपर्यंत दारिद्र्याचा अभ्यास करण्यासाठी विविध समित्या आणि अभ्यास गट नेमण्यात आले. त्यांच्या निष्कर्षांचा तुलनात्मक अभ्यास करुन दारिद्र्याचे स्वरुप, व्याप्ती, दारिद्र्याविषयी विविध अभ्यास गटाचे विरोधाभास, कारणे आणि दारिद्र्य निर्मुलनासाठी सरकारी पातळीवर करण्यात आलेल्या उपाय योजनांचा परामर्श घेण्याचा प्रयत्न या लेखातून करण्यात आला आहे.

### अभ्यासाची उद्दिष्ट्ये :

१) भारतातील दारिद्र्याचे स्वरुप व व्याप्तीचा अभ्यास करणे.

२) दारिद्र्याचा अभ्यास करण्यासाठी भारतात स्वातंत्र्यापासून ते आजतागायत नियुक्त करण्यात आलेल्या विविध अभ्यास गटांच्या निष्कर्षाचे अध्ययन करणे.

३) दारिद्र्याची कारणे तपासणे.

४) दारिद्र्याच्या परिणामांचा अभ्यास करणे.

५) सरकारी पातळीवरुन दारिद्र्य निर्मुलनासाठी तयार करण्यात आलेल्या विविध योजना आणि कार्यक्रमाचा अभ्यास करणे.

### अभ्यास पद्धती :

प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम साधन सामुग्रीवर आधारलेला आहे. या संकल्पनेशी संबंधित विविध संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, मासिके, भारताचा आर्थिक सर्व्हे अहवाल, नियोजन आयोगाचे अहवाल, भारतीय जनगणना अहवाल, भारतीय रिझर्व्ह बँकेचे अहवाल व तज्ज्ञांचे शोध निबंध इत्यादीमधुन माहितीचे संकलन करुन प्रस्तुत लेख तयार करण्यात आला आहे.

### संदर्भ साहित्याचे सिंहावलोकन :

जी दत्ता (१९९९) यांनी भारतीय ''दारिद्र्य आणि उपाय योजना'' या नावाचे पुस्तक प्रकाशित केले, त्यात त्यांनी दारिद्र्याविषयी सांखिकीय माहिती पुरविली असून, आर्थिक सुधारणा नंतर भारतीय दारिद्र्यात घट झाल्याचे नमूद केले आहे.

टोपोलोव्हा. पी. (२००५) यांनी ''व्यापार उदारीकरण आणि भारतातील ग्रामीण व शहरी दारिद्र्यावरील परिणाम'' अशा आशयाचा शोध निबंध निरिक्षणात्मक पुरावाच्या आधारे तयार केला. त्याचा अभ्यास वेगवेगळ्या राज्यातील निवडक जिल्हे नमुना पद्धतीने घेऊन करण्यात आला.

झा. आर. (१९९९) यांनी देशातील चौदा राज्याच्या संदर्भात दारिद्र्य, विषमता आणि आर्थिक विकास यातील परस्पर संबंधाचा अभ्यास केला त्यात त्यांनी असे नमुद केले की, जलद आर्थिक विकास हे दारिद्र्य कमी करण्याचा एकमेव उपाय / तोडगा आहे.

एस.सत्यप्रकाश (१९८०) ''भारतातील गरिबी एक शाप'' यात भारतातील दारिद्र्याविषयी विविधांगी अभ्यास प्रस्तुत केला असुन दारिद्र्य निर्मुलनासाठी प्रबळ राजकीय इच्छा शक्तीची आवश्यकता असल्याचे नमुद केले आहे.

एस. के. पटवर्धन (२००१) ''भारतातील गरीबी'' या पुस्तकात भारतातील दारिद्र्याविषयीचे वास्तव चित्र प्रस्तुत केले असून भारतीय दारिद्र्याचे कारणे ब्रिटीश राजवट तसेच भ्रष्टाचार आणि निरक्षरता इ. असल्याचे नमूद केले आहे.

कुमार सुनिल (१९९८) पाव्हर्टी ॲलीव्हेशन थ्रु रुरल डेव्हलपमेंट यात दारिद्र्य निर्मुलनासाठी ग्रामीण भागाचा विकास साह्यकारी असल्याचे स्पष्ट केले आहे.

### दारिद्र्याची संकल्पना:

''जे लोक आपल्या दैनंदिन राहणीमानाची किमान पातळी गाठू शकत नाहीत किंवा मुलभूत गरजांची पुर्तता करु शकत नाहीत, त्यांना गरीब किंवा दारिद्र्यातील लोक'' म्हणून संबोधले जाते, पण जीवनमानाची किमान पातळी कोणती व त्या

किमान पातळीवर जीवन जगण्यासाठी दरडोई किती उत्पन्न आवश्यक आहे या विषयी तज्ज्ञांमध्ये एकमत असल्याचे दिसून येत नाही.

भारतासारख्या विकसनशील देशात दारिद्र्य हा एक अनुत्तरित प्रश्न दिसून येतो. कारण इतिहासाचा मागोवा घेतला तर दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्या निरपेक्ष लोकसंख्येत वाढच झालेली दिसून येते. आपण विकासाचा एक विशिष्ट टप्पा गाठला असला तरी त्या प्रमाणात दारिद्र्य कमी असल्याचे दिसून येत नाही.

भारतात सर्वसाधारणपणे दारिद्र्याची जी व्याख्या केली जाते तिचा आधार अन्न, वस्त्र आणि निवारा या प्राथमिक किमान गरजांची पूर्तता हा आहे. या गरजांच्या पूर्ततेसाठी जो खर्च लागतो तो गृहीत धरुन किमान दरडोई उपभोग खर्च काढला जातो. ज्या कुटुंबाची उत्पन्न पातळी या उपभोग खर्चापेक्षा कमी आहे अशा कुटुंबाचा समावेश दारिद्र्य रेषेखाली केला जातो असे असले तरी दारिद्र्याची सर्वमान्य होईल अशी व्याख्या करणे कठीण आहे. दारिद्र्याच्या बाबतीत अनेक तज्ज्ञांनी आपले विचार व्यक्त केले असले तरी त्यात एकवाक्यता नाही.

दारिद्र्याची संकल्पना समजून होण्यासाठी निरपेक्ष दारिद्र्य आणि सापेक्ष दारिद्र्य यातील फरक अभ्यासणे आवश्यक आहे.

## निरपेक्ष दारिद्र्याची संकल्पना :

दारिद्र्याच्या निरपेक्ष संकल्पनेनुसार निर्वाहासाठी आवश्यक असे एक निरपेक्ष मानक किंवा प्रमाण असते म्हणजे जीवन जगण्यासाठी अन्नधान्य, कपडालत्ता आणि निवारा यांची काही किमान परिमाणांची गरज असते, ह्या परिमाणांचे चालू किंमतीनुसार पैशात रुपांतर केले जाते आणि अशा रितीने दरडोई किमान उपभोगाचा पैशातील आकडा ठरविला जातो. ह्या व्याख्येच्या आधारे ज्या लोकांच्या उत्पन्नाची पातळी किंवा खर्चाची पातळी आताच सांगितल्याप्रमाणे पैशात व्यक्त केलेल्या किमान आवश्यक उपभोगापेक्षा कमी असते असे लोक दारिद्र्य रेषेखाली आहेत असे म्हटले जाते.

## सापेक्ष दारिद्र्याची संकल्पना :

लोकांचे सरासरी राहणीमान निरनिराळ्या देशात निरनिराळे असते. उदा. अमेरिकेसारख्या अत्यंत श्रीमंत देशातील (अन्नधान्य, कपडालत्ता, निवारा शिक्षण, करमणूक, वैद्यकीय मदत इत्यादीच्या सरासरी उपभोगावरुन ठरणारे) सरासरी राहणीमान (भारतातील सरासरी राहणीमानाशी तुलना करता) फार उच्च पातळीवर आहे. अमेरिकेत जे लोक सरासरी राहणीमानापेक्षा खालच्या पातळीवर जीवन जगतात, असे लोक तेथे गरीब मानले जातील. पण या आधी म्हटल्याप्रमाणे अमेरिकेतील सरासरी राहणीमान पातळी भारतातील सरासरी राहणीमान पातळीशी तुलना करता इतकी उच्च आहे की, अमेरिकेतील परिस्थितीच्या दृष्टीने गरीब असणारे लोक भारतातील मध्यम वर्गातील किंवा काही श्रीमंत लोक राहणीमान उपभोगतात त्यापेक्षा उच्च पातळीचे राहणीमान उपभोगत असणे संभवते. त्या देशातील गरीब लोक भारतातील परिस्थितीच्या दृष्टीने श्रीमंत असू शकतात आणि भारतातील श्रीमंत लोक गरीब मानले जाणे शक्य आहे.

सापेक्ष दारिद्र्य या संकल्पनेकडे आणखी एका दृष्टिकोनातून पाहता येते. आपण भारत हा

एकच देश विचारात घेतला तर, मुंबईत जे लोक गरीब मानले जातात. त्यापैकी काही लोक देशाच्या ग्रामीण भागातील लोकांशी तुलना करता श्रीमंत ठरु शकतात. तसेच ग्रामीण भागातील जे लोक गरीब समजले जातात. त्यापैकी काही लोक भारतात ज्या भागात वन्य जाती जमातीतील लोक राहतात, त्या भागातील गरीब लोकांशी तुलना करता श्रीमंत मानता येतील.

मानव अधिकार आयोगाच्या अहवालानुसार (Human Rights Commissions Report)दारिद्र्याची व्याख्या पुढील प्रमाणे तीन विविध रुपात करण्यात आलेली आहे:

१) ''अपर्याप्त उत्पन्नामुळे किमान पायाभूत गरजांची पुर्तता करण्यातील अपयश म्हणजे दारिद्र्य होय'' प्रत्येक समाजात किमान जीवन मानासाठी एक विशिष्ट स्तर केला जातो. या अहवालानुसार जे लोक किमान जीवनमानाखाली असतात. त्यांना दरिद्री किंवा गरीब असे संबोधण्यात येते.

२) दारिद्र्याच्या दुसऱ्या व्याख्येनुसार ''किमान पायाभूत सुविधा मिळविण्यातील अपयश किंवा बराच काळ अशा पायाभूत सुविधापासून वंचित राहणे'' म्हणजे दारिद्र्य होय.

३) दारिद्र्याची आधुनिक व्याख्या ''संधीचा अभाव'' या संकल्पनेवर आधारित आहे. या व्याख्येचा गर्भितार्थ असा की, ''किमान पायाभुत गरजांची पुर्तता न होण्यामागे फक्त अपर्याप्त उत्पन्न किंवा असमर्थता हे एकमेव कारण नसून संधीचा अभाव हेही तितकेच जबाबदार आहे, ज्यामुळे व्यक्तीच्या उत्पन्नावर अनिष्ट परिणाम होवून पायाभूत गरजांची पूर्तता करण्यात व्यक्ती असमर्थ ठरतो परिणामी दारिद्र्यात जीवन जगावे लागते.''

### भारतातील दारिद्र्याचा अभ्यास :

भारत सरकारचा नियोजन आयोग हे राष्ट्रीय आणि राज्यस्तरावर दारिद्र्यविषयक अभ्यास करणारी संस्था आहे. त्याच बरोबर स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्य प्राप्तीनंतर नियोजन आयोगाद्वारे दारिद्र्याचा अभ्यास करण्यासाठी विविध समित्या स्थापन करण्यात आल्या होत्या.

भारतातील दारिद्र्याविषयक पूर्वाभ्यासा मध्ये दादाभाई नौरोजी (१८७६) तर स्वातंत्र्योत्तर काळात डॉ. दांडेकर व रथ (१९६०) डॉ. पी.पी. ओझा (१९७०), मिन्हास बी.एस. (१९७०), मोन्टेकसिंग अहलुवालिया (१९७७), प्रा. अमर्त्यसेन (१९८१), प्रा. लकडावाला (१९९५), प्रा. सुरेश तेंडुलकर (२००५), अर्जुनसेन गुप्ता (२००५), सक्सेना समिती अहवाल (२००९) इत्यादी अर्थतज्ज्ञांची भूमिका महत्त्वपुर्ण मानली जाते.

१. दादाभाई नौरोजी यांनी ब्रिटीश राजवटीने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीच्या आधारे भारतीयांचे दरडोई उत्पन्न २० रु. होते तर त्यावेळी किमान जीवनमानासाठी ३४ रु. आवश्यक असल्याचे निर्देशनास आणून भारतातील दारिद्र्यातील तीव्रता स्पष्ट केली.

२. डॉ. दांडेकर व रथ यांनी भारतीयांसाठी दररोज २२५० कॅलरीजचा निकष लक्षात घेऊन १९६०-६७ मध्ये ग्रामीण भागात ४०%

तर शहरी भागातील ५०% नागरी लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली असल्याचे सांगितले.

३. डॉ. मिन्हास यांनी प्रत्येक भारतीय व्यक्तीस प्रत्येक वर्षी २४० रु. इतका उपभोग खर्च आवश्यक असल्याचे गृहित धरुन १९६७-६८ मध्ये ग्रामीण भागात ५०.६ टक्के लोक दारिद्र्य रेषेखालील असल्यास निष्कर्ष काढला.

४. डॉ. ओझा यांनी ग्रामीण भागातील प्रत्येक व्यक्तीला रोज किमान ५१८ ग्रॅम अन्नधान्याचा उपभोग व शहरी भागाकरीता किमान ४३२ ग्रॅम उपभोग घेणे आवश्यक मानून १९६०-६१ मध्ये शहरी व ग्रामीण भागातील एकत्रित दारिद्र्याचे प्रमाण ४४ टक्के असल्याचा निष्कर्ष काढला.

५. मोन्टेकसिंग अहलुवालिया यांनी १९६०-६१ च्या किंमतीच्या आधारे ग्रामीण व शहरी भागातील प्रत्येक व्यक्तीसाठी प्रत्येक वर्षी अनुक्रमे १८० रु. व २४० रु. किमान उपभोग खर्च आवश्यक मानला व त्या आधारे १९७३-७४ मध्ये ग्रामीण भागातील ४६% लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत असल्याचा निष्कर्ष काढला.

६. प्रा. अर्मत्य सेन यांनी दारिद्र्य विषयक विचार मांडतांना असे म्हटले आहे की, अर्थव्यवस्था खुली करतांना त्यांचे फायदे-तोटे कोणाला कसे होतील याचा विचार केला पाहिजे. सामाजिक संधीची कमतरता, निरक्षरता व चांगल्या आरोग्याची आवश्यकता असतांना जर नागरिकी-करणाची गती वाढविली तर त्याचे फायदे मिळण्याऐवजी समस्याच निर्माण होतील असा इशारा दिला. आरोग्याची काळजी व शिक्षणाकडे दुर्लक्ष केल्यास उदारिकरणाचे लाभ कमी मिळतात. अमर्त्य सेन यांच्या मते धान्यांची कमतरता हे दारिद्र्याचे कारण नसून बेरोजगारीमुळे क्रयशक्तीचा अभाव हे भारतातील दारिद्र्याचे प्रमुख कारण आहे.

७. भारतीय नियोजन मंडळाने सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या कालखंडात (१९८०-८५) दारिद्र्य या संकल्पनेची व्याख्या केली. ग्रामीण व शहरी जनतेसाठी दारिद्र्य रेषा किमान उपभोग व किमान गरजा या निकषाच्या आधारे ठरविण्यात आली. ग्रामीण भागात प्रतिदिनी प्रतिमाणसी किमान २४०० उष्मांक आणि शहरी भागात प्रतिदिनी प्रतिमाणसी २१०० उष्मांक ज्या व्यक्तीस प्राप्त होत नाहीत ती दारिद्र्यात आहे असे समजावे. या संकल्पनेचा आधारे किमान अन्नधान्य विषयक गरजा भागविण्यासाठी सन १९७९-८० च्या किंमतीवर आधारलेल्या प्रतिमाणसी दरमहा रुपये ७६ ग्रामीण भागासाठी आणि रु. ८८ शहरी भागासाठी खर्च ठरविण्यात आला या नुसार १९७७-७८ मध्ये देशात ४८.१३ टक्के जनता दारिद्र्यरेषे खालील जीवन जगत होती.

८. दारिद्र्याचा अभ्यास करण्यासाठी भारतीय नियोजन आयोगाने सन २००५ मध्ये प्रा. सुरेश डी. तेंडुलकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. तेंडुलकर समितीने अस्तित्वातील निकषाचा अभ्यास करुन त्यात पायाभूत असे बदल सुचवले व

बहुआयामी निकष अमलात आणून दारिद्र्य निर्धारण करण्यात आले. त्यांच्या निकषानुसार सन २००४-०५ मध्ये ग्रामीण भागात ४१.८% तर शहरी भागात २५.७% लोक दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत असल्याचा निष्कर्ष काढला. (ऑल इंडिया लेवल ३७.२%)

९. सन २००८ मध्ये जागतिक बँकेने दारिद्र्याविषयी जागतिक दारिद्र्य रेषा तयार केली. या नुसार ज्या व्यक्तीचे उत्पन्न दर दिवशी १.२५ डॉलर पेक्षा कमी आहे ती व्यक्ती दारिद्र्य रेषेखालील होय. या निकषानुसार भारतात दारिद्र्य रेषेखालील जीवन जगणाऱ्यांची संख्या १९८१ मध्ये ५९.८%, १९९० मध्ये ५१.३% तर २००५ मध्ये ४१.६% असल्याचे स्पष्ट केले.

१०. अलिकडील काळात (२००५ नंतर) ''ऑक्सफोर्ड पावर्टी ॲण्ड ह्युमन इनिशिएटिव'' आणि ''संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम यांनी संयुक्तरित्या ''बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक'' (MPI) (Multidimensional Poverty Index) तयार केला. यामध्ये दारिद्र्याचे मोजमाप करण्यासाठी विविध निकषांचा वापर करण्यात आला. यात घरगुती पातळीवर वंचितांची संख्या / आकार, शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधापासून वंचितांची संख्या, मुलांचे शाळेत नाव नोंदणी प्रमाण, बालमृत्यूदर आणि कुपोषण इ. तसेच विद्युत आणि पिण्याच्या स्वच्छ पाण्याचा पुरवठा, स्वच्छता, घराचा प्रकार (कच्चा/पक्का) स्वयंपाकाच्या इंधनाचा पुरवठा आणि पायाभुत भौतिक सत्ता, उदा. स्कुटर, टी.व्ही., कार, टेलीफोन इत्यादी या सर्व निकषानुसार २००४-०५ या वर्षी ५५.५% लोक दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत असल्याचा निष्कर्ष काढला तर तेंडूलकर समितीच्या मते ३७.२% तर लकडावाला समितीच्या मते २७.५% लोक दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत होते.

### विविध समित्यांचा दारिद्र्यविषयक अंदाज:

सोबत दिलेली सांख्यिकी निरीक्षणासाठी ऑक्सफोर्ड दारिद्र्य आणि मानवविकास संस्थेने बहुआयामी दारिद्र्य निर्देशकांचा (Multidimensional Poverty Index) उपयोग केला आहे. या निष्कर्षानुसार भारतात २००७ मध्ये ६४.५ कोटी लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत होती. यापैकी ४२.१ कोटी लोकसंख्या उत्तर-भारत आणि पूर्व भारतातील आठ राज्यातून असल्याचे निष्पन्न झाले. यामध्ये बिहार,छत्तीसगड, झारखंड, मध्यप्रदेश, ओरिसा, राजस्थान, उत्तरप्रदेश आणि प. बंगाल इत्यादी राज्यांचा समावेश होतो. या आठ राज्यात असणाऱ्या गरिबांचे प्रमाण अफ्रिकेतील २६ देशात असणाऱ्या गरिबांपैकी (४१.० कोटीपेक्षा) जास्त असल्याचे दिसून आले. भारतातील विविध राज्याची दारिद्र्याच्या चढत्या क्रमानुसार वर्गवारी खालील तक्त्यात मांडण्यात आली आहे.

### दारिद्र्याची कारणे :

ब्रिटीश राजवटीपूर्वी भारत देश हा ''सोने की चिडीया'' या उक्तीसाठी प्रसिद्ध होता. याचा अर्थ भारत देश हा जगातील एक सधन देश म्हणून ओळखला जात होता.

| देश/राज्य | मल्टीडायमेन्शनल पॉवर्टी इंडेक्स (MPI) | तेंडुलकर समितीचे निष्कर्ष (२००४-०५) | लकडावाला समितीचे निष्कर्ष (२००४-०५) |
|---|---|---|---|
| भारत | ५५.४% | ३७.२०% | २७.५% |
| केरळ | १५.९% | १९.७०% | ४५.०% |
| गोवा | २१.७७% | २५.००% | ४३.८% |
| पंजाब | २६.१% | २०.९०% | ८.४% |
| हिमाचल प्रदेश | ३१.०% | २२.९०% | १०.०% |
| तामिळनाडू | ३२.४% | २८.९०% | २२.५% |
| उत्तरांचल | ४०.३% | ३२.७०% | ३९.६% |
| महाराष्ट्र | ४०.१% | ३८.१०% | ३०.७% |
| हरियाणा | ४१.६% | २४.१०% | १४.०% |
| गुजरात | ४१.५% | ३१.८०% | १६.८% |
| जम्मु आणि कश्मिर | ४३.८% | १३.२०% | ५.४% |
| आंध्रप्रदेश | ४४.७% | २९.९% | १५.८% |
| कर्नाटक | ४६.१% | ३३.४०% | २५.०% |
| पश्चिम बंगाल | ५८.३% | ३४.३०% | २४.७% |
| ओरिसा | ६४.०% | ५७.२०% | ४६.७% |
| राजस्थान | ६४.२% | ३४.४०% | २२.१% |
| उत्तरप्रदेश | ६९.९% | ४०.९०% | ३२.८% |
| छत्तीसगड | ७१.९% | ४९.४०% | ४०.९% |
| मध्यप्रदेश | ६९.५% | ४८.६०% | ३८.३% |
| झारखंड | ७७.०% | ४५.३०% | ४०.३% |
| बिहार | ८१.४% | ५४.४०% | ४१.४% |

| देश/राज्य | एकूण लोकसंख्या (दशलक्ष) २००७ | बहुआयामी निर्देशांक | दारिद्रयाचे प्रमाण(%) | एकूण दारिद्रय-तील वाटा | दारिद्रयाची निरपेक्ष लोकसंख्या(दशलक्ष) |
|---|---|---|---|---|---|
| भारत | ११६४.७% | ०.२९६ | ५५.४% | --- | ६४५.० |
| केरळ | ३५.०% | ०.०६५ | १५.९% | ०.६% | ५.६ |
| गोवा | १.६% | ०.०९४ | २१.७% | ०.१% | ०.४ |
| पंजाब | २७.१% | ०.१२० | २६.२% | १.०% | ७.१ |
| हिमाचल प्रदेश | ६.७% | ०.१३१ | ३१.०% | ०.३% | २.१ |
| तामिळनाडू | ६८.०% | ०.१४१ | ३२.४% | २.६% | २२.० |
| उत्तरांचल | ९.६% | ०.१८९ | ४०.३% | ०.५% | ३.९ |
| महाराष्ट्र | १०८.७% | ०.१९३ | ४०.१% | ६.०% | ४३.६ |
| हरियाणा | २४.१% | ०.१९९ | ४१.६% | १.३% | १०.८ |
| गुजरात | ५७.३% | ०.२०५ | ४१.५% | ३.४% | २३.८ |
| जम्मु आणि कश्मिर | १२.२% | ०.२०९ | ४३.८% | ०.७% | ५.४ |
| आंध्रप्रदेश | ८३.९% | ०.२११ | ४४.७% | ५.१% | ३७.५ |
| कर्नाटक | २८.६% | ०.२२३ | ४६.१% | ४.२% | २७.० |
| पुर्वोत्तर राज्य | ४४.२% | ०.३०३ | ५७.६% | ४.०% | २५.५ |
| पश्चिम बंगाल | ८९.५% | ०.३१७ | ५८.३% | ८.५% | ५२.५ |
| ओरिसा | ४०.७% | ०.३४५ | ६४.०% | ४.३% | २६.० |
| राजस्थान | ६५.४% | ०.३५१ | ६४.२% | ७.०% | ४१.९ |
| उत्तरप्रदेश | १९२.६% | ०.३८६ | ६९.९% | २१.३% | १३४.७ |
| छत्तीसगड | २३.९% | ०.३८७ | ७१.९% | २.९% | १७.२ |
| मध्यप्रदेश | ७०.०% | ०.३८९ | ६९.५% | ८.५% | ४८.६ |
| झारखंड | ३०.५% | ०.४६३ | ७७.०% | ४.२% | २३.५ |
| बिहार | ९५.०% | ०.४९९ | ८१.४% | १३.५% | ७७.३ |

याचा उल्लेख इतिहासकार अँजम मॅडिसन यांनी त्यांच्या "द वर्ल्ड इकोनॉमी: अ मिलेनिअम परस्पेक्टीव्ह" या पुस्तकात केला आहे. भारत देश हा इ.स पहिल्या ते १८ व्या शतकापर्यंत जगातील एक बलशाली आणि सधन देश म्हणून ओळखला जात होता.

### भारताचा जागतिक (GDP) तील वाटा :

भारतात दारिद्र्यासाठी अनेक कारणे कारणीभूत आहेत जसे ब्रिटीशराज, जातीव्यवस्था, भारताची आर्थिक धोरणे, दारिद्र्य निर्मुलन, कार्यक्रमाची अयोग्य अंमलबजावणी, तांत्रिक विकासाचा अभाव, बेकारी आणि कमी वेतनदर, लोकसंख्या वाढ, उत्पन्नातील विषमता, सामाजिक घटक (दैववाद, जाती व्यवस्था, एकत्र कुटुंब पद्धती, वारसा हक्क, शिक्षणाच्या अपुऱ्या सुविधा, सार्वजनिक आरोग्य सुविधांचा अभाव) राजकीय घटक, सतत वाढणाऱ्या किंमती, नैसर्गिक साधन सामुग्रीचा अयोग्य आणि अपर्याप्त वापर, अपुरे रोजगार नियोजन, नवीन आर्थिक धोरण आणि भ्रष्टाचार इत्यादी.

### दारिद्र्य निर्मुलनासाठी सरकारी प्रयत्न :

स्वातंत्र्यानंतर भारतात नियोजन पर्वास सुरुवात झाली. ६ मार्च १९५० ला नियोजन मंडळाची स्थापना करुन १ एप्रिल १९५१ ते ५ डिसेंबर २०११ पर्यंत विविध पंचवार्षिक व वार्षिक योजना अंमलात आणल्या. देशातील दारिद्र्य निर्मुलनासाठी योजना काळात वारंवार प्रयत्न करण्यात आले आणि अद्याप सुरु आहेत. मात्र भारतीय अर्थव्यवस्थेला दारिद्र्याचा लागलेला कलंक अद्यापही पुसता आला नाही. एवढेच नव्हे, तर हे दारिद्र्याचे दुष्टचक्र फारच वाढले असून देश भयानक परिस्थितीकडे वाटचाल करत आहे. असे असले तरी दारिद्र्य निर्मुलनासाठी विविध कार्यक्रम आणि योजना आखण्यात आल्या. त्यात पुढील योजनांचा समावेश होता. ग्रामीण प्रकल्प कार्यक्रम (१९६१), गरिबी हटाव कार्यक्रम (१९६९-७४) ग्रामीण रोजगारासाठी धडक योजना (१९७१), राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम (१९८१), किमान गरजा कार्यक्रम, ट्रायसेम योजना किंवा स्वयंरोजगारासाठी ग्रामीण युवकांना प्रशिक्षण (ट्रायसेम), रोजगार हमी योजना (१९८३), सिमांत शेतकरी आणि शेतमजूर विकास कार्यक्रम (१९९०-९१), जवाहर रोजगार योजना (१९८९-९०), अल्पभूधारक विकास कार्यक्रम, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, दहा लाख विहीर योजना, इंदिरा आवास योजना, घरकुल योजना, राजीव गांधी निराधार योजना इत्यादी योजनांचा उल्लेख करता येईल.

### निष्कर्ष :

१. विविध अभ्यास गट आणि समित्यांच्या दारिद्र्य निर्धारणाच्या निकषामध्ये विरोधाभास अर्थात एकवाक्यतेचा अभाव.
२. अर्थतज्ज्ञ आणि विचारवंतानी निरपेक्ष आणि सापेक्ष दारिद्र्यात फरक केला नाही. अभ्यासकांनी निरपेक्ष दारिद्र्य संकल्पनेला अति महत्त्व दिले.
३. भारतातील सापेक्ष दारिद्र्याचे प्रमाण जरी कमी झाले असले तरी निरपेक्ष दारिद्र्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते. (उदा. १९७३-७४, ३२.१२ कोटी तर २००७ मध्ये ५५.४ कोटी लोक दारिद्र्य

रेषेखाली जीवन जगत होते.)

४. दारिद्र्याच्या कारणांमध्ये ब्रिटीशराज, भ्रष्टाचार, भाववाढ, वाढती लोकसंख्या आणि चुकीची आर्थिक धोरणे इ. चा जास्त प्रभाव होता.

५. दारिद्र्य निर्मुलन कार्यक्रमाची चुकीच्या पद्धतीने अंमलबजावणी इत्यादी.

६. भारतातील पूर्वोत्तर आणि उत्तरेतील राज्यांची दारिद्र्याबाबत दयनिय स्थिती (बिहार, यु.पी., प.बंगाल, ओरिसा, छत्तीसगड, झारखंड, राजस्थान)

## शिफारसी :

दारिद्र्य निर्मुलन शंभर टक्के शक्य नसले तरी त्याची व्यापकता कमी करता येते, त्या दृष्टीने काही प्रामाणिक प्रयत्न गरजेचे आहेत.

१. अर्थतज्ज्ञ आणि विचारवंतानी सयुक्तिक आणि परिणामकारक अशी आर्थिक धोरणे तयार करावीत.

२. दारिद्र्य निर्मुलनास जेवढे महत्त्व दिले जाते त्यापेक्षा जास्त भ्रष्टाचार निर्मुलनास द्यावे.

३. भारतीय रिझर्व्ह बँकेने भारताची खरी मौद्रीक सत्ता म्हणून कार्य करावे, कोणत्याही राजकीय दबावापोटी धोरणात बदल करु नये. भाववाढ नियंत्रणात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडावी.

४. अर्थव्यवस्था खुली करत असतांना, त्याचे फायदे तोटे कोणाला कसे होतील याचा विचार केला जावा.

५. सरकारी योजनामधून गरिबांना मिळणारी मदत थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करावी, जेणे करुन श्रृंखलेतील भ्रष्टाचार कमी होईल.

६. अमर्त्य सेन यांच्या मते, धान्याची कमतरता हे दारिद्र्याचे कारण नसून बेरोजगारीमुळे क्रयशक्तीचा अभाव दारिद्र्याचे खरे कारण आहे, म्हणून लोकांमध्ये क्रयशक्ती वाढविण्यासाठी पर्याप्त उपाययोजना कराव्या.

७. लोकांनी अयोग्य अशा सामाजिक चाली रिती, रुढी परंपरा यास बगल द्यावी.

८. भारतातील उत्तर आणि पूर्वे कडील राज्यांनी विस्तृत असे रोजगार निर्मितीचे धोरणे तयार करावीत जेणे करुन रोजगार संधी निर्माण होऊन स्थलांतर कमी होईल.

९. राज्यकर्त्यांनी पुढील निवडणूक डोळ्यासमोर ठेवून धोरणे निश्चित करण्याऐवजी पुढील पिढीचा विचार करुन सर्व समावेशक धोरणे बनवावीत.

१०. लोकांनी परंपरागत शिक्षणाऐवजी रोजगारभिमुख शिक्षण आणि प्रशिक्षणाला प्राधान्य द्यावे.

११. दारिद्र्य निर्मुलन कार्यक्रमाची अंमलबजावणी परिणामकारक व्हावी इत्यादी.

## सारांश :

भारत देशाकडे जगातील उगवती महासत्ता म्हणून पाहिले जाते. भारत देशाला येत्या काही वर्षात ही उपाधी (बिरुदावली) प्राप्त करावयाची असेल तर अंतर्गत धोरणात्मक पातळीवर व्युव्हरचनात्मक धोरणांचा अंगीकार करुन दारिद्र्य निर्मुलनासाठी प्रामाणिक प्रयत्नांची गरज आहे.

संदर्भसूची :

१. अमर्त्य सेन (१९८१), *''पॉव्हर्टी अॅण्ड फॅमिन्स अॅन एस्से ऑफ इनटायटलमेंट अॅण्ड डिप्रीव्हेशन''*, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, न्यु दिल्ली.

२. बी.ओझलर अॅण्ड जी. दत्ता, *''अ डेटाबेस ऑन पॉव्हर्टी अॅण्ड ग्रोथ इन इंडिया, द वर्ल्ड बँक''*, - २००६

३. मॉन्टेक एस. अहलुवालिया, *''रुरल पॉव्हर्टी अॅग्रीकल्चर प्रोडक्शन अॅण्ड प्राईसेस''*, न्यु दिल्ली - १९८९

४. मिश्रा एस. के. आणि पुरी बी. के., *''भारतीय अर्थव्यवस्था''* हिमालय पब्लिशिंग हाऊस, मुंबई-२०१०

५. देसाई आणि भालेराव, *''भारतीय अर्थव्यवस्था''*, नागपूर

६. मिन्हास बी. एस., *प्लानिंग अॅण्ड पुअर*, न्यु दिल्ली - १९९५

७. झा. आर., *''ग्रोथ इनइक्वॉलिटी अॅण्ड पाव्हर्टी इन इंडिया, स्पॅटीअल अॅण्ड टेम्पोरेल कॅरेक्टरेस्टीक''*, इकॉनॉमिक अॅण्ड पॉलिटिकल विकली व्हॉल्युम ३४, नं. ५० पृ. ९२१-९२८

८. एस. सत्यप्रकाश, *''भारतातील गरिबी एक शाप''*, (१९८०).

९. टोपोलोव्हा पी., *''ट्रेड लिबरलायझेशन, पॉवर्टी अॅण्ड इनइक्वॉलिटी : इविडंस फ्राम इंडियन डिस्ट्रीकस''*, बकींग पेपर नं. ११६१४, नॅशनल ब्युरो ऑफ इकॉनॉमिक रिसर्च, केम्ब्रीज (२००४)

१०. वर्ल्ड बँक रिपोर्ट - २००५, २००६, २०१०.

११. आर. बी. आय. वार्षिक अहवाल - २०१०-११

१२. इकॉनॉमिक सर्वे - २००९-१०

१३. ईलेवन्थ फाईव इअर प्लॅन डॉक्युमेंट - व्हाल्युम- ।। सोशल सेक्टर

१४. अजय कुमार तोमर आणि शोभा जॅन्थ, *''इकॉनॉमिक लिबरलायझेशन अॅण्ड पाव्हर्टी अॅलेवेशन इन इंडिया''* कुणाल प्रकाशन, न्यु दिल्ली - २०११

१५. डॉ.इंदू वारसेनी आणि डॉ.नितू सायनी, *''पॉवर्टी इन इंडिया, इश्यु अॅण्ड चॅलेंजेस''* कुणाल प्रकाशन, न्यु दिल्ली-२०११

१६. कोकाटे चंद्रकांत, *''हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी समाजाचे आर्थिक व सामाजिक अध्ययन''*, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद - २००६

१७. देशमुख सुदर्शन (२००७,) *"आदिवासी समाजाचे दारिद्रय"* निर्मल प्रकाशन, नांदेड

18. http://en.wikipedia.org./wiki/povertyin-India

19. www.livemint.com/artical/2007

20. www.economist.com

21. www.govtof India.com

22. www.populationcommission.nic.in

23. www.worldbank.org.

24. http://indiabudget.nic.in

25. www.planningcommission.gov.in



International Research Journal

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

# अर्थसंवाद

**जाहिरातीचे दर**

| | कृष्णधवल(B/W) | रंगीत |
|---|---|---|
| १) समोरचे आतील पृष्ठ | रु.४,०००/- | रु.११,०००/- |
| २) मागील(आतील) पृष्ठ | रु.४,०००/- | रु.११,०००/- |
| ३) मागील शेवटचे पृष्ठ | रु.५,०००/- | रु.१५,०००/- |

आपल्या जाहिरातीचा मजकूर-डिझाईन (1/5=150X210 mm) आणि सोबत वरील रकमेचा ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवावा. ड्राफ्ट मराठी अर्थशास्त्र परिषद या नावानेच काढावा. जाहिरात प्रसिध्द होताच अर्थसंवादचा अंक आपणास मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद !

डॉ. अनिल सूर्यवंशी,
कार्यवाह खजिनदार
गोदाई,
शिवशक्ती मैदानाजवळ,
शिवाजीनगर, बार्शी-४१३ ४११,
जिल्हा-सोलापूर,
दूरध्वनी:(०२१८४) २२४२९४
मो.९०११३३९९०६

डॉ.अविनाश निकम,
प्रमुख संपादक
मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९,
जिल्हा नंदुरबार,
मो.९८२२६६५१४१

# वाढती वित्तीय तूट आणि उपाय योजना

**सुभाष लक्ष्मण भालेराव**, शहादा,
पी.एस.जी.व्ही.पी.मंडळाचे कला,
विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, जि.नंदुरबार.
भ्रमणध्वनी: ९४२१५९५७०६

केंद्रीय अर्थखात्याचा कारभार पी.चिदंबरम यांच्याकडे आल्यानंतर वाढती वित्तीय तूट आणि त्यामुळे वाढणाऱ्या व्यापारी तुटीचे दुष्टचक्र भेदण्याचे मोठे आव्हान असल्याचे ध्यानात आले. यावर आवश्यक उपाययोजना सुचविण्यासाठी अर्थ मंत्रालयाने विख्यात अर्थशास्त्रज्ञ डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती नेमली.

वित्तीय व्यवस्थापनाचे आपल्या देशात अर्थव्यवस्थेसमोर उभे ठाकलेले सध्याचे आव्हान १९९१ सालच्या परिस्थितीची आठवण करुन देणारे आहे. त्यामुळे देशी ढोबळ उत्पादिताच्या जवळपास साडेपाच टक्क्यांच्या घरात पोहोचलेली वित्तीय तूट आणि देशी ढोबळ उत्पादिताच्या ४% परिघात प्रवेशलेली व्यापारी तूट आटोक्यात आणली नाही तर मोठा अनवस्था प्रसंग ओढवेल, याची जाणीव झाल्याने केंद्र सरकारने या समितीची नियुक्ती केली. वाढती वित्तीय तुट आणि त्यामुळे वाढणारी व्यापारी तूट हा चक्रानुक्रम मोठा विचित्र असतो. हे दुष्टचक्र भेदण्यासाठी आवश्यक असणारी उपाय योजना आणि त्यानुसार येत्या साधारण दोन ते तीन वर्षांसाठीचा वित्तीय व्यवस्थापनाचा रोडमॅप सरकारला तयार करुन देणे हे या समितीचे कार्य होते. डॉ.विजय केळकर यांच्या समितीमध्ये डॉ.इंदिरा राजारामन आणि संजीव मिश्रा हे दोनच अन्य सदस्य या समितीत होते.

डॉ.विजय केळकर यांच्यामते केंद्र सरकारची वित्तीय तूट एकदम वाढलेली नाही. २००८-२००९, २००९-२०१० या दोन वर्षापासून वित्तीय तूट वाढण्याची प्रक्रीया सुरू झालेली दिसते. अमेरिका *'सबप्राईम'* कर्जाचा फुगा २००८ सालातील सप्टेंबर महिन्यात फुटला आणि अमेरिकेसह अनेक युरोपीय अर्थव्यवस्थांमध्ये मंदीची पावले हळू हळू प्रवेश करु लागली. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला त्या

वित्तीय अरिष्टांची झळ पोहोचणे स्वाभाविकच होते. कारण १९९१ नंतर भारतीय अर्थव्यवस्थेचा आर्थिक व्यवहार येत्या २२ वर्षात किती तरी पटीने वाढल्यामुळे त्याचा परिणाम अर्थव्यवस्थेवर जाणवू लागल्यामुळे भारत सरकारने भरभक्कम खर्चाची 'जी पॅकेजेस' राबवली त्यामुळे सरकारचा सार्वजनिक खर्च वाढला. तसेच उद्योगधंद्यासाठी दिलेल्या विविध करसवलतीमुळे सरकारला फक्त ६००० कोटी रुपयांचा महसूल प्राप्त झाला. त्यामुळे स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या २०११-१२ अंदाजित वित्तीय तूट ५.१ टक्क्यावरुन २०१२-१३ मध्ये ६.१ पर्यंत जाण्याची शक्यता आहे. तसेच सरकारचे अनुदाने ७०,००० कोटी पर्यंत वाढल्यामुळे सरकारची वित्तीय परिस्थिती आणखीच हलाखीची झाली.

मंदीच्या काळात सरकारने ज्या उपाययोजना केल्या त्या आवश्यकच होत्या. परंतु त्याच्यानंतर देशाच्या आर्थिक व्यवस्थापना बाबत जी पुढची पावले उचलायला हवी होती ती उचलली न गेल्यामुळे आजचे वित्तीय संकट उभे राहिले. सगळ्यात महत्वाचा मुद्दा म्हणजे तो इंधनावरील अनुदानाचा. २००८ च्या वित्तीय संकटानंतर काही काळ कमी झालेल्या किंमती पुन्हा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत २०१० पासून पुन्हा वाढायला सुरु झाल्या. मात्र सरकार रासायनिक खते, तेलजन्य इंधने, वीज यासारख्या उत्पादनाच्या किंमती वाढविण्याबाबत उदासीन राहीले. गेली दोन वर्ष सरकारने केरोसीन, डिझेल, स्वयंपाकाचा गॅस यांच्या किंमती राजकीय कारणामुळे स्थिर ठेवल्या. यामध्ये डिझेल, केरोसीन आणि एलपीजी साठी ५०,००० कोटी रुपयाचे सरकारकडून अनुदान देण्यात आले. या सगळ्याचा परिणाम म्हणजे फक्त इंधनावरील अनुदानाचे प्रमाण अलीकडे स्थूल घरेलू उत्पादनाच्या २.६ टक्क्यापर्यंत पोहोचले. हे सत्र असेच चालू राहीले तर याचे दुष्परिणाम होतात. एकतर वीज, खते, इंधने, अन्नधान्य यावरील अनुदानामुळे महसूली तूट वाढते आणि महसुली तूट भरुन काढण्यासाठी केलेल्या कर्ज उभारणीमुळे अनुत्पादक कर्जाचे ओझे वाढते. दुसरे म्हणजे महसुली तूट आणि वित्तीय तूट याचा धन संबंध असतो. तसेच वित्तीय तूट वाढू लागल्यामुळे देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यापारतोलातील व्यापारी तूट वाढायला लागली. यामागे अंतर्गत भाववाढ देखील आहे. म्हणून वाढती वित्तीय तूट आणि व्यापारी तूट डॉ.विजय केळकरच्या दृष्टीने सर्वात घातक आणि संवेदनशील बाब आहे असे त्यांनी म्हटले.

वित्तीय तूट आणि व्यापारी तूट यांच्यातील सहसंबंध नीट समजावून घ्यायला हवा. वित्तीय तूट वाढली की महागाईला चालना मिळते. महागाई वाढली की आपल्या देशातील वस्तू व सेवांची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धात्मकता कमी होते. त्यामुळे निर्यात कमी होऊन व्यापारी तूट उद्‌भवते. मुळात युरोप, अमेरिकेतील मंदीमुळे भारताची निर्यात थंडावलेली आहे. दुसरे असे की, खनिज तेलावर आपली आयात अवलंबून असल्यामुळे पूर्वीपेक्षा व्यापार तूट वाढत गेली. त्यामुळे स्वाभाविकच परकीय गंगाजळीचा साठा कमी -कमी होत गेला. त्यामुळे परकीय गंगाजळीमध्ये कोठून भर पडणार? उत्तर एक परकीय गुंतवणूक यायला हवी किंवा सरकारने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतून कर्जउभारणी तरी केली पाहीजे. आपल्या देशातील सध्याची महागाई, आर्थिक सुधारणांची दिशा व अंमलबजावणी याबाबतच्या राजकीय मतैक्याचा अभाव,

'गव्हर्नन्स' ची खालावलेली पातळी अशा सगळ्या पार्श्वभूमीवर परकीय थेट गुंतवणूक केव्हा आणि किती येईल हा एक विचारार्ह मुद्दा ठरतो. वित्तीय तूट जर आटोक्यात आली नाही, महागाई जर अशीच राहीली तर आहे ते परकीय भांडवल देशाबाहेर जाण्याचा धोका मोठा. तसे दुर्दैव झालेच तर रुपयाचे डॉलरबरोबरचे विनिमय मुल्य अधिकच घसरेल. भारतीय रुपया हा डॉलरसारखे आंतरराष्ट्रीय चलन किंवा 'रिझर्व्ह करेन्सी' म्हणून गणला जात नाही. म्हणून वित्तीय तूटीवर मर्यादा आणून पर्यायाने व्यापारी तूटीचे व्यवस्थापन करणे हे समितीच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक बाब आहे. म्हणून डॉ.विजय केळकर यांनी सरकारला काही उपाययोजना सुचविल्या.

उपाययोजनामध्ये सर्व इंधने आणि सर्व प्रकारची रासायनिक खते यावरील अनुदाने सरसकट बंद करावी असे समितीने सूचविलेले नाही. डिझेलवरील अनुदान हे भारतीय अर्थव्यवस्थेतील वित्तीय व्यवस्थापनाचा तोल ढासळण्यामागील एक मुख्य कारण आहे. गेल्या जवळपास २६ महिन्यांमध्ये डिझेलच्या बाजारभावांची फेररचना करण्यात आलेली नसल्याचे समितीच्या लक्षात आले. त्यामुळे डिझेलवरील अनुदानात चालू वित्तीय वर्षात ५० टक्क्यांनी कपात करुन पुढील वित्तीय वर्षात उरलेले अनुदान काढून घ्यावे. तसेच स्वयंपाकाच्या गॅस वर दिले जाणारे अनुदान २०१४-१५ पर्यंत टप्प्या टप्प्याने पूर्णपणे हटवावे. तसेच स्वयंपाकाच्या गॅसवरील अनुदान ग्राहकांच्या खात्यावर थेट रोख स्वरुपात जमा करावे. केरोसीनच्या प्रत्येक लिटरमागे दिल्या जाणाऱ्या अनुदानात सुध्दा २०१४-१५ या वित्तीय वर्षापर्यंत एक तृतीयांश कपात केली जावी असे समितीने सुचविले.

यासोबत सरकारी उपक्रमांमधील आपले भागभांडवल विकून म्हणजेच निर्गुंतवणूकी करणाद्वारे सरकारने निधी उभारावा. अनेक सरकारी उपक्रमांकडे मोठ्या प्रमाणावर अतिरिक्त जमीन विनावापराची पडून आहे.या जमिनी विकून तो पैसा सरकारी तिजोरीकडे वळवावा.आपल्या देशातील प्रत्यक्ष करप्रणाली मध्ये सुधारणा आणि वस्तू व सेवाकर प्रणालीची निर्दोष अंमलबजावणी करावी असे सुचविण्यात आले.

डॉ.केळकर समितीने ज्या शिफारशी सुचविलेल्या आहे. त्यापैकी डिझेलवरील अनुदानावरील कपातीमुळे नक्कीच भाववाढीला चालना मिळेल. परंतु ती अल्पकालीन भाववाढ असेल. त्यामुळे डिझेल अनुदान कपातीमुळे विशेष असा परिणाम होणार नाही. उलट सरकारची वित्तीय तूट भरुन निघेल. त्यामुळे सरकारी तिजोरीवरील कर्जाचे ओझे कमी होईल. जर अल्पकालीन भाववाढ कमी करायची असेल तर व्यावसायीक वाहन आणि वैयक्तीक वाहन असा भेद करुन डिझेलच्या दरात भेद करावा. त्यामुळे जीवनावश्यक वस्तू आणि सेवाचे भाव वाढणार आणि दुसरे असे की, स्वयंपाकाच्या गॅस वरील अनुदानाच्या कपातीमुळे गॅस वितरणातील भ्रष्टाचार आळा बसून व्यावसायिक वापर ही बंद होईल. यामुळे स्वयंपाकाच्या गॅस पुरवठ्याबाबतची कृत्रिम टंचाई कमी होवून सहज खुल्या बाजारात गॅस सिलेंडर मिळेल. म्हणून या शिफारशीचे स्वागत केले पाहीजे. तिसरे असे की, सरकारी उपक्रमांमधील भाग-भांडवल विकून सरकारने निधी उभारावा असे सांगितले. परंतु समितीने येथे

विशेष असा उल्लेख करायला पाहिजे होता की, नफ्यात असलेले सार्वजनिक उपक्रम सोडुन तोट्यात असलेल्या उपक्रमांच्या भागांची विक्री करावी व निधी उभारावा. या ठिकाणी मला विशेष लक्षात आणून द्यावे वाटते की, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमधील भाग भांडवल सुध्दा सरकारने हळूहळू कमी करावे. या सूचनेवर अंमलबजावणी केली पाहिजे. त्यामुळे किंगफिशर कंपनी वाचविण्यासाठी सरकार किंवा हितसंबंधींना प्रयत्न करावे लागणार नाही. त्यामुळे फार मोठ्या प्रमाणात जनतेच्या पैशांचा दुरुपयोग टळेल. चौथी शिफारस अशी की, सार्वजनिक उपक्रमांकडील अतिरिक्त जमीन विकून निधी उभारावा. यावर माझे मत असे की, या अतिरिक्त जमिनीची विक्री सर्व सामान्य जनतेला माहित व्हावी या पध्दतीने करायला हवी. नसता राजकारणी, उद्योजक, व्यापारी, सनदी अधिकारी सवलतीच्या दराने या जमीन खरेदी करुन घेतील. यामुळे या शिफारसींचा विशेष परिणाम होणार नाही.

**संदर्भसूची:**

१) दैनिक लोकसत्ता दिनांक ०७/१०/२०१२ मधील संदर्भ : अभय टिळक यांचा लेख.

२) इंटरनेट वरील माहिती.

हे त्रैमासिक अनिल सूर्यवंशी यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता सातपुडा ऑफसेट, एम.आय.डी.सी. एरिया, अजिंठा रोड, जळगाव येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजी नगर, बार्शी- ४१३ ४११, जिल्हा सोलापूर येथे प्रसिध्द केले.

पीएचडी प्रबंधाचा सारांश

# धुळे जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता बचत गट एक अभ्यास

**विद्या राजेंद्र पाटील, देवपूर,**
सहयोगी प्राध्यापक,
झुलाल भिलाजीराव पाटील महाविद्यालय, धुळे.
भ्रमणध्वनी: ९४२१५३५१२०

**प्रस्तावना:**

भारतात १९७० पासून बचत गट प्रक्रियेला सुरूवात झाली. इलाबेन भट (अहमदाबाद) यांनी सेवा संस्थेची स्थापना केली व महिलांच्या संघटनास सुरूवात झाली. सन १९८७ मध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सहकार्याने व नाबार्डच्या पुढाकाराने म्हैसूर रिसेटलमेंट अॅण्ड डेव्हलपमेंट एजन्सी (MYRADA) या कर्नाटकातील स्वयंसेवी संस्थेने पतव्यवस्थापन गट(Credit Management Groups) निर्माण केले. हे पतव्यवस्थापन गट आजच्या बचत गटांसारखे होते म्हणून मायराडा ही कर्नाटकातील स्वयंसेवी संस्था बचत गट चळवळीत महत्त्वाची मानली जाते. सन १९९२ मध्ये नाबार्डने ५०० स्वयंसहाय्य बचत गटांना बँकेशी जोडण्याचा पथदर्शक प्रकल्प सुरू केला. तसेच सन १९९६ मध्ये प्राधान्यक्रम क्षेत्रात बचत गटांचा समावेश केला. व्यापारी बँका व सहकारी बँकांना बचत गट बँक जोडणीत सहभागी होण्याचे परिपत्रक रिझर्व्ह बँकेने काढले. अर्थमंत्र्यांनी अंदाजपत्रकात बचत गटांची दखल घेतली त्यामुळे बचत गट चळवळीला भारतात वेग आला. आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधीच्या सहकार्याने महाराष्ट्र शासनाने सन १९९४-९५ मध्ये महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा प्रकल्पाची (MRCP) सुरूवात केली. भारतात मार्च २०१० अखेर ६९.५३ लाख बचत गट स्थापन झाले. या बचत गटांनी रु.६१९८.७१ कोटीबचत जमा केली व त्यांना रु.२८०३८.२८ कोटी कर्जपुरवठा करण्यात आला.

### संशोधनाचे महत्त्व:

धुळे जिल्हा औद्योगिकदृष्ट्या मागासलेला असून अनियमीत पर्जन्यमान व सतत दुष्काळसदृश परिस्थितीमुळे धुळे जिल्हा अवर्षणग्रस्त आहे. २००१च्या जनगणनेनुसार धुळे जिल्ह्याची लोकसंख्या १७,०७,९४७ असून त्यापैकी ८,७८,३७२ पुरुष व ८,२९,५७५ स्त्रिया आहेत. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी ७३.८९ टक्के लोक ग्रामीण भागात व २६.११ टक्के लोक शहरी भागात राहतात. ग्रामीण लोकसंख्येला प्रामुख्याने शेतीवर अवलंबून राहावे लागत आहे. तसेच या जिल्ह्यात आदिवासी लोकांचे प्रमाणही उल्लेखनीय आहे. अर्थात धुळे व शिंदखेडा हे दोन तालुके बिगर आदिवासी असून साक्री व शिरपूर हे अंशतः आदिवासी तालुके आहेत. तसेच जिल्ह्यात बेकारीची समस्या गंभीर असल्याचे आढळून येते.

धुळे जिल्ह्यात जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (DRDA), महिला आर्थिक विकास महामंडळ, महानगरपालिका, नगरपालिका, धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, नाबार्ड, स्वयंसेवी संस्था इत्यादी संस्था बचत गटांच्या स्थापनेत सहभागी झाल्या आहेत. धुळे जिल्ह्यातील महिलांच्या राहणीमानात बचत गटांमुळे काही बदल झालेले आहेत काय? त्यांची दारिद्र्याची पातळी कमी झाली काय? महिलांना बचतीची सवय लागली काय? महिलांनी स्वयंरोजगार निर्माण केला काय? सक्षमीकरणाच्या दृष्टीने कशी वाटचाल सुरू आहे? सावकारी कर्जातून सुटका झाली काय? या प्रश्नांची उत्तरे शोधणे महत्त्वाचे आहे. तसेच बचत गट चालवताना कोणत्या समस्या येतात, त्या समस्या सोडविण्यासाठी कोणते प्रयत्न केले जातात, समस्या सोडविण्यासाठी कोणती उपाययोजना सुचविता येईल या सर्व परिस्थितीचा अभ्यास करणे महत्त्वाचे वाटले म्हणून या विषयाची निवड केलेली आहे.

महिला बचत गटांचा महिला सबलीकरण, स्वयंरोजगार, उत्पन्न, सावकारी व्यवसाय, शिक्षण, आरोग्य, राहणीमान इत्यादी दृष्टिकोनातून अभ्यास खान्देशात व विशेषतः धुळे जिल्ह्यात झालेला नाही. स्वयंसहाय्यता बचत गटांच्या अभ्यासातील हे अंतर निश्चितच प्रस्तुत अध्ययनामुळे दूर होईल.

### संशोधनाची उद्दिष्टे:

१) धुळे जिल्ह्यातील स्वंयसहाय्यता बचत गटांच्या प्रगतीचे अध्ययन करणे.
२) महिलांच्या स्वावलंबनासाठी व सक्षमीकरणासाठी धुळे जिल्ह्यातील बचत गटांचे योगदान अभ्यासणे.
३) धुळे जिल्ह्यातील महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत बचत गटांचे योगदान अभ्यासणे.
४) धुळे जिल्ह्यातील महिला बचत गटांचा दारिद्र्य निर्मूलनातील सहभाग अभ्यासणे.
५) धुळे जिल्ह्यातील महिला बचत गटांचा सावकारी व्यवसायावर झालेला परिणाम अभ्यासणे.
६) धुळे जिल्ह्यातील महिला बचत गटांच्या निवडक लाभार्थी कुटूंबाच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

### संशोधन पध्दती:

प्रस्तुत संशोधनासाठी धुळे जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता बचत गट एक अभ्यास या विषयाची निवड करण्यात आली आहे. प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व द्वितीय सामुग्रीचा आधार घेण्यात आला

आहे.

अध्ययनाकरिता सन १९९८-९९ ते २००९-२०१० या कालावधीची निवड करण्यात आली आहे. प्राथमिक सामुग्री प्रश्नावली व प्रत्यक्ष मुलाखतीच्या साहाय्याने संकलित करण्यात आली आहे. संशोधनासाठी आवश्यक दुय्यम सामुग्री विविध संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, सर्वेक्षण अहवाल, शासकीय दस्तऐवज, विविध संकेत स्थळे यांचा वापर करुन जमा करण्यात आली आहे. तसेच दुय्यम सामुग्रीसाठी धुळे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालय धुळे, जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती कार्यालये, धुळे महानगरपालिका, शिरपुर व दोंडाईचा नगरपालिका, नाबार्ड कार्यालय, महिला आर्थिक विकास महामंडळ, धुळे, विविध स्वयंसेवी संस्था, धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक इत्यादी संस्थांचा वार्षिक प्रगती अहवालाचाही आधार घेण्यात आला आहे. संकलित केलेल्या द्वितीयक सामुग्रीच्या आधारे धुळे जिल्ह्यातील बचत गटांची प्रगती दर्शविण्याकरिता वार्षिक वृध्दीदर व टक्केवारी यासारख्या सांख्यिकीय साधनांचा आवश्यकतेप्रमाणे उपयोग केला आहे. धुळे जिल्ह्यातील बचत गटांच्या प्रगतीचा अभ्यास करण्यासाठी जिल्ह्यातील बचत गटांची संख्या, अनुदान, कर्जपुरवठा इत्यादी घटकांचा आधार घेण्यात आला आहे.

स्तरित यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा वापर करुन प्रत्येक तालुक्यातून १०० प्रमाणे धुळे जिल्ह्यातील एकूण ४०० लाभार्थींची निवड करुन प्राथमिक माहिती संकलित करण्यात आली.

**निष्कर्ष:**

१. १९९८-१९९९ ते मार्च २०१० या कालावधीत जिल्ह्यातील बचत गट संख्या ८२ पासून ८८६६ पर्यंत वाढलेली आहे. धुळे जिल्ह्यातील अभ्यास काळात बचत गटांची दरवर्षी सरासरी १४४.८५ टक्के वाढ झाल्याचे दिसून येते.

२. १९९८-१९९९ मध्ये १३४७ महिला बचत गटांच्या सदस्य होत्या. मार्च २०१० अखेर सदस्य संख्या १०१९५१ पर्यंत पोहचली. सदस्य संख्येत १०९.९८ टक्के या वार्षिक वृध्दीदराने वाढ झाली. धुळे जिल्ह्यात बचत गटांमुळे सुमारे एक लाख महिलांचे संघटन झालेले दिसून येते.

३. धुळे जिल्ह्यातील बचत गटांनी १९९९-२००० मध्ये १२०४ बचत गटांनी ७.२९ लाख रुपये बचत केली होती. मार्च २०१० अखेर बचतीची रक्कम ११२३.२७ लाख रुपयांपर्यंत वाढली. बचत रकमेत सरासरी ८९.५० टक्के वार्षिक वृध्दीदराने वाढ झाल्याचे दिसून येते. बचत गटांनी बँकांकडे जमा केलेल्या बचतीमुळे बँकांना मोठ्या प्रमाणात भांडवल प्राप्त झाल्याचे दिसून येते. तसेच महिलांच्या बचतीच्या सवयीत वाढ झाल्याचे निदर्शनास येते.

४. १९९९-२००० या वर्षात धुळे जिल्ह्यातील बचत गटांना ४.६० लाख रुपये बँक कर्ज मिळाले. मार्च २०१० अखेर या गटांना मिळालेले कर्ज ४४०५.९९ लाख रुपयांपर्यंत वाढले. अभ्यासकाळात बँक कर्जात वार्षिक सरासरी १४३.६८ टक्क्यांनी वाढ झाल्याचे दिसून येते. बँक कर्जामुळे महिला बचत गटांना उद्योग, व्यवसाय, व्यापार, स्वयंरोजगार सुरु

करण्यास मदत होत असल्याचे दिसून येते.

५. सन २०००-०१ या वर्षात २८.३६ लाख रु.अनुदान धुळे जिल्ह्यातील बचत गटांना प्राप्त झाले होते. सन २००९-१० या वर्षात अनुदानाची रक्कम रु.२४४९.०१ लाख रुपयांपर्यंत वाढली. धुळे जिल्ह्यातील बचत गटाच्या अनुदानात सरासरी ६७.४७ टक्के या वार्षिक दराने वाढ झाल्याचे दिसून येते. बचत गटांना मिळणाऱ्या अनुदानातून स्वयंरोजगार सुरु करण्यास महिलांना प्रेरणा मिळत असल्याचे अध्ययनावरुन स्पष्ट होते.

६. धुळे जिल्ह्यातील सुवर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजनेअंतर्गत स्थापन झालेल्या बचत गटांमुळे २००७ ते २०१० या कालावधीत ३५११ कुटूंबांची दारिद्र्यातून मुक्तता झालेली दिसून येते. या सर्व कुटूंबांनी दारिद्र्य रेषा ओलांडलेली आहे व त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. त्यामुळे त्यांचे राहणीमान उंचावले असल्याचे अभ्यासातून निदर्शनास येते.

७. धुळे जिल्ह्यात धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने स्थापन केलेल्या बचत गटांची संख्या सन १९९९-२००० मध्ये २०९ होती. ही संख्या मार्च २०१० अखेर २७०८ पर्यंत वाढली. बचत गटांची संख्यात्मक वाढ ३५.६६ टक्के या वृध्दीदराने झालेली दिसून येते. जिल्हा बँकेने प्रामुख्याने दारिद्र्य रेषेवरील गरीब महिलांचे बचत गट स्थापन केलेले दिसून येतात.

८. धुळे जिल्ह्यातील बचत गटातील निवडक लाभार्थ्यांपैकी उच्च शिक्षण घेतलेल्यांचा फारसा सहभाग नसल्याचे अभ्यासातून निदर्शनास येते. एकूण निवडक लाभार्थींपैकी ५२ टक्के लाभार्थी निरक्षर, ९.७५ टक्के लाभार्थी प्राथमिक शिक्षण घेतलेले, २५ टक्के लाभार्थी माध्यमिक शिक्षण घेतलेले, १२.५० टक्के लाभार्थी उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेले तर ०.७५ टक्के लाभार्थी पदवी प्राप्त असल्याचे दिसून आले. पदव्युत्तर शिक्षण घेतलेला एकही लाभार्थी आढळून आला नाही.

९. बचत गटातील निवडक लाभार्थ्यांचा व्यावसायिक दृष्टिकोनातून विचार केला असता असे दिसते की, जास्तीत जॉस्त लाभार्थी शेती व मजुरी करणाऱ्या आहेत. ५३.२५ टक्के लाभार्थींचा मुख्य व्यवसाय शेती आहे. ५१.२५ टक्के लाभार्थी मजुरी करणाऱ्या आहेत. नोकरी करणाऱ्या लाभार्थ्यांचे प्रमाण फक्त ०.५ टक्के आहे. यावरून असे दिसून येते की, शेती व मजूरी करणाऱ्या लाभार्थींना बचत गटाबाबत प्रेरणा मिळाली आहे. नोकरी करणाऱ्या महिलांना बचत गटाचे महत्व कमी वाटते असे अभ्यासावरुन दिसून येते.

१०. निवडक लाभार्थ्यांपैकी ९२ टक्के लाभार्थ्यांचा बचत गटात येण्याचा उद्देश बचत जमा करणे हा आहे. ८३.५० टक्के लाभार्थ्यांचा उद्देश कर्ज घेणे, ६० टक्के लाभार्थी मुलांच्या शिक्षणासाठी पैशाची व्यवस्था करण्याच्या उद्देशाने व ५३.७५ टक्के लाभार्थ्यांनी अनुदान मिळण्याच्या उद्देशाने बचत गटात प्रवेश केल्याचे सांगितले. बचत गटात सहभागी झाल्यानंतर सर्वच लाभार्थींनी बचत गटांकडून अंतर्गत

कर्ज घेतलेले दिसून येते. शिक्षणावर खर्च करणाऱ्या लाभार्थींचे प्रमाण ५७ टक्क्यांनी वाढले. आरोग्यावरील खर्च करणाऱ्या लाभार्थींचे प्रमाण २५ टक्क्यांनी वाढले त्यावरुन बचत गटात सहभागी झाल्यामुळे उद्दिष्टांची पूर्तता झाल्याचे निदर्शनास येते.

११. धुळे जिल्ह्यातील बहुसंख्य बचत गटांनी कर्जावर मासिक २ टक्के (वार्षिक २४ टक्के) व्याजदर आकारला आहे. मात्र शिंदखेडा तालुक्यातील काही बचत गटांनी मासिक १.५ टक्के (वार्षिक १८ टक्के) व्याजदर आकारला आहे. त्यामुळे गावातील खाजगी सावकारी व्यवसाय पुर्णपणे बंद झाला असे समाधान लाभार्थींनी व्यक्त केले. यावरुन असे दिसून येते की, काही बचत गटांनी वाढीव व्याजदराने उत्पन्न मिळविण्याऐवजी सावकारी व्यवसाय बंद करण्यासाठी प्रयत्न केला आहे. निवडक २० गावांपैकी १२ गावातील (६० टक्के) सावकारी कमी झाल्याचे निदर्शनास येते.

१२. धुळे जिल्ह्यातील बचत गटांच्या निवडक लाभार्थ्यांपैकी ७१.५ टक्के लाभार्थ्यांना बचत गटामुळे रोजगार मिळाला असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली. २८.५ टक्के लाभार्थ्यांनी रोजगार मिळाला नसल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली. रोजगार निर्मितीमुळे कुटूंबाचे उत्पन्न वाढण्यास मदत झाल्याचे अभ्यासातून निदर्शनास येते.

१३. निवडक लाभार्थ्यांपैकी ६८.७५ टक्के लाभार्थी बचत गटात येण्यापूर्वी सावकारी कर्ज घेत होत्या, गटात आल्यानंतर ८.५ टक्के लाभार्थी सावकारी कर्ज घेत असल्याचे दिसून येते. ज्यावेळी गटाजवळ पैसा उपलब्ध नसतो तेव्हा खाजगी सावकाराकडून कर्ज घेतले जाते असे लाभार्थ्यांनी सांगितले. यावरुन असे निदर्शनास येते की, बचत गटामुळे सावकारी कर्जाचे प्रमाण बरेच कमी झाले.

१४. बचत गटामार्फत दिल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या प्रशिक्षणामुळे ७९ टक्के लाभार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला, ६३ टक्के लाभार्थ्यांना व्यवस्थित बोलता येऊ लागले. यामुळे बचत गटाबाबत समाधान व्यक्त केले. बचत गटामुळे महिलांच्या व्यक्तिमत्त्व विकासास व महिला सबलीकरणास मदत होत असल्याचे दिसून येते.

१५. निवडक लाभार्थ्यांपैकी ८८ टक्के वाढल्याचे सांगितले तर ८५ टक्के लाभार्थ्यांनी राहणीमान पूर्वीपेक्षा उंचावले असल्याचे सांगितले.

१६. निवडक लाभार्थ्यांपैकी व्यवसायातील गुंतवणूक वाढली असे ७१ टक्के लाभार्थ्यांनी सांगितले. आदिवासी भागात इतर व्यवसाय करण्याची संधी नाही, बाजारपेठ नाही, वाहतुकीची साधने नाहीत त्यामुळे शेती, पशुपालन व दागिने यात गूंतवणूक केली जात असल्याचे अभ्यासात दिसून आले.

१७. बचत गटामुळे महिलांचे कुटूंबातील व समाजातील स्थान उंचावले असल्याचे अभ्यासात आढळून आले. बचत गट लाभार्थ्यांची कौटुंबिक समस्या सोडविण्यासाठी कुवत वाढली आहे. पूर्वीपेक्षा कुटूंबातील मानसन्मान वाढला आहे. पैसा

वापरण्याचे स्वातंत्र्य मिळाले आहे, मुलींच्या शिक्षणाचे महत्व मान्य झाले आहे व शासनाच्या योजनांची माहिती मिळाली आहे अशी प्रतिक्रिया ९० टक्के लाभार्थींनी व्यक्त केली आहे.

१८. धुळे जिल्ह्यातील निवडक लाभार्थ्यांना आर्थिक व सामाजिक लाभ मोठ्या प्रमाणावर होत आहेत. राजकीय लाभांचे प्रमाण कमी आहे. एकूण ४०० निवडक लाभार्थ्यांपैकी ७४.७५ टक्के लाभार्थ्यांनी आर्थिक व सामाजिक लाभ झाल्याचे मत व्यक्त केले तर ३७.२५ टक्के लाभार्थ्यांना राजकीय लाभ होतात अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. राजकीय लाभांपेक्षा आर्थिक व सामाजिक लाभ बचत गटामुळे अधिक प्रमाणात होत असल्याचे दिसून येते.

**शिफारसी :**

१. धुळे जिल्ह्यात बचत गटांची सरासरी बचत, सरासरी कर्ज व सरासरी अनुदानाची रक्कम फारच कमी आहे. म्हणून बचत गटांना दिली जाणारी कर्जाची रक्कम व अनुदानाची रक्कम वाढविण्याचे धोरण शासनाने व बँकांनी अमलात आणावे.

२. धुळे जिल्ह्यात साक्री तालुका पुर्णतः ग्रामीण तालुका आहे. मात्र बचत गटांचा वृध्दीदर या तालुक्यात सर्वात कमी आहे. तसेच साक्री तालुक्यात इतर तालुक्यांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण सर्वात जास्त (४९.२३ टक्के) आहे. मात्र या तालुक्यात बचत गटांच्या सदस्यांचे प्रमाण सर्वात कमी दिसून येते. म्हणून साक्री तालुक्यात बचत गटांची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याची गरज आहे. तसेच जास्तीत जास्त महिलांना बचत गट सदस्य होण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने प्रयत्न करावेत.

३. धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने कर्जाची रक्कम प्रत्येक बचत गटाला फारच कमी दिलेली दिसून येते. म्हणून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने जास्तीत जास्त बचत गटांना कर्ज वितरीत करण्याचे धोरण स्वीकारावे व कर्जाच्या रकमेत वाढ करण्याचा प्रयत्न करावा म्हणजे महिलांच्या विकासाचा वेग वाढण्यास मदत होईल.

४. धुळे जिल्ह्यात आदिवासी व बिगर आदिवासी तालुक्यांमध्ये बचत गट जवळ जवळ सारख्याच प्रमाणात स्थापन झालेले आहेत; म्हणून जिल्ह्यातील बचत गट चळवळीत सहभागी असणाऱ्या संस्थांनी साक्री व शिरपूर या आदिवासी तालुक्यात बचत गट चळवळ वाढीस नेण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे धुळे जिल्ह्याच्या विकासास व दारिद्र्य निर्मूलनास मदत होईल.

५. महिला बचत गटांचा प्रमुख उद्देश दारिद्र्य निर्मूलन व महिला सबलीकरण हा आहे. दारिद्र्य निर्मुलनासाठी बचत गटांनी व्यावसायिकतेवर भर देणे आवश्यक आहे. शासनाने व स्वंयसेवी संस्थांनी उद्योग व स्वयंरोजगारासंबंधी प्रभावी प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. शिरपुर तालुक्यातील आदिवासी महिलांना तेंदू पत्यांपासून बिडी बनविण्याचे प्रशिक्षण मिळाले पाहिजे. कारण तेंदूपाने व्यापारी

६० रुपये शेकडा याप्रमाणे घेऊन जातात. म्हणून आदिवासी महिलांना बिडी बनविण्याचे प्रशिक्षण दिल्यास रोजगार मिळेल.

६. बचत गटाच्या कार्यपध्दतीत महिलांच्या निरक्षरतेमुळे अनेक अडचणी येतात. बचत गट सदस्यांना हिशोब समजत नाही, पासबुकमधील नोंदी समजत नाहीत, बँकेत जाण्याचे धाडस होत नाही. बँकेची स्लीप भरता येत नाही या अडचणी दूर करण्यासाठी प्रौढ शिक्षण देणारी प्रभावी यंत्रणा निर्माण केली पाहिजे. बचत गट स्थापन करतांना किमान दोन शिक्षित महिलांना एका बचत गटात सहभागी करुन घेण्यास प्राधान्य दिले पाहिजे.

७. धुळे जिल्ह्यातील आदिवासी भागातील बचत गट सदस्यांना मराठी भाषा समजण्यात अडचण येते. त्यामुळे त्यांचे संवाद कौशल्य कमी पडते आदिवासी महिलांमध्ये साक्षरता कमी आहे. अशा महिलांसाठी आदिवासी भाषा अवगत असणारा कार्यकर्ता उपलब्ध करुन दिला पाहिजे. कार्यकर्त्याला मराठी व आदिवासी दोन्ही भाषा अवगत असल्यास आदिवासी महिलांना मराठी भाषा समजण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले पाहिजेत.

८. दारिद्र्य रेषेखालील बचत गटांना अनुदान मिळते व दारिद्र्यरेषेवरील बचत गटांना अनुदान मिळत नाही. अनुदान देण्याच्या शासनाच्या या धोरणात बदल करावा. दारिद्र्य रेषेवरील काही गटांची आर्थिक स्थिती फार हलाखीची असते अशा गरीब गटांना शासनाने अनुदान दिले पाहिजे.

९. बचत गटांच्या महिला सदस्यांना त्यांच्या कौशल्याचा वापर करुन वस्तुनिर्मिती किंवा सेवा उद्योगात प्रवेश करण्यासाठी प्रेरणा दिली पाहिजे. स्वयंसेवी संस्थांनी व शासकीय यंत्रणेने बचत गटासाठी बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. बचत गटाच्या काही वस्तुंना किंवा खाद्य पदार्थांना संरक्षण देण्याचे धोरण शासनाने जाहीर करावे.

१०. भारतातील अतिगरीब महिला बचत गटात मासिक १० रुपयेसुध्दा बचत जमा करु शकत नाहीत. अशा महिला बचत गटाच्या लाभापासून वंचित आहेत. अतिगरीब महिलांचे बचत गट स्थापन करुन सुरुवातीला किमान एक वर्षापर्यंत अशी किमान बचत दरमहा भरण्याची व्यवस्था शासकीय यंत्रणेने केली पाहिजे. एकदाच अनुदान देण्यापेक्षा अतिगरीब महिलांच्या बचत गटाची सुरुवातीची बचत भरण्याची व्यवस्था केल्यास अतिगरीब महिलांचा बचत गट चळवळीतील सहभाग वाढेल व त्यांचेही सबलीकरण होऊ शकेल.

११. बचत गटाच्या अंतर्गत कर्जावर मासिक २ टक्के (वार्षिक २४ टक्के) व्याजदर आकारला जातो. हा व्याजदर कमी केला पाहिजे. दारिद्र्य रेषेखालील व गरीब महिलांच्या बचत गटांनी बिनव्याजी कर्ज दिले पाहिजे. बिनव्याजी कर्ज बचत गटांना मिळाल्यास अंतर्गत कर्जावरील व्याजदर कमी होण्यास मदत होईल व कर्जदारांचे शोषण होणार नाही.

१२. बचत गट चळवळीत काम करणाऱ्या स्वंयसेवी संस्थांना शासनाकडून मिळणारे अनुदान वाढवून मिळावे. या अनुदानात वाढ झाल्यास स्वयंसेवी संस्था बचत गट कार्यकर्त्यांना व सहयोगिनींना पुरेसे मानधन देऊ शकतील. त्यामुळे कार्यकर्ते, सहयोगिनी व स्वयंसेवी संस्थांचा कामाचा उत्साह वाढण्यास मदत होईल.

१३. प्रत्येक जिल्ह्याला दरवर्षी ठराविक प्रमाणात बचत गट स्थापन करण्याचे लक्ष दिले जाते त्यामुळे असे लक्ष्य पूर्ण करण्याच्या हेतूने जे बचत गट स्थापन होतात ते बचत गट दीर्घकाळ टिकू शकत नाहीत व त्यांची गुणवत्ताही कमी दर्जाची राहते. म्हणून स्वयंसेवी संस्थांनी बचत गट स्थापन केल्यानंतर गट सबल व परिपक्क होईपर्यंत गटाबरोबर राहावे, गटांना प्रशिक्षण द्यावे, मार्गदर्शन करावे म्हणून गटासाठी योजना असावी, योजनेसाठी गट नसावा या तत्वाचे पालन केल्यास बचत गटांचा दर्जा सुधारण्यास मदत होईल.

(लेखिकेस डॉ.विलास खंदारे, अधिष्ठाता, सामाजिकशास्त्रे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची पीएच्.डी. ही पदवी ऑक्टोबर २०११ मध्ये प्राप्त झाली असून या पदवीसाठी त्यांनी *"धुळे जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता बचत गट: एक अभ्यास"* हा प्रबंध सादर केला आहे. त्या प्रबंधाचा हा सारांश.)

## संदर्भ सूची:


१) डॉ.महंमद युनूस, *"गरिबीमुक्त विश्वाची निर्मिती"* अनुवाद, गोविंद गोडबोले, साकेत प्रकाशन, औरंगाबाद २०१०

२) मुलाणी एम.यू. *"अल्पबचत नियोजन (बचत गट)"* डायमंड पब्लिकेशन्स, पुणे

३) डॉ.महंमद युनूस, *"बँकर टू द पुअर, बँक गरिबांच्या दारात"* अनुवाद - शरद पाटील, सुविधा प्रकाशन, सोलापूर २००७

४) Datta Sundaram, *"Micro Finance In India"* B.R.Publishing Corporation, Delhi 2007

५) मुलाणी एम.यू. *"महिला स्वयंसहाय्यता बचत गट"* डायमंड पब्लिकेशन्स, पुणे २००६

६) कुलकर्णी विजय, *"बचतनामा"*, चैतन्य प्रकाशन, पुणे २०००

७) N. Lalitha, *"Readings in Micro Finance"* Dominant Publishers and Distributors, New Delhi 2008.

८) www.microfinancegateway.org.

९) www.shg.com

## 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

(फॉर्म ४, नियम ८ नुसार)

| | | |
|---|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/डॉ.अनिल सूर्यवंशी, गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर, बार्शी-४१३ ४११, जिल्हा-सोलापूर. |
| २. नियतकाल | : | त्रैमासिक. |
| ३. मुद्रकाचे नाव | : | डॉ.अनिल सूर्यवंशी |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर, बार्शी-४१३ ४११, जिल्हा-सोलापूर. |
| ४. मुद्रण स्थळ | : | सातपुडा ऑफसेट, एमआयडीसी एरिया, जळगाव |
| ५. प्रकाशकाचे नाव | : | बाब क्र.३ प्रमाणे |
| ६. संपादकाचे नाव | : | डॉ.अविनाश रामलाल निकम |
| ७. राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | मातृपितृ कृपा, प्लॉट नं.३०, परिमल कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे, शहादा-४२५ ४०९, जिल्हा - नंदुरबार. |
| ८. मालकाचे नाव | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा:सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम्.एन्.रॉय ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र.६, एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र.३२३ समोर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. |

मी अनिल सूर्यवंशी असे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

डॉ.अनिल सूर्यवंशी,
मुद्रक व प्रकाशक






## ताप्ती एज्यूकेशन सोसायटी, भुसावळ तर्फे हार्दिक शुभेच्छा...

ताप्ती एज्यूकेशन सोसायटी, भुसावळ

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ क्षेत्रातील एक नामांकित व अग्रगण्य शैक्षणिक संस्था**



**संस्थेचे विविध शैक्षणिक उपक्रम**

**भुसावळ कला, विज्ञान आणि पु.ओ.नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ**

(NAAC Re-Accredited with CGPA of 3.28 on Four Point Scale at A Grade)
UGC Honoured College with Potential Excellance

पदवी, पदव्युत्तर व संशोधन अभ्यासक्रम तसेच उच्च माध्यमिक अभ्यासक्रमाची व्यवस्था
+२ स्तरावर किमान कौशल्य व द्विलक्षी अभ्यासक्रम उपलब्ध

*

**इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड करिअर डेव्हलपमेंट, भुसावळ**

व्यवस्थापकीय आणि व्यावसायीक अभ्यासक्रम उपलब्ध

*

**ताप्ती पब्लीक स्कूल, भुसावळ**

नर्सरी, ज्यु.के.जी. ते प्रायमरी व माध्यमिक शिक्षणाची (सी.बी.एस.ई.पॅटर्न) व्यवस्था.

* * *

**डॉ. मिनाक्षी वायकोळे**
प्राचार्य, भुसावळ कला, विज्ञान आणि पु.ओ.नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ

**महेश देविदास फालक**
चेअरमन, संचालक मंडळ, ताप्ती एज्यूकेशन सोसायटी, भुसावळ

**मोहन मोरेश्वर फालक**
अध्यक्ष, ताप्ती एज्यूकेशन सोसायटी, भुसावळ

(जाहिरात सहकार्य: प्रा. व्ही.डी.पाटील, स्थानिक कार्यवाह, म.अ.प.)